# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192483
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M 83·1/P32S Accession No. M 3944

Author पटवर्धन वसुंधरा

Title संसार शोभा. 1951

This book should be returned on or before the date last marked below.

# संसार-शोभा

लेखिका

वसुंधरा पटवर्धन

१९५१

अेकमेव विक्रेते

बाम्बे बुकडेपो, गिरगांव, मुंबअी ४.

मूल्य दोन रुपये

प्रकाशक
सौ. सुधा परचुरे,
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबई ४.

प्रथमावृत्ति
१९५१

सर्वाधिकार
लेखिकेच्या स्वाधीन.

मुद्रक
न. वि. सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशिव, पुणें २

# कृतज्ञता

हा कथासंग्रह [illegible] माझे वडील ती. रा. रा. का. वि. खानविलकर ऊर्फ [illegible] [illegible]ण करीत आहें. माझे वडील म्हणून ती. खानसाहेबांची [illegible] म्हणं सहाजिक आहे. पण हा कथासंग्रह त्यांना अर्पण [illegible] कारण वेगळें आहे. मला लहानपणापासून वाटत आलें आहे कीं माझ्या वडिलांच्यासारखे वडील लाभणें हें एक परम भाग्य आहे. माझ्या लेखनाची आवड त्यांच्या उत्तेजनावर पोसली आहे. रोजच्या व्यवहारा-पलीकडे आपण अधिक कांहीं केलें पाहिजे या महत्त्वाकांक्षेचें बीं त्यांनीं माझ्या मनांत लहानपणापासून पेरलेलें आहे. अगदीं परवां परवांपर्यंत त्यांनी माझ्याकडून अनेक पुस्तकें वाचून घेतली. समजावून दिली. 'तुझें तू वाच' असें कधी म्हणाले नाहीत. मग त्यासाठीं रात्रीं दोनअडीच वाजले तरी हरकत नाही. अलीकडे त्यांची प्रकृति बरी नसते. त्यामुळें जाग्रण सोसत नाहीं. आई म्हणते, 'निजा आता. उशीर झाला.' पण खानसाहेब म्हणतात, 'अग, हिच्याशी बोलत बसलों तर मला बरंच वाटेल.'

खानसाहेब अतिशय बुद्धिमान आहेत. त्याचें वाचन पुष्कळ आहे. पण ते कधीं लघुकथा वाचीत नाहीत. माझी एक एक गोष्ट मात्र ते तीन तीन वेळां सुद्धां वाचतात. पुन्हा मला वाचायला सांगतात. आणि माझी एक गोष्ट मग त्याना दोन तीन दिवस पुरते. माझे 'जयंताच्या गोष्टी' हें पुस्तक मी त्यांना पुण्याहून मुबईस पाठविलें. पुस्तक मिळालें तेव्हां ते जेवा-यला बसले होते. पण पुस्तक पहातांच त्यांचें जेवण थांबलें. त्यांच्या वागण्यांत भावनेपेक्षां विचाराना अधिक प्राधान्य असले तरी तसे ते भावनाप्रधान आहेत. 'जयंताच्या गोष्टी' हें पुस्तक ते काय ! अगदीच छोटेसें. पण तें आपल्या मुलीनें लिहिलें आहे असें दिसतांच त्यांचें अंतःकरण भरून आलें. ताट पुढें सारीत ते माझ्या आईला म्हणाले, 'नको मला कांही. माझं पोट भरलय.'

त्यानंतर त्यांची माझी भेट झाली तेव्हां त्यांनींच तें पुस्तक मला सबंध वाचून दाखविलें आणि मग म्हणाले 'तुझंच पुस्तक मी, तुला वाचून दाखवलं.'

खानसाहेब रसिक आहेत. पण त्यांच्याजवळ असे अनेक गुण आहेत कीं जे सामान्य माणसाजवळ आढळणार नाहीत. म्हणून माझ्या वडिलांचा मला

फार अभिमान आहे. माझी आई आम्हां मुलांना नेहमीं म्हणते कीं, 'तुम्ही आपल्या वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा. तुमचं कल्याण होईल.'

आपल्या आयुष्यांतले अनेक अनुभव त्यांनीं मला सांगितले आहेत. पण त्यांच्या सांगण्याची पद्धति अत्यंत आकर्षक आहे. वाणी स्वच्छ, आणि तंत्राचा अभ्यास न करतांहि ऐकणाराचें मन ओढून घेण्याचें त्यांचें सामर्थ्य विलक्षण आहे. दुसऱ्याच्या गुणांचें कौतुक मनापासून करावें असें त्यांनींच! पण त्याचे दोषहि त्याच्या गळ्यांत गोड शब्दांत बांधावेहि त्यांनींच! माझ्या लेखनांतले गुण जसे त्यांनीं सांगितले तसे दोषहि सांगितले आहेत. मी भेटलें कीं त्यांचे दोन तीन प्रश्न ठराविक असतात,'नवीन काय वाचलंस? नवीन काय लिहिलंस?' तें सारें त्यांना सांगावें लागतें. ज्ञानेश्वरींतल्या ओव्या म्हणून दाखवाव्या लागतात. मोठ्या तन्मयतेनें ऐकतात रसिक रसिकपणानें त्यावर चर्चा करतात. वैभव ज्ञानेश्वरांचें; पण खानसाहेब मलाच शाबासकी देतात माझ्या पाठीवर मोठ्या प्रेमानें थोपटतात.

नवीन कांहीं लिहिलें किंवा पाठ केलें कीं मला ते खानसाहेबांना दाखविण्याची अतिशय इच्छा असते. ते भेटले कीं मला दम निघत नाहीं. आधीं सगळें सांगून टाकतें, मग बाकीची विचारपूस.

त्यांच्या माझ्या अनेक आवडीनिवडी सारख्या आहेत. पण पिढीचें अंतर असल्यामुळें विचारांतहि अंतर पडतें. आम्ही पुष्कळ चर्चा करतों; पण आपला मुद्दा कोणीच सोडीत नाहीं. मग आम्ही दोघेहि समजतों कीं हा वाद संपायचा नाहीं. मग तो तिथेंच सोडून देतों.

पण माझ्यांतली लेखनकला वाढीला लावण्याचें सारें श्रेय ती. खानसाहेबांना आहे. आयुष्यांत माणसाला उत्तेजनाची केवढी जरूर असते! पण माझ्या वडिलांनीं ही उणीव मला कधीं पडूं दिली नाहीं. पित्याचें वात्सल्य म्हणून म्हणतात तें सौख्य मी भरपूर अनुभवलें आहे. मुलीला पितृऋणाची फेड कधीं करतां येते का? कृतज्ञता व्यक्त करणें एवढेंच माझ्या हातीं आहे आणि ती मी हें पुस्तक ती. खानसाहेबांना अर्पण करून व्यक्त करीत आहें.

१८९ शुक्रवार,
पुणें २.

—वसुंधरा पटवर्धन

# संसार : : १

हातांतले पत्ते बेफिकीरपणानं जमिनीवर फेंकून जोशी म्हणाले, 'कंटाळा आला या पत्त्यांचा ! रोज रोज पत्ते खेळायचे. त्यांत नाविन्य तर नाहींच, पण मनसुद्धां यानं मोकळं होत नाहीं. मनाला प्रसन्नता कशी ती येतच नाहीं. असं वाटतं, कीं दुखणं एकीकडे आणि आपण मलमपट्टी करतोय भलतीकडेच. आपण निराळाच खेळ खेळलों तर ? '

जोश्यांच्या मधल्या अेकदोन वाक्यांचा अन्वयार्थ बाकीच्यांना लागला नव्हता. पण त्यांचा आजचा रोख थोडा निराळा आहे याची सर्वांनाच जाणीव झाली. घारपुऱ्यांनीं विचारलं, 'कोणता खेळ ? '

'सांगतों. घारपुरे आपल्या सर्वांपेक्षां मोठे आहेत; पण तरीसुद्धां आपण आपलीं मनं एकमेकांजवळ खुलीं करतों. तेव्हां माझं म्हणणं असं कीं, आज आपण याहिपेक्षां पुढल्या टप्प्याला जाऊं या. आपल्या बायकोबद्दलच्या आपल्या अपेक्षा कितपत पुऱ्या झाल्या हें आपण प्रामाणिकपणानं सांगूं या. यांत कोणी कोणाला कमीअधिक लेखण्याचं कारण नाहीं. पण मला असं वाटतं कीं आयुष्यभर खेळत असलेला हा विवाहाचा खेळ अखेर आपल्याला नेतो तरी कुठें हें आपल्याला समजलं पाहिजे. आपलं लग्न ही सौख्याचे दरवाजे खुले करण्याची चावी आहे कीं अंगावर उलटलेला जुगार आहे ? विवाहाची माला गळ्यांत घालून घेतल्यापासून माणूस पृथ्वीवरून स्वर्गांत जातो कीं आगींतून उठून फुफाट्यांत पडतो ? स्वतःचा संसार म्हणजे कांहीं जगांतल्या सगळ्या लोकांचा संसार नाहीं; किंवा आपले दोनचार जणांचे अनुभव म्हणजे कांहीं जगाचा अनुभव नव्हे. पण जगांत हीच एक गोष्ट अितकी नाजुक आहे कीं सहसा माणूस याबाबत खरं बोलत नाहीं. त्यामुळें लाखों लोकांच्या संसारांत सुखदुःखांचं मिश्रण किती आहे याचा खराखुरा थांग लागणं अशक्य आहे. पण आपल्याला आपल्यापुरता अंदाज घेणं मात्र शक्य आहे. म्हणून

मी म्हणतों कीं आपण आपले अनुभव सांगूं या. माझी खात्री आहे कीं या चर्चेतून अेखादी चांगली गोष्ट आपल्या प्रत्ययाला येईल.'

सर्वांचे चेहरे थोडे कावरेबावरे झाले. ते साखरदांडेकडे पाहूं लागले. जोशी, घारपुरे आणि परुळेकर यांच्यांत साखरदांडे हा अगदीं नवा मित्र होता. पण त्यांची अडचण ओळखून साखरदांडे म्हणाले, 'तुम्हांला संकोच करण्याचं कारण नाहीं. मी माझाहि अनुभव सांगेन.'

'हें पहा जोशी', परुळेकर म्हणाले, 'ज्याची अक्कल त्याची नक्कल! तूं ज्या प्रामाणिकपणानं आपली हकीकत सांगशील त्या मानानं आम्ही आमच्या हकीकती सांगूं.'

'हरकत नाहीं. मन मोकळं करायला कधींकधीं बायकोपेक्षांसुद्धां मित्रच अधिक जवळचा असतो, हें आपल्याला साऱ्यांनाच पटणार आहे याची मला खात्री आहे. कारण आपण जें बोलणार आहोंत तें आपण आपल्या बायको-जवळ बोलूं शकूं काय हा सवाल तुम्ही स्वतःलाच विचारून पहा. मी पाल्हाळ लावीत नाहीं. माझ्या हकीकतीकडेच मी वळणार आहें.

'मी सुधारक आहें हें तुम्हांलाच काय पण सर्वांनाच माहीत आहे. सुधारकी विचार बोलून दाखविणारा मी केवळ शब्दपंडित नाहीं. कारण वयाच्या पंचविसाव्या वर्षीं मी लग्न केलं तें अेका पुनर्विवाहेच्छु मुलीशीं. वास्तविक तिचा तो पुनर्विवाह होता तरी माझं मात्र तें पहिलंच लग्न होतं. मी अेखाद्या कुमारिकेशीं लग्न करावं असं माझ्या घरांतल्या मंडळीचं म्हणणं होतं. पण असा विचार केला कीं जी सुधारणा व्हावी असं मला वाटतं ती मी स्वतःच आधीं केली पाहिजे. आधीं मी कुमारिकेशीं लग्न करायचं, मग तिच्या मरणाची वाट पहायची आणि मग अेका बालविधवेचा उद्धार करायचा हा मूर्खपणाचा विचार होता. शिवाय माझ्या सुधारणेकरितां ती मरावी असं मला वाटणं शक्य होतं काय? किंवा ही माझ्या हातांतली गोष्ट होती काय? मी कुणाचंहि न ऐकतां बावीस वर्षांच्या, वर्षापूर्वींच विधवा झालेल्या अेका मुलीशीं लग्न केलं. तिचं पहिल्या सासरचं मंदा हें नांव मी तसंच ठेवलं. हेतु हा कीं आपल्यांत फार बदल झाला आहे असं तिला वाटूं नये.

'माझ्या लग्नाला फक्त अेकच वर्ष झालं आहे. पण सुरुवातीचे दिवस

आणि ही वर्षाअखेरी यांत जमीनअस्मानाचा फरक पडला आहे. मला वाटतं, माणसाच्या जीवनांत जमीनअस्मानाचा फरक घडवून आणणाऱ्या ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांत लग्न ही सुद्धां अेक प्रमुख बाब आहे. निदान सामान्य माणसाच्या आयुष्यांत तरी गळयांत विवाहाची माला पडली कीं त्याच्या मधुर स्वप्नांच्या झिरमिळया तुटून गळूं लागतात. लग्नानं माणसं शुद्धीवर येतात. पुरुषाला शुद्धीवर येण्याची पहिली चपराक त्याला त्याची बायको देते. पण . . .

'लग्न झाल्या दिवसापासून मी खुषींत होतों. तिच्यावर, माझ्यावर, आणि सगळया जगावर मी खूष होतों. तिचं रूप मला आवडत होतं. घरांतली व्यवस्था ती उत्तम ठेवीत होती. माझ्या धोतराच्या निऱ्या करण्यापासून माझी प्रत्येक गोष्ट ती मोठया तत्परतेनं करी, आणि अजून करते. प्रथम प्रथम ती मला अितकी लाजे, माझ्याकडे पाहण्याचा किंवा माझ्याशीं बोलायचा तिला अितका संकोच वाटे कीं कांहीं विचारूं नका. आमच्या त्या अेवढ्याशा दोन खोल्या तिला लाजायला फार कमी पडत. आपणहि थोडं लाजावं कीं काय, सुरुवातीला नवऱ्यानंसुद्धां लाजायचं असतं कीं काय अशी मला शंका येई.

'पण असे कांहीं दिवस गेले आणि पुढें पुढें मला असं वाटायला लागलं कीं खरं म्हणजे आतां हा तिचा संकोच कमी व्हायला पाहिजे. माझं आणि तिचं जीवन अेका प्रवाहांतून वहावं अशी माझी अिच्छा होती. तिच्या आणि माझ्या जीवानं अेकमेकांसाठीं वेडं होअून जावं ही माझ्या मनाची तळमळ होती. पण ती वेडी तर होत नव्हतीच पण शहाणीसुद्धां नव्हती. तिला हव्या असलेल्या वस्तु तिनं माझ्याजवळ हक्कानं मागून घ्याव्यात, एखाद्या गोष्टीसाठीं तिनं माझ्याजवळ लाडिक हट्ट धरावा अशी माझी अपेक्षा होती. मी या गोष्टीची वाट पहात होतों.

'पण बारकाअीनं विचार केल्यावर मला असं दिसून आलं कीं, ही आपल्या घरांत मालकिणीच्या दिमाखानं रहात नाहीं. अेखाद्यानं सेवाव्रत आचरावं तशी तिच्या वागण्याची पद्धत होती. या सबंध वर्षांत माझ्याजवळ तिनं अेकहि वस्तु मागितली नाहीं. मी आपणहून विचारलं तर म्हणे, 'हें आहे माझ्या-

जवळ !' नको अितका समंजसपणा ती दाखवीत होती. ती रसिक असेल अशी माझी कल्पना होती,पण अरसिकपणाची तिनं कमाल चालवली होती. संसारांत पडलेली ही स्त्री. पण तिला कांहींहि नको होतं. मला प्रसन्न ठेवण्याचा ती प्रयत्न करी, पण अशी दूर अंतरावर उभी राहून. मला सुख व्हावं ही तिची अिच्छा होती. पण माझ्याशीं ती समरस होत नव्हती. आम्ही एका घरांत रहात होतों. नवरा–बायकोच्या नात्यानं रहात होतों. पण आम्ही जणुं दोन घरचे दोन पाहुणे होतों. तिच्या वागण्याची ती सालस, गरीब पण अलिप्त पद्धत पाहून मला भिंतीवर चरा ओढल्यासारखा वाटे. माझा हात तिनं कधीं आपणहून धरला नाहीं. माझ्या सहवासांत ती बेहोश झाली नाहीं. माझ्या सान्निध्यांत तिला स्वतःचा, जगाचा विसर पडला नाहीं. माझ्या डोळ्यांत तिनं आपलं रूप पाहिलं नाहीं. तिचं सर्वस्व म्हणजे मीच आहें अशी जाणीव तिनं मला अेक क्षणभरसुद्धां दिली नाहीं. ती जणुं कर्तव्यकर्म करीत होती. माझ्या सुखसोयी ती पहात होती. त्या समरसतेची चाहूल मात्र माझ्या अंतरंगांत कधीं अैकूं आलीच नाहीं.

'तिच्या या चमत्कारिक, अलिप्त वागण्यानं मलासुद्धां अिच्छा नसतांना तिच्यापासून दूर रहावं लागत होतं. तिनं आपल्या अंतःकरणाचे दरवाजे जणुं बंद करून घेतले होते. हातांत साखर असावी पण तोंडांत घालतां घालतां त्याची माती होअून जावी असं होत होतं. मी फार खिन्न झालों. याचं कारण काय तें तिलाच विचारावं असं अेकदां मनांत आलं. अेखाद्या दिवशीं प्रसंग पाहून विचारावं असंसुद्धां मी ठरवलं.

'पण ती वेळ आलीच नाहीं. अेक दिवस डोकं दुखत होतं म्हणून मी दुपारचाच ऑफिसमधून घरीं आलों. बाहेरच्या खोलीचं दार अुघडंच होतं. मंदा आंतल्या खोलींत पाठमोरी बसली होती. चोरपावलानं जाअून तिचे डोळे झांकावे आणि थोडी गंमत करावी म्हणून मी हलक्या पावलानं तिच्या मागें जाअून अुभा राहिलों. तिच्या पुढ्यांत एक छोटीशी बॅग होती. त्या बॅगेंत अेका जोडप्याचा फोटो होता. त्यांतली स्त्री म्हणजे मंदाच होती आणि तिच्या शेजारीं, तिच्या खांद्यावर हात ठेवून अुभा असलेला सुंदर पुरुष म्हणजे मंदाचा पहिला नवरा होता. त्याला तिनं गुलाबाचीं फुलं वाहिलीं

होतीं. तिनं डोळे मिटले होते. हात जोडले होते आणि तिच्या डोळ्यांतून अश्रु वहात होते. ती म्हणत होती, 'मी चुकलें. मी असं करायला नको होतं. तुम्हांला मी वचन दिलं कीं मी तुम्हांला कधीं विसरणार नाहीं. पण मी चुकलें. याचं परिमार्जन मी कसं करूं?'

'मला मोठा धक्का बसला. पायाखालची जमीन दुभंग होअून आपण अगदीं खोल खोल जात आहोंत असं मला वाटलं. माझं डोकं दुखत होतं हें सुद्धां मी विसरून गेलों. आलों तसाच हलक्या पावलांनीं मागे वळलों. आणि चहा पिण्यासाठीं म्हणून अेका इराण्याच्या हॉटेलांत गेलों.

'मला समजून चुकलं कीं मंदा अजून आपल्या मृत नवऱ्यावरच प्रेम करीत होती. माझ्या प्रेमाची तिच्यावर बळजबरी होत होती. खरंच सांगतों परुळेकर तुला, पुर्नविवाहाच्या सुधारणेच्या नादानं मी आयुष्यांतल्या अेका महत्त्वाच्या सुखाला पारखा झालों. माझा अेकटेपणा कधीं संपलाच नाहीं. तिचं आपल्या पहिल्या नवऱ्यावर प्रेम होतं. ती माझी पहिली बायको असली तरी मी तिचा दुसरा नवरा होतों. मला ज्या गोष्टी नव्या होत्या त्या तिच्या लेखीं जुन्या झाल्या होत्या. माझ्या आशांना नवा मोहोर येत होता आणि तिच्या आशा गतस्मृतींत विरघळून गेल्या होत्या. त्यामुळें तिच्या आणि माझ्या चालीचा ठेका जुळत नव्हता. माझ्या दृष्टीचा आशय, माझ्या बोलण्याचा अर्थ, माझ्या अुत्सुकतेची जाणीव, आणि माझ्या रोमरोमांत फुलून अुठणारा तारुण्याचा अुन्माद.. या साऱ्यांकडे ती आळसावलेल्या नजरेनं पहात होती. तिच्या ओठांतून बाहेर पडणारे शब्द अुत्सुक तरुणीचे नसत. तिच्या तरुण देहांतून जणूं कंटाळलेला जीव बोलत होता. तिची प्रत्येक हालचाल, कृति, तिच्या प्रेमाची रीत हीं सारीं पेंगुळलेलीं होतीं. वैवाहिक जीवनापासून ती फटकून दूर अुभी होती. तिच्या नजरेंत निराशा होती. तिची दृष्टि भूतकाळावर स्थिरावली होती. वर्तमानकाळाची मौज लुटण्याची तत्परता तिनं कधीं दाखवली नाहीं कीं भावी काळाचीं रम्य स्वप्नं तिच्या डोळ्यांपुढें तरंगलीं नाहींत. यंत्रासारखी ती कर्तव्यकर्म करीत होती. हें माझ्या ध्यानांत आलं तेव्हांपासून तिच्या स्पर्शानं माझ्या अंगावर काटा येईनासा झाला, अितका तो स्पर्श चेतनाहीन, थंडगार फत्तरासारखा होता. ती जीवंत माणस आहे असं

सुद्धां मला वाटेना. अेखादी दगडाची पुतळी सजीव होअून वावरत आहे असं वाटे. याचं कारण अेकच, कीं ती अजून आपल्या पहिल्या नवऱ्यावर प्रेम करते आहे, त्याच्याबरोबर तिनं यौवनाचा बहर लुटलेला आहे. मला नवं असलेलं जग तिनं आपल्या पहिल्या नवऱ्याबरोबर अनुभवलेलं आहे. तिला नवं असं कांहीं राहिलेलं नाहीं. ती माझी पहिली बायको असली तरी मी तिचा दुसरा नवरा आहें. तिला आपल्या पहिल्या नवऱ्याची आठवण होऊं नये असं म्हणण्याअितका मी रानटी नाहीं. तिचं माझ्यावर प्रेम नाहीं असं समजण्यापूर्वी ही आपल्या नवऱ्याशीं माझी तुलना करीत असेल काय अशी शंका मला येई. पण मी तेवढं मनावर घेतलं नाहीं. पण तिनं मेलेल्या नवऱ्याचे येवढे देव्हारे माजवावे हें मात्र मला सहन होत नाहीं. तुम्ही मला वेडा म्हणा, खुळा म्हणा. पण तिनं त्याच्यावर प्रेम करावं हें मला खरोखरी आवडत नाहीं. तिचं मन आकर्षून घेण्याचं सामर्थ्य, ज्याच्या देहाची तीन चिमूटसुद्धां राख उरली नाहीं त्या अपार्थिव नवऱ्यांत असावं आणि माझ्या जिवंत मनाचा आणि देहाचा तिनं मुळींसुद्धां विचार करूं नये याचा मला विलक्षण संताप येतो. तिच्या नवऱ्याचा मला मत्सर वाटतो. काय करूं, शक्य नाहीं म्हणून मला हात चोळीत स्वस्थ बसावं लागत आहे. पण असं वाटतं कीं तो जर जिवंत असता तर या, या हातांनीं मी त्याला होत्याचा नव्हता करून टाकला असता. पण त्याला अस्तित्व नसून तो माझा छळ करतो आहे आणि मला अस्तित्व आहे तरी मी अस्तित्वशून्य झालों आहें. तिच्या या वागण्याचा मला अर्थच समजत नाहीं. दुसरं लग्न करण्यांत आपण चूक केली असं तिला वाटत आहे आणि पहिलं लग्न करण्याची आपली तऱ्हा चुकली असं मला वाटत आहे. यांतून मार्ग...मला तरी सुचत नाहीं.'

तक्क्याला टेकून जोशी हताशपणें बसले. जोशांची हकीकत अेकत असतांना परुळेकर आपल्या मनाशीं जुळवाजुळव करीत होते.आपल्याहि दुःखाला वाचा फोडावी असा अुमाळा त्यांना आंतूनच येत होता. ते म्हणाले, ' संथ जलाशयाच्या पोटांत मासे, बेडक्या किंवा शेवाळं असावं, पण तें आहे असं वरवर पहाणाराला मात्र दिसूं नये तसं आपलं होतं. जोशानं आपली हकीकत सांगेपर्यंत मी असं समजत होतों कीं जोशी फार सुखी आहे. माझ्याहि

बाबतींत कुणी असं गृहित धरलं तर तें वावगं होणार नाहीं. पण वस्तुस्थिति मात्र अगदीं अुलट आहे. सुधारणेच्या नादानं नव्हे तर प्रेमांत पडलों म्हणून मी प्रेमविवाह केला आणि आतां तोंडघशी पडल्याचा पश्चात्ताप मला होत आहे. प्रेमांत मी कसा पडलों हें सांगण्याचा खटाटोप करीत नाहीं. तरुण वय, स्त्रीसहवासाची अुत्कट अिच्छा आणि सांसारिक सुखाचं काल्पनिक अिंद्रजाल, अशा अनेक गोष्टीच्या जाळयांत मी सांपडलों होतों. जेव्हां कांहीं कळत नस े तेव्हां कळतं आहे असं वाटण्याचा तो माझा काळ होता. शरयूशीं लग्न केल्यावर माझ्या आयुष्यांत निर्माण होणाऱ्या नंदनवनाचीं चित्रं मी पहात होतों. आमचं अेकमेकांवर अितकं गाढ प्रेम होतं कीं माझ्या वैवाहिक जीवनांत अडचण, गोंधळ, भांडण, वितंडवाद यांचं काहूर कधीं काळीं अुठेल अशी मला निसटतीसुद्धां शंका आली नाहीं. तिचा स्वभाव मला जितका समजला आहे तितका कोणालाच कळलेला असणं शक्य नाहीं अशी मला घमेंड होती. तिला मी सौंदर्याची पुतळी आणि सद्‌गुणांची खाण समजत होतों. वास्तविक प्रत्येक जोडपं असा गोड गैरसमज करून घेत असलं तर त्यांत वावगं काय आहे? मला वाटतं प्रत्येकाचंच सुरुवातीस हें असंच होत असावं. निदान माझं तरी असं झालं.

'पण पुढें अेकेक गोष्टीचा नव्यानं शोध लागूं लागला. ज्या स्वभावाला मी हौशी आणि लाडिक समजत होतों तो स्वभाव लहरी आणि हट्टी होता. हिटलरशाहीचा वारसा तिच्या रक्तांतूनच वहात होता. तिला हवी असलेली वस्तु तोंडांतून अुच्चारण्याचा अवकाश, तिच्यासमोर हजर झालीच पाहिजे. जोशांनीं आपली बायको हट्ट करीत नाहीं, जास्त समंजसपणा दाखवते अशी तक्रार केली आहे. पण हट्टी बायकोच्या यातना त्यांना माहीत नाहींत म्हणून ते तसं म्हणतात. पण मला क्लेश माहीत आहेत. अेखाद्या हूडेलहप्पी आणि रानवट पुरुषाला सुतासारखा मऊ आणायचा असला तर शरयूसारखी खबरदार बायको त्याच्या गळयांत बांधावी. लांडग्याचा कोकरूं झालाच पाहिजे. शरयूला बाजारांत दिसणाऱ्या प्रत्येक वस्तूचा हव्यास आहे. आमचं घर म्हणजे पदार्थसंग्रहालय झालं आहे. मला जास्त सामानाचा अगदीं तिटकारा आहे, तर सामानाची खेचाखेच करण्याचा तिनं विडाच अुचलला आहे.

जगांतल्या कोणत्याहि वस्तूचा नमुना आमच्या घरीं तुम्हांला मिळेल. पुन्हां गंमत अशी कीं, या हावरेपणाच्या जोडीला अव्यवस्थितपणाची जोड आहे. ज्यावेळीं जें हवं असेल तें कधीं मिळायचं नाहीं आणि तें मिळालं नाहीं, कीं घरांत हें नाहीं तें नाहीं अशी तिची तक्रार सुरू होते. माझ्या पगारावर ती संतुष्ट नाहीं. मला पांचशें रुपये मिळत नाहींत म्हणून. ती मला बावळट समजते. त्यांतच संसारांत जरूर नसतांना दोन मुलांनीं भर टाकली आहे. शरयूला काम करण्याचा कंटाळा. मुलं, ती, सामान आणि तिचा तो तोंडाचा पंजाबमेल पट्टा यांचा रामरगाडा सारखा चालू असतो. हल्लीं त्या घरांत शांतता आहे म्हणून घरांत पाऊल ठेवतांना आपण चुकलों तर नाहीं अशी मला शंका येते. एरवीं म्हणाल तर घरांत पाऊल ठेवण्याचीसुद्धां मला अिच्छा होत नाहीं. लग्नापूर्वीं मी तिला कोकिळकंठी मैना समजत होतों. पण छे ! ती साळुंकी आहे. मला वाटतं लग्नाची वाट पहाण्यांत सुख आहे. प्रत्यक्ष लग्नांत मात्र नाहीं. मला जर हें आधींच समजलं असतं तर मी जन्मभर तिची वाट पहात बसलों असतों. पण या तापत्रयांतून तरी वाचलों असतों.

‘ तिला पुष्कळ आंजारून गोंजारून, थोडंसं रागावूनसुद्धां समज दिली. पण तिचं तें खर. अेखाद्या वेळीं मनांत येअी, कीं पूर्वींचे नवरे आपल्या बायकांना अधूनमधून अेखादी चपराक ठेवून देत तो प्रयोग करून बघावा म्हणजे हें ताठ कातडं अंगावरून वारं गेल्याप्रमाणें ढिलं पडेल. पण झालें तें अनपेक्षितच. तुम्हांला किती उदाहरणें सांगावींत ? पण अेकच सांगतों. रंगीत पाट आणावेत अशी तिची माझ्यामागें भुणभुण होती. मी म्हणालों, ‘ आहेत हे पाट काय वाईट आहेत ? शिवाय महागहि फार झाले आहेत. आणि माझ्याजवळ पैसे नाहींत ही सर्वांत मोठी अडचण आहे. ’

‘ एवढं म्हणायचाच अवकाश ! शब्दांच्या लाह्या फुटूं लागल्या : जन्मदरिद्री आहांत तुम्ही. कांहींहि आणायला सांगा, म्हणे पैसा नाहीं. अहो मग आहे तरी काय तुमच्याजवळ ? हौस मौज मनालाच नाहीं मग पैशाला कुठून असणार ? दोन मुलं दिलीं देवानं सोन्यासारखीं, पण यांचं मन सदा आंबलेलं अन् चिंबलेलं. पाट आणणार आहांत कीं नाहीं तुम्ही ? ’

सोन्यासारख्या मुलांना धपाटे घालीत तिनं मला जाब विचारला.

'नाहीं' म्हणून मी बाहेर पडलों.

जेवायच्या वेळेला पुन्हां घरीं आलों.

अहो, घरांत बायको असल्यानं खानावळींत जेवणाचेंहि सुख मिळत नाहीं. जेवायला गेलों. पहातों तों बसायला पाट नाहींत. मी म्हणालों, 'हें काय ? पाट कां नाहींत बसायला ? आज पाट कुठें गले ? '

'पाट गेले चुलींत.'

'म्हणजे ? '

'म्हणजे मी ते जाळले. आजचं जेवण पाट जाळूनच केलं आहे.'

'मी तिरमिरीसरशीं अुठलों आणि ती भाकरी थापीत होती तिला तशीच उभी करून तिच्या फाडफाड चार कानशिलांत लगावल्या. रागानं ती हिरवी पिवळी झाली आणि पहातां पहातां धाडकन् जमिनीवर पडली. तिला फिट आली होती.

'पुढचं वर्णन मी सांगत नाहीं. पण तेव्हांपासून फिटचं प्रकरण सुरू झालं आहे. अशा बाअीपुढं कोणी जरी प्रतापराव आला तरी तो काय तिच्यापुढं रडणार? मी तरी अगदीं रकमेस आलों आहें. तिच्याविरुद्ध अेक शब्द बोललात तरी ही धाडकन् अंग टाकून देते. तिच्या मनाविरुद्ध वागण्याची सोय नाहीं आणि मनाप्रमाणें वागणं शक्य नाहीं. कित्येकदां वाटतं तिचं हें ढोंग आहे. डॉक्टरनीं मला तसं लांबून सुचवलं आहे. पण या ढोंगावर तोडगा काय ? जोशी तळमळत आहेत आपल्या बायकोनं आपल्यावर प्रेम करावं म्हणून पण माझ्या बायकोनं माझ्या प्रेमाची अशी खिरापत करून टाकल्यापासून मला मात्र ेमाची शिसारी आली आहे. बायकोचं प्रेम ही अिगळोची नांगी आहे. तुम्ही तिच्या प्रेमांत पडलात कीं पदरांत नुसत्या यातना, निव्वळ क्लेशच यायचे. तिनं माझ्यावर प्रेम करावं या कल्पनेचा मी धसका घेतला आहे. फार काय पण प्रेम या शब्दाचीच मी धास्ती घेतली आहे. तिच्यावरच काय पण जगांत मी कुणावरच प्रेम करणार नाहीं. तिच्या या जीवघेण्या प्रेमांतून कोणी माझी सुटका करील तर मी त्याचा जन्मभर गुलाम होअून राहीन.

'तिच्याकडे पाहिलं कीं माझं मलाच कधीं कधीं नवल वाटतं—' घारपुरेनीं दिलेलं पाणी पिअून परुळेकर पुन्हां बोलूं लागले, 'नवल याचं वाटतं

कीं या मूर्ख, हावऱ्या, डाकिणीवर मी भाळलों तरी कसा ? तिचा तो कच-कचाट, तिच्या त्या फिट्स, तिचा तो सदा असमाधानी, रागीट, चवताळलेला चेहरा आणि चिरचिरा आवाज यांना मी गोड स्वभाव आणि सौंदर्य-गुण समजत होतों तेव्हां माझ्या गाढवपणाबद्दल माझी जेवढी पाठ थोपटावी तेवढी थोडीच आहे. खरंच, मी तिच्यांत काय पाहिलं आणि अितके दिवस मी कशावर प्रेम करीत होतों हेंच मला आतां कळत नाहीं. मला वाटतं आपण आपल्या कल्पनेवर प्रेम करीत असतों. आपल्या भावनेवर आपला जीव असतो. (ती संभाळली जाते तोंपर्यंत आपल्याला तें माणूस हवं असतं. पण आपल्या भावनेला धक्का बसला कीं तें माणूस डोळ्यासमोरसुद्धां नको होतं.) अेकट्या जीवनाचा जोशीबुवांना वीट आला आहे. मला जानवं तोडून हिमालयांत जावंसं वाटतं. अेकटं रहाण्यासाठीं माझा जीव तळमळतो आहे. दोन्ही मुलांना घेअून ती माहेरीं गेल्यापासून मी फार सुखी आहें. ती लौकर तर परत येणार नाहीं ना अशी शंका येअूनच मी अस्वस्थ होतों. छे ! मला ती नको आहे. तिच्यापासून दूर पळून जावं असं मला वाटतं. तिचं तें फेफरं नाक, तो फाजील चरबी वाढलेला वाटोळा देह, तिचा तो खोटा नटवेपणा आणि तिच्या मनाची ती असंस्कृत रानटी बैठक..छे छे ! माझ्या जागीं दुसरा असता तर तो अेव्हांना केस पिकून माळ ओढीत बसला असता. विवाह हा जुगार आहे हेंच खरं. प्रेमविवाहाच्या माझ्या रम्य कल्पनेला माझ्या बायकोनंच काडी ओढून लावली आहे. माझं दुःख तुम्हांला सांगून समजायचं नाहीं. विलायतेंत असतों तर मी केव्हांच घटस्फोट घेतला असता. जोशी पुष्कळ नशिबवान आहे. त्याच्या जागीं मी असतों तर ?'

'पण मला वाटतंय् कीं तुझीच भूमिका माझ्यापेक्षां सोपी आणि सरळ आहे. फाडफाड बोलून अेखाद्या गोष्टीचा फडशा तरी पाडतां येईल. पण मला तोंड दाबून बुक्क्यांचा मार झाला आहे. ' जोशी म्हणाला.

जोशी परुळेकरांपेक्षां घारपुरे वयानं थोडे मोठे होते. संसाराचा अनुभव त्यांना अधिक होता. आतां आपली पाळी हें ओळखून त्यांनी अेक लांबलचक सुस्कारा सोडला आणि म्हणाले, ' जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.' तुम्हां दोघांपेक्षां माझी हकीकत फार निराळी आहे. माझं लग्न माझ्या वयाच्या

१९ व्या वर्षी आमच्या तीर्थरूपांनीं देवदेवक ठेवून केलं. मी तेव्हां नुकताच कॉलेजांत जाऊं लागलों होतों. मुलगी काळी कीं गोरी हें सुद्धां मी पाहिलं नव्हतं. माझ्या लग्नाला आतां अठरा वर्षं झालीं. तो काळ आणि त्यांतल्या त्यांत आमचं घर फार जुनं होतं. मला स्वतःला आपल्या पायावर उभं राहयला लागल्याशिवाय लग्न करायचं नव्हतं. पण माझे वडील जमदग्नीचा अवतार होते. त्यांच्या शब्दाबाहेर जाण्याची अेकाहि माणसाची प्राज्ञा नव्हती. मला त्यांनीं मुलगी दाखवलीसुद्धां नाहीं. लग्न न करण्याचा निश्चय बाबांना बोलून दाखवावा असं अनेकदां मनांत येअी. पण विरोधाची भुणभुण आअीच्या कानांवर घालण्यापलीकडे मी कांहीं करूं शकलों नाहीं. माझी आअी बिचारी बाबांची बंदी गुलाम होती. नवऱ्याची अिच्छा आणि मुलाचं लग्न या दोन्हीसाठीं ती आटापिटा करून घेत होती. माझा विरोध बाबांच्या कानापर्यंत गेलाच नाहीं आणि अखेर मी लग्नाला उभा राहिलों. लग्नाच्या वेळीं माझ्या बायकोचं वय १५ आहे असं सगळीं म्हणत होतीं. पण ती माझ्या बरोबरची दिसत होती. यावरून तिच्या धिप्पाड देहाची तुम्हांला कल्पना आली असेल. तिच्या आणि माझ्या रूपाचं वर्णन मी काय करूं? माझं रूप तुमच्यासमोर आहेच. पण याहिपेक्षां मी त्यावेळीं चांगला दिसत असावा असं माझ्या फोटोवरून वाटतं. आमच्या घरांत माझ्याअितका देखणा आणि कॉलेजचं शिक्षण घेणारा असा मीच अेकटा होतों. लग्नाची मला यावेळीं अिच्छा नव्हती. तरी माझ्या भावी पत्नीबद्दलच्या अपेक्षा निर्माण होऊं लागल्या होत्या. निदान जेव्हां त्यांना मूर्त स्वरूप आलं असतं तेव्हां माझ्या बायकोसारखं चित्र माझ्या स्वप्नांतसुद्धां आलं नसतं. पण माळ घातल्यानंतर जेव्हां मी माझ्या अर्धांगीकडे पाहिलं तेव्हां मला विहिरींत जाऊन जीव द्यावासा वाटला. असं वाटलं कीं मोठ्यानं ओरडावं, 'ही माझी बायको नाहीं. मला ही आवडत नाहीं.' पण मी बाबांच्या हातचं दुबळं बाहुलं होतों. रंगानं काळ्या, डोळ्यानं तिरळ्या आणि हाडापेरानं माझ्याअेवढ्या अशा अेका नकट्या मुलीचा—मुलीचा कसला, बाअीचा—नवरा होतों. मीच लहान आणि नाजूक होतों तिच्यापुढं. पण मी तिचा हात धरून सप्तपदी केली आणि तिला जन्मभर सांभाळण्याची शपथ घेतली.

'त्यावेळच्या माझ्या मनःस्थितीचं वर्णन मी कसं करूं? माझ्यासारख्या शिकलेल्या, रसिक, आनंदी, सुस्वरूप माणसाला अेका कुरूप आणि निरक्षर स्त्रीशीं संसार करण्याचा प्रसंग यावा यासारखा दैवदुर्विलास तरी कोणता असेल? मी अमृत पिणार होतों पण माझ्यापुढें काडेचिराअिताचा काढा आला. आयुष्यभर हंसावं, खेळावं असं वाटण्याच्या वयांत माझ्यावर कपाळावर हात मारून घेण्याची पाळी आली. तुम्ही मला दुबळा म्हणा हवं तर, पण माझ्यापेक्षां यांत वडिलांचाच दोष अधिक होता. माझा कांहीं अेक अपराध नसतांना माझ्यावर ही जन्माची सक्ती आली होती. या मुलीशीं काय बोलावं, कसं वागावं, हिच्यावर प्रेम तरी कसं करावं असं मला वाटे. प्रथम कांहीं दिवस डोकं शांत ठेवण्याचा मी प्रयत्न केला. पण मला असं समजलं कीं तिच्या बापानं आठ हजार रुपये हुंडा दिला म्हणून माझ्या वडिलांनीं माझ्या गळ्यांत ही घोरपड बांधून माझा गळा कापला. हें ज्या दिवशीं मला समजलं त्या दिवशीं संतापानं मी अक्षरशः वेडा झालों. आणि यापुढें बाबांचा आणि बायकोचा संबंध नको. म्हणून मी अेक दिवस घर सोडून पळून गेलों.'

'पळून गेलांत?' परुळेकर.

'हो. पळून गेलों. मी दाढी वाढवली. जटा वाढवल्या. अेका बैराग्याच्या मठांत जाअून राहिलों आणि माझ्या परिस्थितीपासून शक्य तेवढा दूर जाण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. मला माझ्या घराशींच काय पण जगाशींसुद्धां संबंध ठेवण्याची अिच्छा उरली नाहीं. मला माझी, बायकोची, बाबांची साऱ्यांची शरम वाटत होती. तिचा नवरा म्हणवून घेण्यांत मला मरणप्राय दुःख होत होतं. तिच्याशीं अेक अक्षर बोलण्याचीसुद्धां मला शिसारी येत होती. कुरूप आणि अडाणी मुलीशीं संसार करणं म्हणजे जन्मभर केवढी भयंकर शिक्षा असते याची तुम्हांला कल्पना येणार नाहीं. अशा विद्रूप मुलीचा पाश माझ्या गळ्याशीं आवळून बाबांनीं माझ्या आयुष्याचा खेळखंडोबा करून टाकला होता. विचार करून करून माझ्या डोक्याच्या अक्षरशः चिंधड्या अुडाल्या. मी पळून गेल्यामुळें आमच्या घरांत अेकच हाहाःकार अुडाला होता. माझा तपास त्यांनीं बरेच दिवस केला आणि अखेर अेक दिवस मी त्यांना सांपडलों. माझं मन वळवण्याचा खूप प्रयत्न झाला. अखेर बाबांनीं

आपल्याच थोबाडींत मारून घेतल्या. सासऱ्यांनीं माझ्यापुढें नाकदुऱ्या काढल्या. आणि आओी बिचारी आपल्या स्वभावाप्रमाणें माझ्याच पाया पडूं लागली.

' कॉलेजचा अभ्यास तसाच अर्धवट राहिला होता. चरितार्थाची सोय तर नव्हतीच. मग असं बैराग्यासारखं राहून मी काय मिळवणार होतों ? तेव्हां मी मग घरीं आलों.

' अेखाद्या दु:खावर काळ हीच मोठी औषधी आहे. दु:खाची तीव्रता काळानं कमी होते. माणसाला विचार सुचूं लागतात. त्यांतूनच मार्ग निघतो. माझं तसंच झालं. मी विचार केला कीं त्या मुलीला रूप नाहीं हा तिचा दोष आहे काय ? ती अशिक्षित आहे त्यालाहि केवळ तीच जबाबदार आहे काय ? माझ्याशीं लग्न लावण्याचा तिनं का हट्ट घतला ? तिच्याहि अंगीं चार चांगले गुण असतील. मोठ्या माणसांनीं केलेल्या गुन्ह्याचं खापर आपण तिच्या डोक्यावर काय म्हणून फोडावं ? तिच्याशीं बोलूं लागलों. तिला शिकविण्याचा प्रयत्न करूं लागलों. आपला अजागळ पोशाख सोडावा म्हणून खटपट करूं लागलों.

' पण खरं सांगूं ? माझा जीव त्या मुलीवर लागेचना. प्रेम असं बळजबरीनं अुत्पन्न होत नसतं हेंच खरं आहे. मी अितका प्रयत्न केला पण चार बाराखड्यां-पलीकडे तिची प्रगति झाली नाहीं. त्यामुळें तिच्या त्या निर्बुद्ध मनाची आणि कुरूप देहाची मला शिसारी आली. मी आनंद शोधायचा प्रयत्न करीत होतों. तिला शहाणी करण्याची धडपड करीत होतों. पण ती जातिवंत मूर्ख होती. तिच्या माझ्यांतला फरक तिला कधीं समजलाच नाहीं. माझी कुचंबणा तिनं कधीं उघड्या डोळ्यांनीं पाहिलीच नाहीं. चोवीस तास मी तिच्याभोंवतीं पिंगा घालावा असं तिला वाटे. तिनं माझ्या मनासारख्या, मला आवडतील अशा चार गोष्टी केल्या असत्या तर मी तिचा विचार अधिक केला असता. तिला थोडी जरी देवानं बुद्धि दिली असती तरी मी तिच्या कुरुपतेकडे डोळे-झांक केली असती. तिच्या बुद्धीवर तरी मी निश्चित प्रेम केलं असतं. कारण माझा तसा प्रयत्न होता. तिच्याशीं संसार करणं हें मी माझ्यावर लादलेलं का होओीना, पण अेक कर्तव्य समजत होतों. तेंहि अेकाच हेतूनं. तिचं नुकसान आपण करूं नये. मीच तिच्या जागीं असतों तर ? पण तीच माझ्या जागीं

असती तर तिनं किती चांगुलपणा दाखवला असता असा मात्र तिनं कधीं विचार केला नाहीं. पण आज १८ वर्षं मी तिच्याशीं शांत डोक्यानं संसार करीत आलों आणि अजून करतों आहें. पण यांत माझ्या जीवाची कुचंबणा, मला करावं लागलेलं दिव्य.. त्या यातना माझ्या मीच जाणें! स्त्रियांची कुचंबणा होते असं सारेजण म्हणतात. पण माझ्याबाबत तरी मी असं निःशंक-पणानं म्हणूं शकतों कीं गेलीं १८ वर्षं मी नुसती कुचंबणा सहन करतों आहें. माझ्या चार मुलांची ती आई झाली आहे. पण अितक्या वर्षांत मला अेकदां-सुद्धां असं वाटलं नाहीं कीं हिच्याजवळ आपण बोलत बसावं. छे! ती निराळीच आहे. पैसा अडका, मुलं बाळं आणि आपल्या माहेरच्या माणसांचा गोतावळा जमा करून बसण्यांत ती स्वतःला धन्य समजते आहे. 'माझा नवरा माझ्यावर प्रेम करीत नाहीं, माझी हेळसांड करतो, माझ्याकडे त्याच लक्षच नाहीं' असं आणखी लोकांना सांगत असते. अेका दृष्टीनं तिचं नुकसान झालं हें खरं आहे. पण त्याला मी जबाबदार नाहीं. माझ्याकडून मी तिला दुखवली नाहीं. आपल्याला न आवडणाऱ्या माणसाशीं जन्मभर बांधून, कोंडून घ्यायचं ही केवढी जबरदस्त शिक्षा आहे याची तिला कल्पना नाहीं म्हणून ती असं म्हणते.

'मी घरांत लक्ष देत नाहीं. काय लक्ष द्यायचं घरांत? मी घरांत पहात नाहीं म्हणूनच घरांत थोडीशी शांतता आहे. मी फक्त तिला पैसे देतों. बाकी सगळे व्यवहार तिच्या मनाप्रमाणें चालतात. कित्येकदां खानावळींत जेवतों. दूध फळावर रहातों. उरलेल्या वेळांत मी माझी वकिली संभाळतों. मी व्यसनांत सांपडलों नाहीं ही माझ्यावर प्रभूची आणि तिच्यावर माझी केवढी कृपा आहे! तिनं थोडंसं तरी समाधान कां मानून घेऊं नये? मी अेका अक्षरानं तिला बिरोध करीत नाहीं. परवां तिनं सोन्याच्या पाटल्या विकल्या त्या पैशांचं तिनं काय केलं तें मला ठाऊक नाहीं. दोन महिन्यांपूर्वी चारशें रुपयांचं कापड घेऊन आली आणि तें बिल मला भरावं लागलं. अशानं माझ्या पैशालासुद्धां ओहोटी लागेल हा साधा विचार तिला अजून कळत नाहीं. घरांत तर अेक क्षणभरसुद्धां मला बसावंसं वाटत नाहीं. घरांत माणसां-च्या नुसता पांजरपोळ अुघडलेला आहे. त्यांचा कलकलाट, हिचा कच-

कचाट आणि तें स्नेहशून्य वातावरण यानं मी कसा आंबून जातों. हें नकोच म्हणून झोपेशिवायचा सगळा वेळ मी बाहेर काढतों. लग्न झाल्यापासून मी घराला पारखा झालों आहें. गेलीं अठरा वर्षं मी जणुं कांहीं अेखाद्या खाना-वळींत रहातों आहें. समाधानी आणि आनंदशोधक वृत्तीमुळें मी सदा माझं मन माझ्या व्यवसायांत आणि मित्रमंडळींत गुतवून ठेवतों. माझ्या खऱ्या मनापासून मी जसा कांहीं दूर रहात असतों. वैवाहिक जीवनाचं अपयश पहाण्याचं धारिष्टच मला होत नाहीं. पण कामानं दमून जेव्हां मी रात्रीं अंथरुणावर पडतों तेव्हां माझ्या जिवाची नुसती तगमग होत असते डोळ्यां-तून अश्रु ओघळूं लागतात. कुणासाठीं मी धडपडलों ? कुणासाठीं मी पैसा मिळवला ? कुणासाठीं मी जगलों ? या प्रश्नांची अुत्तरें मला देतां येत नाहींत. अवघड जागीचं दुखणं म्हणून कोणाजवळ बोलतांहि येत नाहीं. मी अेक कुटुंबवत्सल माणूस आहें. पण कौटुंबिक सुखाचा मला काडीमात्र अनुभव नाहीं. असं वाटतं कीं लग्न करून आणि चारपांच मुलांचा बाप होअूनहि मी अखेर अेकटाच राहिलों. पत्नीप्रेमाचा लेशहि नाहीं म्हणूनच कीं काय माझ्या मुलांचा लळा असा मला लागलाच नाहीं. तिच्यापासून दूर रहाण्या-च्या खटपटीमुळें मी अिच्छा नसतांना माझ्या मुलांपासूनहि दूरच राहिलों. अेकटेपणाचं दुःख मोठं बोचक असतं नाहीं ? पण हा नुसताच अेकटेपणा नाहीं. मला नको असलेल्या अेका मूर्ख स्त्रीशीं संसार करण्याची आपत्ति माझ्यावर ओढवली. या जबरदस्तीचा ताप अधिकच असह्य आहे. ज्या स्त्रीबद्दल आपल्या मनांत आस्था नाहीं, काडीमात्र आदर नाही तिच्याशीं जन्मभर प्रेमाचं नाटक करीत संसार करणं ही माझ्यावर विनाकारण जबर-दस्ती नाहीं असं तुम्ही म्हणूं शकाल ?'

घारपुऱ्यांना आणखी बोलावंसं वाटत होतं. पण कां कोण जाणें ! ते अेकदम थांबले. विशेष गंभीर न होणारे साखरदांडेहि सुस्कारा सोडून स्वस्थ बसले.

कुणालाच बोलण्याची अिच्छा होईना. पण थोडा वेळ गेल्यानंतर जोशी म्हणाले, 'अेकूण असं आहे तर ! तुमच्या चेहऱ्यावरचा प्रसन्न समाधानी भाव

पाहून तुमच्या मन:स्थितीची कोणालाहि कल्पना करतां यायची नाहीं. काय गंमत आहे ! माणसाला आयुष्यभर केवढं नाटक करावं लागतं !'

पुन्हां थोडा वेळ अगदींच शांत होतं. शांततेचा भंग करीत साखरदांडे म्हणाले,' किती अुदास वाटतं आहे नाहीं ? अेखाद्या माणसानं तुमच्या हकीकती अैकल्या तर लग्नसंस्थेबद्दल तो कायमची हाय खाईल. तुम्हां तिघांवरून सर्व जोडप्यांचा अंदाज कोणी घेतला तर कडवट निराशेनं ो शहारून निघेल. लग्न हें सुखासाठीं नसतं, माणसानं आपल्यावर ओढवून घेतलेली ही आपत्ति आहे असं त्याला वाटेल.'

'पण मला वाटतं घारपुरे सोडले तर प्रथमदर्शनी तुमच्या संसाराचा जेवढा विचका झालेला दिसतो तेवढा खरोखरी मला दिसत नाहीं. तुम्हां दोघांच्या तक्रारी सर्वस्वीं रास्त असतील असं मला वाटत नाहीं. तुमच्या बायकांनाहि कांहीं बाजू असेलच ना ? परुळेकरच्या बायकोनं त्याचं पाणी जोखलं आहे आणि जोशाच्या बायकोची अलिप्तवृत्ति जन्मभर अशीच राहील असं वाटणं म्हणजे मानसशास्त्राबद्दलचं मोठं अज्ञान आहे मला वाटतं तुम्हां दोघांना अितकं निराश होण्याचं कारण नाहीं. प्रत्यक्ष संकटापेक्षांहि संकटाच्या कल्पनेनंच तुम्ही घाबरून गेलेले आहांत. परुळेकरांनीं बायकोला माहेरीं पाठविण्याअैवजीं महिना दोन महिने आपणच कुठेंतरी निघून जायला हवं होतं आणि जोशानं आपल्याहि बायकोपेक्षां अलिप्तपणानं वागायला हवं होतं. तिच्याजवळ जाअून तिच्या भावना जागृत होणार नाहींत. तिनं पुनर्विवाह केला याचा अर्थ तिला सांसारिक सुखाची अभिलाषा निश्चित आहे. पण मनावरचे संस्कार तिला दूर सारतां येत नाहींत. पण सुखनिधान समोर असतांना हे संस्कार जन्मभर असेच टिकतील असं वाटतंय तुला ? माणसाला जसं सतत आनंदी रहायला मिळत नाहीं तसाच तो कायमचा दु:खीसुद्धां कधींच नसतो. जीवनाकडे पहाण्याची तुमची वृत्ति कुरकुऱ्या पाटलाची आहे. आपण अपेक्षासुद्धां किती ठेवाव्यात ह्याला तुमच्याजवळ तारतम्य दिसत नाहीं. जगांतल्या प्रत्येक सुखी जोडप्यानं आपले अनुभव सांगण्याचं ठरवलं तर तो सुद्धां असं सांगेल कीं ' अेक काळ आमचा थोडा आणीबाणीचा गेला. आमच्या वैवाहिक जीवनावरहि कांहीं काळ अभ्रं आलीं. आम्हांलासुद्धां रस्ता

दिसत नव्हता. आतां आम्ही जन्मभर असमाधानीच राहणार असं आम्हांला वाटूं लागलं. पण आपली अेकच अेक परिस्थिति कायम टिकत नसते, तिच्यांतहि बदल होत जातात हें सत्य ज्यानं जाणलं तोच खरा शहाणा होय. बहुतेक संकटांवर अुपाय असतात. आणि ते थंड डोक्यानं केले कीं माणसं त्यांतून निभावून जातात. आतां आम्ही सुखी आहोंत.

'पण तुम्ही हें विसरलां आहांत. बहुतेकजण हीच चूक करतात. आयुष्यांत संकटं नाहींत, माणसाच्या उभ्या आयुष्यांत अेकदां सुद्धां त्याची मति गुंग होत नाहीं, अेकदां सुद्धां त्याचं डोकं सुन्न होत नाहीं, अेकदां सुद्धां त्याच्या चित्तवृत्ति सैरभैर होअून जात नाहींत, असल्या अळणी, मिळमिळीत आयुष्याचा तुम्हांला कंटाळा वाटणार नाहीं? आपल्यावर आफत आली तर तिला चारीमुंडे चीत करून आपण त्यांतून सहीसलामत बाहेर पडावं असला धाडशी आनंद अुपभोगण्याची खुमखुमी तुम्हांला कां वाटत नाहीं? सुखाच्या कल्पनेनं जर आपण हुरळून जातों तर संकटाच्या कल्पनेनं आपल्या निरोगी मनाची नसन् नस खडबडून जागी कां होअूं नये? आमचीं मनं अेवढीं लेचींपेचीं कां असावींत कीं दुःखाच्या चाहुलीनं आम्ही लगेच माना टाकाव्यात? बहुतेक गोष्टींवर अुपाय असतो ही साधी गोष्ट आपण कशी बरं विसरून जातों? घरांत औषधं असावींत पण प्रसंगांत गांगरून जाअून त्यांची आपल्याला आठवणसुद्धां होऊं नये याला काय म्हणावं? दर वेळीं दुसरा माणूस आपल्यावर मात करतो याची तुम्हांला चीड कशी येत नाहीं? माफ करा हं! मी तुम्हांला व्याख्यान अैकवत नाहीं पण जोशी–परुळेकरांच्या दुखण्यावरचे अिलाज मला सुचले आहेत म्हणून मी विचारतों, बायकोला अलिप्त रहातां येतं मग जोश्यांनाच कां येऊं नये? तिचीं आर्जवं करणं हा त्यावरचा अुपाय नव्हे आणि परुळेकरांच्या बायकोला जर फिट आणतां येते तर परुळेकरांनाहि त्याच वेळीं तिच्याच शेजारीं धाडकन् अंग टाकून फेफरं कां आणतां येत नाहीं? याचं कारण अेकच, तुम्ही आपल्या बायकांना मार्गावर आणण्याचे प्रयत्न केलेले दिसत नाहींत. माणसांचे स्वभाव कसे असतात, तीं नाटकं कशीं करतात, त्यांच्या खोड्या कशा असतात, त्यांच्या संवयी काय असतात, माणसांचीं मनं किती विविध तऱ्हा दाखवितात त्यांचीसुद्धां हौशी मनानं मौज

बघायची असते. पण संसाराकडे या निरोगी दृष्टिकोनानं, विनोदबुद्धीनं आपण पहातच नाहीं. आपली दृष्टि सदा कारुण्याचीच.

'रागावूं नका. पण मला खरी अनुकंपा घारपुऱ्यांबद्दलच वाटते. त्यांनीं दुःखांतून मार्ग काढला आहे असं म्हणण्यापेक्षां त्यांना मार्गच उरला नाहीं असं म्हणणं अधिक बरोबर आहे. तरीसुद्धां त्यांनीं निर्णय घेतला आहे. पण त्यांचा विवाह हा खरोखरच उलटलेला जुगार आहे त्यांची या कुचंबणेंतून कधीं काळीं सुटका होईल असं मला वाटत नाहीं. पण जगांत ट्रॅजेडी फार आहे म्हणूनच माणसानं संसाराकडे निरनिराळ्या दृष्टिकोनानं बघायला शिकलं पाहिजे. रडायच्या वेळीं सारींच रडतात. पण त्यावेळीं सुद्धां हंसून गोड करणाऱ्या माणसाच्या सामर्थ्याची कसोटी लागत असते. आनद झाल्यावर माणूस हंसेल यांत नवल कसलं? पण दुर्दैवालाच अुपहासानं हंसणाराच्या ओठांत विषाचा प्याला पचविण्याचं सामर्थ्य असतं. आनंदानं नाचणाराच्या बेहोशींत अुन्माद असतो. पण दुःखांतसुद्धां अुत्साह दाखविणाराच्या हास्यांतच जगांतल्या समविषमतेवर काव्य रचलेलं असतं. आपल्या जीवनांत हें काव्य असावं असं नाहीं तुम्हांला वाटत? रडायचं. सारखं रडायचं! मग हंसायचं कुणी? या संसारांत हंसायचं तरी कुणी? तुम्हांला नाहीं हंसावंसं वाटत?

'वांझोटी रडते आणि सातपुत्रीहि अश्रूच ढाळते. विवाहिताला आपल्या लग्नाचा पश्चात्ताप होतो, आणि अविवाहिताला लग्न न झाल्याचं दुःख होत असतं. लग्न करून माणसं सुखी होत नाहींत आणि न करूनहि दुःख संपत नाहीं. मग हें दुःख संपणार आहे तरी कधीं? सुख केवळ मानण्यावर असतं असलं रुक्ष, पंडिती थाटाचं विधान मला करायचं नाहीं. विहिरींत असावं लागतं तेव्हांच पोहऱ्यांत अुतरतं हें मला माहीत आहे. पण पोहरा करणं तरी आपल्याच हातीं आहे ना? जोशी-परुळेकरांना आपल्या बायकांत सुधारणा झाली तर त्यांना त्या हव्या आहेत. म्हणजे यांच्या वांट्याला कोरड्या विहिरी आलेल्या नाहींत. घारपुऱ्यांचं दान मात्र उलटं पडलं आहे. संसाराच्या वाळवंटांतच त्यांच्या नशिबानं त्यांना ढकलन दिलं आहे. या वाळवंटांत आपल्या सौख्याची नदी दुथडी भरून वाहील आणि तिच्या कांठीं आनंदाचा मोहोर फुलेल असली आशा त्यांना करायला लावणें यासारखी निर्दय थट्टा

नाहीं दुसरी ! पण तरी ते हंसत आहेत. खोटं खोटं हंसत आहेत; आणि म्हणूनच माझ्यासारख्या बेछूट वृत्तीच्या माणसाच्या डोळ्यांतहि अश्रु जमा होत आहेत.

'माफ करा हं ! नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां मी फार मोठं व्याख्यान दिलं तुम्हांला. पण तें कसंहि असो. तुम्हां तिघांबद्दल मला फार सहानुभूति वाटते. पण तुम्हांला सांगायला मला आनंद वाटतो कीं मी अेक अत्यंत सुखी प्राणी आहें. माझी बायको मीच पसंत केलेली आहे किंवा थोडं फार मी लव्ह मॅरेज केलं आहे असंच म्हणाना ! तिचं नांव मी ज्योत्स्ना ठेवलं आहे. माझी बायको म्हणजे माझ्या संसारांत पडलेलं सुखाचं चांदणं आहे. तिच्या रूपाबद्दल, कामसूपणाबद्दल किंवा तिच्या बुद्धिमत्तेबद्दल माझी कसलीहि तक्रार नाहीं. मला शेळपट वृत्तीच्या, मेणचट मनाच्या स्त्रिया मुळींच आवडत नाहींत. 'जहांबाज' हा शब्द तुम्हांला कदाचित् कडू लागेल. पण फाड-फाड बोलणाऱ्या, तडफेनं वागणाऱ्या आणि आपल्या व्यक्तिमत्वाची जाणीव देणाऱ्या स्त्रियाच मला आवडतात. सुदैवानं माझी बायकोसुद्धां तशीच आहे. म्हणजे ती भांडखोर आहे असं तुम्ही समजूं नका. पण वाद घालण्यांत, शब्दानं अेकमेकांना अडविण्यांत आम्हांला अेक प्रकारची मौज वाटते. त्याचं मोठ्ठं कारण, सर्वसाधारण स्त्रियांत जो चिडकेपणाचा दुर्गुण असतो तो तिच्याजवळ मुळींच नाहीं. ती कधींच चिडत नाहीं. आणि मी तिच्याशीं अगदीं बरोबरीच्या नात्यानं वागतों. ती माझ्याशीं समरस झाली आहे याचा मला अनेकदां प्रत्यय येतो. पण तिनं आपलं व्यक्तिमत्व अबाधित ठेवलं आहे. माझीं सगळीं कामं तीच करते. पण थोडंसं जरी बरं नसलं तरी आपले पाय ती माझ्याकडून रगडून घेते. मधूनच ती सुद्धां हट्ट करते. पण तो हट्ट किती लडिवाळ असतो ! माझ्यावर ती संपूर्ण अधिकार गाजवते. पण माझ्या डोक्यावर ती चढून बसली असं मात्र मला कधीं वाटत नाहीं. तिच्या स्वयंपाकांत मी तिला मदत करतों. त्या वेळीं मी बाहेरच्या खोलींत वाचत बसावं हें तिला मुळींच आवडत नाहीं. आम्ही जेवायला अेक-दम बसतों. अजूनसुद्धां आम्ही अेकमेकांना घास देतों. रोज आम्ही फिरायला जातों. सिनेमा नाटकं आम्ही अेकमेकांशिवाय पहात नाहीं. कितीतरी पुस्तकं

आम्हीं अेकदम वाचतों. विनोदी पुस्तक असलं तर ज्योत्स्ना अितकी हंसते कीं अखेर ती जमिनीवर लोळण घेते. शिवाय आम्ही केरम खेळतों, पत्ते खेळतों, बॅडमिंटनसुद्धां खेळतों. गाण्याचा तिला थोडासा नाद आहे. आवाज थोडा घोगरा आहे. पण आमच्या शाअी अुडालेल्या तबल्यावर मी ठेका धरतों आणि भाता फुटलेल्या पेटीचा सूर धरून ती सिनेमांतलीं गाणीं म्हणते. तुम्हांला खोटें वाटेल पण कधीं कधीं ती मला नाचूनसुद्धां दाखवते. येत कांहींच नाहीं. पण आपले उगीच थोडे हातवारे. थोडा वेळ गंमत येते.

'परवांच मी तिला नव्या बांगड्या केल्या आहेत. तिच्या सावळ्या, गोजिऱ्या रूपाला त्या छान दिसतात. निदान मला तरी तसं वाटतं. मला वाटतं सौंदर्यशोधनाची माणसाला दृष्टि असावी लागते. ती सुंदर आहे असं कांहीं नाहीं. पण मी तिच्यांतच सौंदर्य शोधून काढतों. मोहकपणा हेंच तिच्या सौंदर्याचं वैशिष्ट्य आहे. तिच्या निरोगी, सतेज आणि हंसऱ्या चेहऱ्याकडे मी कित्येकदां अर्धाअर्धा तास पहात बसतों. मग काय होतं कुणास ठाअूक ! माझ्यापासून तिला मग दूर बसवत नाहीं. दिवसांतून किती वेळां ती 'अिश्श' म्हणत असेल कोण जाणे ! ती 'अिश्श' म्हणाली कीं मी तिला 'ओ' देतों. अेकदां तर दिवसांतून ती पन्नास वेळां म्हणाली, तितके वेळां मी काय केलं असेल असं वाटतंय तुम्हांला ? त्या पन्नास अिश्शना मी पन्नास चुंबनं घेअून अुत्तरं दिलीं.

तुमच्या पद्धतीनं दोषच काढायचा तर तो अेकच आहे. तिच्या प्रत्येक गोष्टीवर तिला माझा अभिप्राय हवा असतो. मी चांगलं म्हटलं, तिचे दोन्ही दंड धरून तिला अेकदां गदगदां हलवली कीं ती आनंदानं वेडी होते. त्यामुळें तिचा अेखादा पदार्थ मला जरी आवडला नसला तरी मी म्हणतों 'वा ! फार छान झाला आहे. माझ्या आअीचासुद्धां असा होत नव्हता.' 'खरंच ?' अेवढंच ती म्हणते आणि दोन पळ्या अधिक माझ्या पानांत घालते. माझी कुचंबणा होत असली तर अिथेंच. खारट पदार्थाला मी 'चांगला' म्हणतों आणि तिच्या मोहब्बतीखातर मला तो खावा लागतो. पण तिच्या गोड भावना आणि मोहक चेहऱ्याकडे पहात मी तो खारट पदार्थ हंसऱ्या मुखानं खातों.

आणखी अेक बारिकसा दोष सांगतों. तिला मधून मधून माहेरीं जायची

हुक्की येते. मला मात्र तें पसंत नसतं. ती घरांत नसली तर मला मुळींच चैन पडत नाहीं. मग अेखाद्या वेळीं तिच्या माहेरीं ती सहकुटुंब जाते. म्हणजे मला घेऊन जाते.

मला अकच मुलगा आहे. आणि तो सुद्धां नुसता गोटया आहे. त्याच्यावर अधिक प्रेम कुणाचं याच्यावरच आमचं भांडण होतं. तो कुणासारखा दिसतो यावरच आम्ही वाद करतों. पण मिस्टर, तुमच्या आणि आमच्या भांडणाची तऱ्हा फार वेगळी आहे. तुम्ही म्हणालां असतांत, 'मुलगा माझ्यासारखा दिसतो. माझंच त्याच्यावर प्रेम आहे.' पण आमचं याच्या उलट आहे. मी म्हणतों, 'राजा तुझ्यासारखा दिसतो.' ती म्हणते, 'छे! तो बापाच्या वळणावर गेला आहे' आम्ही कां म्हणतों माहीत आहे? आम्हांला दोघांनाहि स्वतःच्या रूपापेक्षां अेकमेकांचं रूप अधिक आवडतं. मी म्हणतों, 'राजावर माझ्यापेक्षां तुझं प्रेम जास्त आहे.' तिला तें पटत नाहीं. याचा खरा अर्थ आम्ही अेकमेकांवर फार प्रेम करतों.

'आपल्या मैत्रिणींजवळ ती माझ्याबद्दल किती अभिमानानं बोलत असते! अहो, अशा बायकोबद्दल नवऱ्याला तरी अभिमान वाटल्याशिवाय कसा राहील?

'माझं तारुण्य माझ्या बायकोनं मुळींच वायां घालवलेलं नाहीं. माझ्या सहवासांत ती मश्गुल असते. सगळया जगाचा तिला आणि मला विसर पडतो. तुम्हांला आणखी किती गोष्टी सांगाव्यात? तिच्या विणकामाच्या कुशलतेनं माझ्या घराला रम्यता आली आहे. भांडणं, रडारड, धुसपूस, उसासे यांतलं आम्हांला कांहीं माहीत नाहीं. आम्ही अितके सुखी आहोंत कीं जन्मोजन्मीं हीच बायको मिळावी अशी माझी परमेश्वराला प्रार्थना आहे.

'आणखी थोडं राहिलं. ती जरा ठेंगणी आहे. ठेंगणी आहे म्हणजे उंच नाहीं. आमच्या फळीवरचे डबे तिला मलाच काढून द्यावे लागतात. रात्रींच्या वेळीं किंवा जेवायच्या वेळेला मी घरीं यायला उशीर केला तर तें तिला मुळींच खपत नाहीं. शाळकरी पोरासारखें ती मला कान धरून अुठाबशा काढायला लावते. भिंतीकडे तोंड करून उभा करते. अरे हो, किती वाजले?' साखरदांडे लगबगीनं उठत म्हणाला, 'आज संध्याकाळीं सात वाजतां ती परत यायची आहे. मला स्टेशनवर गेलं पाहिजे. गोटया, सामान, आणि ती.

सामानाचा डोंगर आणला असेल तिनं. मित्रहो, माझ्या संसाराचं समाधान तुम्हांला सांगून झालेलं आहे. जातों मी. बाय बाय.'

साखरदांडे झटक्यानं निघून गेला.

साखरदांडेचं व्याख्यान आणि त्याच्या सुखी संसाराचं वर्णन अैकून परुळेकर–घारपुरेना आश्चर्यानं झीट यायची वेळ आली होती. परुळेकरांनीं जोशांना विचारलं, 'खरंच? अेवढा सुखी आहे हा प्राणी? त्याची बायको अेकदां बघितली पाहिजे.'

जोशी अेक सुस्कारा टाकून उद्गारले, 'छे! अविवाहित आहे साखरदांडे!'

# मधूची आओी : : २

शिवण्याचं यंत्र पुढं ठेवून मधूची आओी कपडे शिवीत होती. दुपारचे तीन वाजायला आले होते. पोष्टमन यायची वेळ झाली होती. मधू आओीला नियमित पत्र टाकीत असे. त्यामुळं आज त्याचं पत्र येओील असा तिचा अंदाज होता. शिवणाकडे तिचं लक्षच नव्हतं. पोष्टमन येअून गेला म्हणजे मग ती चहा करून पिणार होती. तिचा अपेक्षाभंग झाला नाहीं. पोष्टमननं दारांतून अेक कार्ड भिरकावलं आणि मधूच्या आओीनं तें लगबगीनं अुचललं. तिचा मधू आज रात्रीं येणार होता! मधूची आणि त्याच्या बायकोची आठवण होतांच त्या आपल्याशींच हंसल्या आणि स्वतःशींच पुटपुटल्या, 'परवांपरवां मधू अगदीं लहान होता आणि आतां अेकदम मोठा झाला. अेवढा मोठा कीं त्याला बायकोसुद्धां आली!'

मधूच्या आओीनं शिवण्याचं यंत्र कोपऱ्यांत ठेवून दिलं. स्टोव्ह पेटवला, चहा केला आणि तोंडाला बशी लावतांलावतां तिला पंचवीस वर्षांपूर्वींची आठवण झाली—

मधूचा जन्म झाल्यापासून तिला सारीं 'मधूची आओी' म्हणूनच ओळखीत. गंगाधरपंतांची पत्नी सावित्रीबाओी असं फारच थोड्यांना माहीत होतं. कारण मधूचा जन्म होण्यापूर्वींच दोनतीन महिने गंगाधरपंत सर्पदंशानं गेले. कल्पना नसतांना मधूच्या आओीवर हा आघात झाला आणि मग पुढं मधूचा जन्म झाला. तेव्हां तिचं वय फार तर सतराअठरा वर्षांचं असेल. मधूमुळं तिला सगळीं 'मधूची आओी' असंच म्हणत. तें नांव अैकून अैकून तिच्याहि मनांत अेक दिवस आलं कीं, 'बाओी ग, तुझं पत्नीचं आयुष्य संपलं. तूं आओी झालीस. याच भूमिकेचीं कर्तव्यं तुला बजावलीं पाहिजेत. तूं तरुण आहेस. हें तुला विसरलं पाहिजे आणि आओी आहेस हें ध्यानांत ठेवलं पाहिजेस.'

मधूची आओी मी खरोखरीच 'मी आओी आहें, मी मधूची आओी आहें' हा मंत्र अहोरात्र घोकीत राहिली.

मधूची आओी चार अक्षरओळखीपलीकडे शिकलेली नव्हती. प्रथम कांहीं दिवस तिला तिच्या विधवा आओीनं आपल्या घरीं नेलं होतं. पण भरींत भर आणि जन्मभर लाचारी हें मधूच्या आओीला आवडण्यासारखं नव्हतं. तिनं विचार केला कीं लग्न झालं म्हणजे आओीबापाच्या घरावर आपला हक्क नाहीं. जिथं हक्क असायचा तिथला मालक अुठून गेला. आपण धर्मशाळेचे धनी बनलों. पण मधू घर बांधील तेव्हां घर म्हणायचं. तोंपर्यंत . . .

मधूची आओी शिवण शिकली. कपडे शिवून देअूं लागली. तिचा मधू मग शाळेंत जाअूं लागला. त्याच्यासाठीं तिनं दूध घ्यावं, आपण न पितां त्याला द्यावं. स्वतः फाटकीं लुगडीं नेसावींत, पण मधूला चांगले कपडे करावेत, आपल्या आजाराला ती पातीचहा घेअी, पण मधूचं पडसं–खोकलासुद्धां तिचा जीव अर्धा करून टाकी. मधू म्हणजे तिचं सर्वस्व होतं. मधूला घेअून ती कशी-बशी आडोशाला राहत होती. तो मोठा झाला म्हणजे मग ती घरांत राह-णार होती. मधूला शिकवायचा, त्याला मोठा करायचा, त्याचं लग्न करायचं आणि सूनबाईचं कौतुक करीत नातवंडं खेळवायचीं हें त्या दुःखी जीवाचं अेक रम्य स्वप्न होतं. या स्वप्नासाठीं ती रात्रंदिवस कपडे शिवायची. मधू मोठा झाला म्हणजे ती त्याच्याशीं खूप बोलणार होती. आपला मोठेपणा टाकून ती त्याच्याशीं बरोबरीनं वागणार होती. सध्यांच्या स्थितीबद्दल ती समाधान मानून घ्यायला शिकली होती. विचार करतांकरतां, कपड्याला टाके घालतां घालतांच तिला कितीदां तरी वाटे कीं जीवन हीच मुळीं अेक अुसवाअुसव आहे ! आपण टाके घालीत राहायचं. अुसवलं कीं पुन्हां टाका घालायचा. फाटलं कीं ठिगळ जोडायचं. कपडा अेकदांच फाडला आणि अंगाला अगदीं फिट्ट बसला असं फार थोड्यांचं होतं. नाहीं तर लहान झाला, मोठा झाला, अपुरा झाला, बेडौल झाला, त्याला दोरा घाला, त्याला पट्टी जोडा आणि कांहींतरी करून अंगांत घाला. परिस्थितीनं तिची मनोवृत्ति तत्त्वज्ञान निर्माण करण्याची झाली होती. माणसाला जें हवंसं वाटतं तें मिळत नाहीं. नको असतं तें घ्यावंच लागतं. तें नको असलेलंच अंगाला अितकं चिकटतं कीं तें घ्यावंच

लागतं. हवं असलेलं आपल्या अंगालाच येत नाहीं. त्या हव्या असलेल्याचीं मापं तरी चुकतील, शिवण तरी अुलटी बसेल किंवा तें वेडंवाकडंच बेतलं जाओील. मधूची आओी भराभर टाके घाली. मधूच्या आशेवर ती अुसवलेली शिवण शिवत होती.

या साऱ्या आठवणी तिच्या डोळ्यांपुढून सरकल्या. तिनं मधूचं पत्र पुन्हां अेकदां वाचलं. आज रात्रीं तो बायकोसह खरोखरीच येणार होता. तिचं मन पुन्हां अुत्तेजित झालं. तिचा मुलगा चांगला निघाला होता. तो खूप शिकला, त्याला मोठी पांचशें रुपयांची नोकरीसुद्धां लागली आणि त्यानं अेका सुस्वरूप मुलीशीं लग्नसुद्धां केलं !

मधूची आओी पुन्हां आठवणींत गुंतली. सूनबाओी घरांत आल्या तेव्हां आपल्या धर्मशाळेचं घर झालं असं तिला वाटलं. पण कां कोण जाणे ! मधू थोडा दूर गेल्यासारखा वाटला. अेकाअेकीं तिला गंगाधरपंतांची आठवण झाली आणि खरोखरीच दुःखाची धार अंतःकरण कापीत गेली.

लग्नानंतर आठपंधरा दिवस मधू आणि सूनबाओी तिच्याजवळ होतीं. तिचा ओढा आपल्या माहेराकडे असायचाच ! पुढं मग मधू आपल्या बायकोला घेअून नोकरीच्या गांवीं निघाला. तो आओीला म्हणत होता, ' चल आओी, तूंसुद्धां चल तिकडे. अिथें आतां काय आहे तुझं ? '

तो चांगला दोनचार वेळां असं म्हणाला, पण तो जेव्हां असं म्हणे तेव्हां सूनबाओी कावऱ्याबावऱ्या होत, हें मधूच्या आओीनं पाहिलं होतं. तिनं मधूला अुत्तर दिलं होतं कीं, ' तूं म्हणतोस तें खरं. पण माझा पसारा बराच आहे. थोडं अिथलं लागी लागलं म्हणजे मी येओीन. '

मधू जरी नाराज होत होता तरी सूनबाओींचा जीव भांड्यांत पडत होता हें मधूच्या चतुर आओीनं ओळखलं होतं. जाण्याची अिच्छा असून तिनं मन आवरलं होतं. संयम हाच तिच्या आयुष्याचा गाभा होता. त्या मानानं हा प्रसंग कांहींच नव्हता. पण तिला असं मात्र जाणवलं कीं कुठला तरी टाका आज उसवला. तिचं मन खट्टू झालं.

मधूच्या आओीनं पुन्हां अेकदां पत्रावरून नजर टाकली. आणि अुशीर होत असलेला पाहून बाजारांत जाअून तिनं लगबगीनं भाजी आणली.

मुळयाची कोशिंबीर, टोमॅटोचा रस्सा आणि मुगाच्या डाळीची खिचडी— तिच्या मधूला फार आवडत हे पदार्थ ! मुळा घेतांना ती पुटपुटली, 'सून-बाअीला मुळा आवडतो कीं नाहीं कोण जाणे !'

पिशवी घेअून ती घरीं आली. वाटेंत कोण आयाबाया भेटल्या त्यांना सांगितलं, 'आज मधू येणार आहे !' घरीं आल्यावर खोकल्याची अुबळ दाबीत, पाठीचं पोक ताठ करीत येणाऱ्या शेजारच्या आजीबाअीपुढं तिनं मधूचं कार्ड टाकलं. तिनं अुलटं पालटं केलं आणि ज्योतिषासारखं विचारलं, 'काय म्हणतोय मधू ? कधीं येणार हिकडं ?' तिला वाचतां येत नव्हतं तरी तिला माहीत होतं कीं मधूशिवाय आअीला दुसऱ्या कुणाचं पत्र येणार? मग मधूच्या आअीनं आजीबाअीला सांगितलं. आजीनं मग आणखी कुणाला सांगितलं. मग सगळ्या चाळींत समजलं कीं, 'आज मधू येणार ! त्याची बायको येणार !'

आठ वाजतां मधू यायचा, पण सात वाजतांच ती स्वयंपाक झांकून ठेवून गॅलरींत येअून अुभी राहिली. 'काय मेलं घड्याळ ! म्हातारं झालंय माझ्यासारखच. चालतं तेव्हां चालतं अन् नाहीं तेव्हां आळसावून जांभया देतं.' मधूच्या आअीनं आंतबाहेर खेपा घातल्या. मध्येंच अेकदां दामोधर-काकांना विचारून आल्या, 'काय हो, भडोचची गाडी मुंबअीला कधीं येते ?' आजीबाअींच्या घड्याळांत डोकावून पाहिलं. पण तिच्या घड्याळापेक्षां आजीबाअींचं घड्याळ पांच मिनिटं मागंच होतं आणि तरीसुद्धां तें हळूंच चालत होतं.

होतांहोतां आठ वाजले. साडेआठचा ठोका पडला. पाअुणे नअ...नअू... जिनं तिनं विचारावं, 'आला का मधू ?'

मधूच्या आअीला बारा वाजल्यासारखं वाटलं. तिनं जेवण तसंच झांकून ठेवलं आणि भिंतीजवळची वळकटी अुलगडून ती तशीच पडून राहिली. मधू आला नाहीं म्हणून तिची फार निराशा झाली. ती निराशा मग अश्रुरूपानं पाझरूं लागली. मधू आपल्याला दुरावला हेंच खरं. आपण, आपलं शिवण आणि आपलं हें अेकलकोंडं जीवन—तिच्या मनांत असे विचार येअूं लागले

तोंच दाराची कडी वाजली. कुणीतरी मोठ्यानं हांक मारली, 'आओी ! मी आलोंय ग ! दार अुघड.'

मधूची आओी धडपडून अुठली. आपल्या डोळ्यांत अश्रू होते हें सुद्धां तो विसरली. दार अुघडीत ती म्हणाली, 'आलास का मधू ? आणि सूनबाओी कुठं आहे ?'

मधूनं आओीला नमस्कार केला. म्हणाला, 'तिची तब्बेत जरा बरी नव्हती म्हणून ती म्हणाली आज मी नाहीं येत. पुढल्या वेळीं मी येओीन.' पण हें सांगतांना मधूचा आवाज जरा नरम होता. तिनं विचारलं, 'काय होतंय ? तापबीप ? अेकटीच राहिली का तिथं ?'

'छे छे ! तशी बरी आहे ती. अुगीच थंडीचं पडसंबिडसं' असं म्हणत त्यानं तो विषयच टाळला. बॅग अुघडून त्यानं आओीला सुरतेचीं दोन पातळं दिलीं. बर्फीचा अेक पुडा दिला आणि म्हणाला, 'बघ बरं. आवडतील का हीं पातळं तुला ?'

मधूची आओी म्हणाली, 'छान आहेत. लहान मुलासारखा मलाच खाअू आणलास. पण पाय धू आधीं. जेवायला चल. भाताच्या अगदीं गारगोट्या झाल्या असतील.'

त्याच्या गप्पा बराच वेळ चालू होत्या. तरी मधूची अस्वस्थता तिला जाणवत होती. मग तीच म्हणाली, 'नीज आतां. प्रवासाचा त्रास झाला असेल.'

गप्पा मारतां मारतां रात्रीचे अकरा वाजले होते. मधूला काय वाटलं कोण जाणे ! त्याच्या आओीच्या मनांत तरी काय घोळत होतं कुणास ठाअूक ! जागरण नको म्हणून दोघं न बोलतां निजून राहिलीं. पण झोप कुणालाच येत नव्हती. मधू अुठला आणि आओीच्या जवळ बसून तिच्या पावलांवरून हात फिरवीत म्हणाला, 'आओी, पाय रगडून देतों तुझे आणि मग निजतों.'

मधूच्या आओीचा म्हातारा होअूं लागलेला घसा अेकदम कशानंसा दाटून आला—त्या अेकदम अुठून बसल्या. म्हणाल्या, 'छे रे ! मला काय झालंय ? दमला असशील तूं. मीच तुला अुद्यां तेल लावून न्हाअूं घालणार आहें.'

'मला कशाला तेल लावायचं ! मी काय लहान राहिलों आहें अजून !

भडोचला जाओीपर्यंत तुझे पाय रगडीत असें. म्हणून वाटलं कीं आजसुद्धां थोडा हात फिरवावा. काम होत नाहीं तुला. दमून जात असशील तूं.'

मधूची आओी कांहींच बोलली नाहीं. डोळ्यांत पुन्हां अश्रूंनीं गर्दी केली; पण मनाला वाटलं कीं आपला मुलगा कांहीं आपल्याला विसरला नाहीं.

दोनतीन दिवसांनीं मधू जायला निघाला. आओीनं दिलेला फराळाचा डबा त्यानं हातांत घेतला आणि नमस्कार करतां करतां शंभराची नोट त्यानं आओीच्या हातांत दिली. आओीनं बजावलं, ' संभाळून जा रे. सूनबाओीच्या तब्बेतीचं कळव. जपून राहा. '

मधू गेला. मधूच्या आओीला पुन्हां धर्मशाळेंत पडल्यासारखं वाटलं. मग त्यांच्या ध्यानांत आलं कीं मधूनं आपल्याला भडोचला बोलावलं नाहीं. मागल्या वेळीं तो आपल्याला आग्रह करीत होता. पहिल्या पत्रांतून सुद्धां त्यानं तसं लिहिलं होतं. पण मग त्यानं तो विषयच काढला नाहीं. कां कोण जाणे! मधूच्या आओीला कुठं तरी खटकलं. अंतःकरणांत नुसती पोकळी भरल्यासारखी वाटली. कांहीं करूं नये आणि नुसतं पडून राहावं असं वाटूं लागलं.

पण यंत्र तिची वाट पाहत होतं. त्याला आणि तिला फक्त अेकच काम होतं. शिवायचं! नुसतं कापड शिवायचं आणि गप्प बसून राहायचं.

मधूचीं पत्रं येत होतीं. खुशाली कळत होती. मधूच्या आओीला मधेंच भडोचला जाऊन यावंसं वाटे. पण तो 'ये' म्हणून पत्रांतून लिहीना. महिन्याकाठीं पैसे मात्र तो न चुकतां पाठवी. 'म्हातारपणीं तूं आतां काम करूं नयेस.' असं पत्रांतून कळवी. ती म्हणे, 'मग हा मला ये म्हणून कां लिहीत नाहीं? अिथं काय माझं गाठोडं पुरून ठेवलं आहे?'

अेक दिवस तिनं विचार केला कीं, मुलाकडे जायला आओीला बोलावणं कशाला हवं आहे? आपल्या हक्काचं घर आहे. जावं, राहावं, परत यावं.

आणि खरोखरच ती अेक दिवस भडोचला गेली. स्टेशनवर मधू आला होता. पण घरीं आल्यावर पाहाते तों सूनबाओींच्या कपाळाला आंठ्या! तिच्या बहिणी आल्या होत्या. अेक भाऊ आला होता. त्या सर्वांनींच असं दाखवलं कीं ही अुगीचच आली. मधूच्या आओीला पुन्हां अेकदां परक्यासारखं

वाटलं. ती कांहींच बोलली नाहीं. तिनं सूनबाओीला विचारलं, ‘ बरी आहेस ना ? ठीक चाललंय ना ? ’

सूनबाओी नुसतंच ‘ हूं ’ म्हणाल्या.

‘ बंगला सरकारी आहे वाटतं ? ’

‘ सरकार कुठला देतोय ? आम्हीच भाडं भरतोंय पासष्ट रुपये ! ’ त्या ‘ आम्ही ’ वर जोर होता.

सासूबाओींना अंदाज आला. त्या बंगला पाहण्याच्या निमित्तानं हिंडून आल्या तेव्हां सूनबाओी बहिणीला सांगत होत्या, ‘ तुम्हीं आलांत चार दिवस तर ही धिडका आली लगेच पाठोपाठ ! आतां जरा मोकळेपणा नाहीं कीं चार पैसे खर्च करायची सोय नाहीं. शिवाय या शिवणकाम करणाऱ्या बाओीला सासूबाओी म्हणायचं म्हणजे मला लाज वाटते ! पण ह्यांना भारी आपल्या आओीचा अभिमान आहे. आतां बाहेरून आले कीं दिसतील तुला मायलेकरांच्या गोष्टी. ’

मधूच्या आओीनं ट्रंकेंतलं लुगडं काढलं. त्या आंघोळीला गेल्या. मन भारी अस्वस्थ झालं. लगेचच्या गाडीनं निघून जावं असंसुद्धां वाटलं. पण पुन्हां त्यांनीं विवेक केला कीं तिला कांहींहि शोभेल तरी मला हा नाचरेपणा बरा दिसायचा नाहीं.

तो दिवस तसाच गेला. सूनबाओींच्या भावंडांना कांहीं कापडचोपड आणायचं होतं. मधू बायकोला सांगत होता, ‘ पन्नास रुपयांपर्यंत तुझ्या भावंडांचं कापड घे. कारण आओी आली आहे. तिला मला थोडेतरी पैसे दिले पाहिजेत. ’

‘ त्यांना आणखी पैसे काय करायचे आहेत ? दर महिन्याच्या महिन्याला तर कर भरतांच आहां. आतां आणखी ही बिदागी कशाबद्दल ?’

‘ हें बघ, आओीला पैसे द्यायला काय सणवार, मुहूर्त बघावा लागतो ? तिनं हाडाचीं काडं करून मला वाढवला. तिच्या स्वार्थत्यागावर आपण ही मौज करतों आहोंत. तिनं या वयांत कष्ट करावेत हें मला बरं नाहीं वाटत. तिचं ऋण माझ्या हातून फिटेल असं वाटतंय तुला ? ’

'मग प्रत्येक आओीच आपल्या मुलासाठीं कष्ट करते. यांत ऋण कसलं आलं आहे ? '

'पण माझ्या आओीची गोष्ट निराळी आहे. तिनं दोन्ही कर्तव्यं बजावलीं. बापाच्या आणि आओीच्या दोन्ही नात्यानं तिनं मला वाढवला. तिचे हाल आणि तिच्या मनाच्या व्यथा तुला काय समजणार ! पण माझी ती आओी आहे. तिच्यासाठीं माझा जीव तुटतो. तिला मी माझ्याजवळ आणून ठेवीत नाहीं याचा मला सारखा पश्चात्ताप होत असतो. '

'मग ठेवा ना अिथं आणून. '

'मी पुष्कळ ठेवीन. पण तुझं आणि तिचं पटणार नाहीं हें मला माहीत आहे. ती चार दिवसांसाठीं आली तर तुझा आंतल्या आंत जळफळाट होतो आहे. मग कायमची आली तर.....'

'मी माहेरीं जाअून राहीन ! तुम्ही राहा आपल्या आओीला घेअून. '

'फार शहाणी आहेस तूं. मी सांगतों तसं झालं पाहिजे. पन्नासाच्यावर खर्च होतां कामा नये. ' असं म्हणून मधू तिथून निघून गेला.

त्याच्या आजीनं हें सारं अैकलं होतं. आपल्या राहण्याची शोभा काय आहे हें तिला कळून चुकलं.

मधूच्या बायकोला दिवस गेले होते. तिचं डोहाळजेवण आपण करावं आणि परत जावं असा तिचा विचार होता. सूनबाओीच्या दृष्टीनं याला किंमत नव्हती. पण ती मधूकडे पाहून सारं करायला धांवत होती. तिनं विचारलं, ' सूनबाओी, महिना कितवा सातवा का ? '

'हं. '

'मग अुद्यां तुझं डोहाळजेवण करीन आणि परवां जाओीन म्हणतें. '

'मला असल्या या रानटी चाली आवडत नाहींत ! खा खा खायचं आणि अजीर्ण करून बसायचं. '

मधूची आओी जास्त बोलली नाहीं. त्यांनीं नुसती तिची ओटी भरली, खण दिला आणि संध्याकाळीं मधूला म्हणाल्या, ' मधू, अुद्यां जाओीन म्हणतें मुंबईला. तिकीट काढून आण. सुटे नसले तर हे घे पैसे तिकिटाला. '

मधूच्या पोटांत ऊन ऊन वाफा आल्या. पैसे परत करीत तो म्हणाला,

'असं काय करतेस आजी परक्यासारखं ? पैसे काय देतेस मला ? आणि आल्यासारखी चार दिवस रहा. मग जा परत. थोडं अिकडे तिकडे जाअून येअूं. या बाजूचा प्रदेश तूं बघितला नाहींस तो बघ आणि मग जा. वाटलं तर आपण सगळींच बडोद्याला जाअून येअूं.'

'सगळींच' म्हणतांच सूनबाअी तिथं बसल्या होत्या त्या फणकाऱ्यानं अुठून गेल्या.

मधूची आअी सहज दाखवल्यासारखं करून म्हणाली, 'नको मधू. शिवण बरंच राहिलं आहे. आतां माहीत झालं घर. केव्हाहि येअीन. चार दिवस राहीन. तेव्हां जाऊं बडोद्याला. पण आत्तां मात्र नको. तिकडे बायका माझी वाट बघत असतील.'

आअीची समजूत पाहून मधूचा जीव आंतल्या आंत गोठल्यासारखा झाला. पण त्याला दोन्हीकडची ओढ होती. बायकोशीं त्याला जन्म काढायचा होता आणि तिच्या स्वभावाला मुरड घालणं आपल्या सामर्थ्यापलीकडचं आहे हें त्याला समजून चुकलं होतं. बायकोसमोर आअीचा आणि आअीसमोर बायकोचा पाणउतारा होअूं नये ही त्याच्या सुजन मनाची अिच्छा होती. पण कांहीं झालं तरी बायकोचं समाधान करणं त्याला अधिक जरूर होतं. आपली आअी किती शहाणी आणि सहनशील आहे याचा त्याला पुन्हां अेकदां अनुभव आला. आपल्या आअीचं आयुष्य फुकट गेलेलं पाहून तो कष्टी झाला. आपल्या आअीचं शहाणपण पाहायला, तिचं कौतुक करायला अितके दिवस कुणी नव्हतंच आणि मोठं झाल्यावर आपण पाहतोंय तर तसं म्हणायची चोरी झाली. मिळून आअीचा वनवास कांहीं सपत नाहीं.

मधूच्या आअीला त्या घरांत अगदीं अुबल्यासारखं झालं. परक्यासारखं वाटूं लागलं. पण मधूनं जेव्हां तिला गाडींत बसवून दिलं तेव्हां आपण फार दूर कुठं कधीं गेलों नाहीं अितक्या दूर जात असल्याची जाणीव तिला झाली. गाडीची शिटी होअीपर्यंत दोघंहि कांहींच बोललीं नाहींत. मधू आअीजवळ बसून राहिला होता. गाडी सुटायच्या वेळेला मधूनं घाअीघाअीनं तिच्या हातांत नोटा कोंबल्या आणि तिच्या हातांतल्या झिजलेल्या पाटल्यांवरून हात फिरवीत तो म्हणाला, 'आअी, संभाळून जा बरं. बॉम्बेसेंट्रलला अुतर आणि

पोंचल्याचं पत्र टाक.' मग गाडींतल्या अेका तरुण माणसाकडे पाहून तो म्हणाला, 'आमच्या आओीला सोबत करा बरं का!' गाडी सुटली. चाल झाली. मधूची आओी अुभी राहून डब्यांतून वाकून मुलाकडे पाहूं लागली.

दूर जाणाऱ्या म्हाताऱ्या आओीला जेव्हां हात अुंचावून मधू निरोप देअूं लागला तेव्हां त्याच्या मनांत आलं, माझ्या आओीला कुणी नाहीं या जगांत. जेव्हां मी तिचा होतों तेव्हां मला कांहीं कळत नव्हतं. आतां मला कळतंय तर मी तिचा राहिलों नाहीं! मधू मोठ्यानं ओरडला, 'आओी, संभाळून जा. पत्र पाठव.'......

आणि आपल्याच आवाजानं तो दचकला. गाडी केव्हांच निघून गेली होती. फलाटावर फक्त अेकदोन हमाल होते. त्यांनींसुद्धां मधूकडे पाहिलं. मधू मग जड पावलांनीं स्टेशनच्याबाहेर जाअूं लागला.

दिवस, महिने, सन, वार– सर्व निर्विकार मनानं येत होते, जात होते. मधूचा मुलगा दोन वर्षांचा झाला. नातवाला खेळवण्याची, सूनबाओीशीं हित-गुज करण्याची, मुलाचं वैभव पाहण्याची... मधूच्या आओीच्या सगळ्या अिच्छा तिच्या मनांतच थिजत होत्या. परिस्थितीनं तिला जास्त अपेक्षा न ठेवण्याचंच शिकवलं होतं. पण ज्या स्वप्नाच्या आशेवर तिनं दिवस ओढून काढले होते, तें अखेर स्वप्नच ठरलं. मधूच्या बायकोला सासूजवळ राहण्याची अिच्छा नव्हती. आपल्या नवऱ्यानं आओीच्या भावनांना हळुवार फुंकर घालावी हें तिला आवडत नव्हतं. ती म्हणे, 'तुमच्या आओीनं कष्ट केले, मग माझ्या आओीनं नाहीं का केले? तिला कां नाहीं पाठवायचे दरमहा?'

तो म्हणे, 'तुझ्या आओीला सुखांत ठेवणं हें तुझ्या भावाचं कर्तव्य आहे. शिवाय माझ्या अैपतीप्रमाणं तिलांहि मी मदत करतोंच आहें. आणि माझ्या आओीला तुझ्या भावानं मदत करावी असं मी म्हणालोंय् का कधीं तुम्हांला?'

पण तिला तें कधीं पटलं नाहीं. आपल्या माहेरच्या माणसांसाठीं तिच्या जिवाची घालमेल चाले. कुणी ना कुणी ती सारखी आपल्याकडे आणून ठेवी. मधूला हें आवडत नसे. पण तो फारसा विरोध करीत नसे. अर्थात् त्याचा ओढा आपल्या वृद्ध आओीकडे असेच. पण असून करणार काय?

हें सारं मधूच्या आओीला माहीत होतं. आओी आणि बायको या दोघींच्या

फरफटींत त्याची ओढाताण होत होती हें तिला कळत होतं. त्या नवराबायकोचं बिनसूं नये म्हणून मधूची आओी मधूला या विषयाबद्दल अेक चकार शब्द बोलली नाहीं. आतांपर्यंत त्याच्या सुखासाठींच ती झटली होती. आयुष्याचा पुढला टप्पा तर आतां थोडाच राहिला होता. ती विचार करी, मधू आणि त्याची बायको यांची सगळीच वाटचाल अजून व्हायची आहे. मी कांहीं आतां पुढं जायची नाहीं. माझीं पावलं थकलीं. माघारीं वळूं लागलीं. चालच मंदावली. जिथून आलें तिकडे तीं फिरूं लागलीं. त्यांच्या पावलांत आपलीं पावलं कशाला घोटाळूं द्यायचीं ? ती जणूं मागल्या दारीं अुभी राहून पुढल्या दाराची हालचाल पाहत होती.

पण अेखाद्या वेळी तिच्या मनाची स्थिति दूध अुतूं गेल्यासारखी होअी. मायापाशांतून ती मोकळी होत नव्हती. माझ्या मुलावर माझी अेवढीसुद्धां सत्ता नाही की काय ? माझ्या मुलाशीं मीं मोकळ्या मनानं बोलायचंसुद्धां नाहीं ? माझ्या सगळ्या कष्टावर, प्रेमावर अगदीं पाणी पडलं ? तें कांहीं नाहीं. मी त्यालाच बोलावीन अिकडे. त्याच्या बायकोलासुद्धां बोलावीन. आणि मुलालासुद्धां. मधूला काय सूनबाअीनं वाढवला काय ? माझ्याआधीं तिनं पाहिला काय ? माझ्याआधी तिनं प्रेम केलं त्याच्यावर ? मला मधू झालाच नसता तर मधूवर हिनं कसा हक्क गाजवला असता ? कानामागून आली आणि तिखट झाली ! तें कांहीं नाहीं. या सर्वांच्यावर माझा हक्क आहे. सगळ्यांना या दिवाळींत अिकडे हक्कानं बोलवीन. या म्हणावं अिथं. चार दिवस राहा आणि जा परत. मी काय त्याचं अैश्वर्य मागतें कीं काय ? तें दे तूं आपल्या बायकोला. मला फक्त तुझी माया– प्रेम पाहिजे मधू. पुत्रसुखाचा अनुभव या दुर्दैवी आअीनं कधींच घेअूं नये काय ?

मधूच्या आअीन मधूला अगदीं अधिकारानं पत्र लिहिलं कीं, ' दीवाळीला बायको मुलाला घेअून ये. '

मधूचंहि लगेच अुत्तर आलं कीं ' नर्कचतुर्दशीच्या दिवशींच येतों. '

मधूच्या आअीला तरतरी आली. तिनं आपली अेक म्हातारी मैत्रीण बरोबर घेतली आणि बाजारांत गेली. नातवासाठीं तिनं अेक रंगीत पाट

घेतला. चांदीची झारी घेतली. सूनेला आवडेल म्हणून चादीचा पॉवडरचा डबा घेतला आणि मुलासाठीं चांदीचं भांडं घेतलं.

घरीं आल्यावर म्हातारी मैत्रीण धापा टाकीत म्हणाली, ‘ मधूच्या आओी, बरीच खरेदी केलीत ! ’

उभ्या जन्मांत अेवढी मोठी खरेदी तिनं प्रथमच केली होती. ती म्हणाली, ‘ मग आतां काय कमी आहे मला ? मधूला पांचशें रुपये पगार. त्यानं आतां चांदीच्या भांड्यांतनं पाणी नको प्यायला ? मी सांगणार आहें सूनबाओीला कीं त्याला हें रोज ठेवीत जा. ’

मधूच्या आओीनं खूप तयारी केली. फराळाचं केलं. साखरेसाठीं हेलपाटे घातले. रॉकेलच्या बारीला अुन्हातान्हांत उभी राहिली. बिचारी दमून गेली.

नर्कचतुर्दशीच्या पहांटेच मधू यायचा होता. नेहमींप्रमाणंच तिची धांदल उडाली. आशानिराशेचे झोके खाल्ले. पण मधूनं उशीर केला नाहीं. पहांटे चारला मधू आला.

आला, पण अेकटाच !

कमरेवर हात देत तिनं विचारलं, ‘ आणि सूनबाओी ? तुझा मुलगा ? ’

‘ आलीं आहेत. पण ती गेली घेअून त्याला मैत्रिणीकडे. संध्याकाळीं येईल ती. ’ तो खालच्या मानेनंच आंत गेला.

मधूच्या आओीला टाका अुसवल्यासारखं वाटलं. पण तिनं मनाचा तोल सांवरला.

मधूला स्नान घातलं. तिच्या स्नानांत रामच नव्हता, न्हायचं म्हणून न्हायली. मधूला फराळाचं दिलं. मधू म्हणाला, ‘ आओी, तूं घे ना. ’

‘ मला अजून भूक नाहीं रे लागली. ’

‘ मग मला पण नाहीं लागली. तूं घे त्याशिवाय मी नाहीं खाणार. ’

मधूच्या आओीनं फराळाची बशी घेतली. तुकडा मोडून तोंडांत टाकला. मधूनंहि घेतला. ‘ लाडू फार चांगला झालाय् ’ तो म्हणाला.

पण घास तोंडांतच फिरत होते. कुणाच्याहि घशाखालीं अुतरत नव्हते. अेकमेकांना बघून पोटं भरलीं होतीं कीं आपण दोघंच म्हणून भूक आटली होती कोण जाणे ! दोघंहि अेकमेकांकडे बघून केविलवाणी हंसलीं.

मधू म्हणाला, ‘आओी, माझं लहानपण आठवतं तुला ? ’

‘ म्हणजे रे काय ? तुला नाहीं आठवण राहणार. पण मी कशी विसरेन रे ?’

‘ मलासुद्धां थोडं थोडं आठवतंय. शेजारच्या रंगूताओी म्हणायच्या नाहीं का, कीं तुमचा मुलगा अगदीं आओीवेडा आहे. ’

‘होय, होतास खरा तूं. मीं नुसती हांक मारली तरी आनंदातिशयानं अेकदम हंसायचास आणि धांवत यायचास. तुझा मुलगासुद्धां तसाच आहे का रे ?’

‘ तें आतां तूंच बघून सांग. पण तो बापवेडा आहे. मी यायच्या वेळेला दारांत बसून राहतो आणि त्याला अुचलून घेतल्याशिवाय मला आंत जाअूं देत नाहीं. ’

‘तुझ्यासारखाच दिसतो का रे ? बारशाच्या वेळीं बघितला होता. त्या-वर कांहीं पाहिला नाहीं.’ असं म्हणतां म्हणतांच तिनं मोठा आवंढा गिळला आणि झर्रकन् आंत अुठून गेली.

संध्याकाळीं सूनबाओी येणार होत्या. मधू घरींच होता. तो तिची वाट पहात होता. त्याच्या ग्यालरींत सारख्या खेपा चालल्या होत्या. पण सूनबाओी आल्या त्या अेकट्याच !

‘ मुलाला नाहीं का ग आणलास ?’

‘त्याची फिरायची वेळ आहे ही. म्हणून मैत्रिणीच्या गड्याबरोबर दिला समुद्रावर पाठवून. ’

‘ बरं वरं. तब्बेत बरी आहे ना त्याची ?’

सूनबाओीनं नुसतीच मान हलवली. मधूनं तिच्यावर डोळे वटारले होते.

मधूच्या आओीनं कांहीं झालंच नाहीं असं दाखवून विचारलं, ‘ काय घेणार तूं ? चहा कीं कॉफी ? फराळाचं आधीं देअूं तुला कीं मग देअूं ?’

‘ मला भूक नाहीं मुळींच. सकाळीं फराळ झाला आहे माझा. ’

तरी मधूच्या आओीनं फराळाची ताटली तिच्यापुढं ठेवलीच. सूनबाओींनीं तुकडा मोडल्यासारखा केला आणि त्या उठून गॅलरींत गेल्या.

मधू बायकोवर गरम झाला होता. तिला चांगली फेरावर घेण्याचा त्याचा विचार होता. पण त्याला बायकोचं वैगुण्य आओीसमोर उघडं करायचं नव्हतं.

आणि आओीचा किंवा स्वतःचा पाणउतारा बायकोकडून होऊं नये म्हणून काळजी घेणंहि त्याला जरूर होतं. त्याला दोन माणसं सांभाळायचीं होतीं. आणि मधल्यामधें त्याचा कोंडमारा होत होता.

सूनबाओी जायला निघाली तेव्हां मधूची आओी म्हणाली, 'हें बघ सून-बाओी, अुद्यांचा पाडवा आहे. तेव्हां मुलाला घेऊन अिथंच जेवायला ये. मधूला मग अिथंच ओवाळ.'

ती मानेनंच 'हो' म्हणाली. मधू आणि मधूची बायको अेकदम बाहेर पडलीं.

दुसऱ्या दिवशीं मधूच्या आओीनं श्रीखंड-पुरीचं जेवण केलं. दहा साडेदहा झाल्यावर मधू बायकोला आणायला निघाला.

मधूच्या आओीनं पाट–रांगोळी केली. नातवाला रंगीत पाट मांडला. बाकीच्या वस्तू काढल्या आणि ती वाट पाहत बसली.

मधू आणायला गेला तेव्हां त्याची बायको तयारच होती. पण ती म्हणाली, 'मुलाला नाहीं न्यायचा. त्याचं आज काय आहे तिथं? अेखादी खरी प्रेमळ आजी असती तर ती स्टेशनवर आली असती. अिथं येऊन पाहून गेली असती नातवाला. पण नुसतं बोलण्याचं कोरडं कौतुक. बारशाच्या दिवशीं आणून आणून आणलं काय, तर अर्धा तोळा सोनं. माहीत आहे तुमच्या आओीचं प्रेम!'

'मग काय तुझ्या माणसांनाच तेवढा प्रेमळपणाचा हक्क दिला आहे आणि माझी आओी अेखादी राक्षशीण आहे असं म्हणायचं आहे तुला?'

'तें मी कशाला म्हणूं? तुमचं तुम्ही पाहा. लग्नाला आतां चार वर्षें झालीं कायकाय हौशी केल्या तुमच्या आओीनं माझ्या?'

'किती दिवस राहिलीस तूं तिच्याजवळ? तूं कायकाय कर्तव्यं बजावलींस तिच्याबाबत? आणि 'तुमची आओी, तुमची आओी' म्हणतेस ती तुझी कुणी लागत नाहीं वाटतं ती?'

'माझी कुणी असती तर त्यांनीं असा निष्ठुरपणा केला नसता. मला काय दिलंय त्यांनीं? अुलट आमचेच पैसे...'

'चूप! काय निष्ठुरपणा केला म तिनं? तिचा हक्क आहे माझ्यावर.

जास्त बोलूं नकोस. चोराच्या उलटया म्हणतात त्या ह्या. उशीर होतोय अुगीच. आओी वाट पहात बसली असेल. झटपट त्याला कपडे घाल आणि चल माझ्याबरोबर. बाळासाठीं तिनं रंगीत पाट आणला आहे. आपण गेलों नाही तर तिचा केवढा हिरमोड होओील ! '

' मला नाही त्या लांकडी पाटाची अेवढी अभिलाषा. असले छपन्न पाट आहेत माझ्या घरीं. तुम्हांला वाटत असेल त्याची आशा, पण मला नाहीं त्यांच्या कवडीचीदेखील अिच्छा ! '

' हें तूंच का बोलते आहेस ? दोन्ही बाजूंनीं, अुलटंसुलटं, आपल्याच विरुद्धसुद्धां बोलतां यावं लागतं माणसाला. मी पुन्हां सांगतों–बाळाला कपडे घाल आणि चल लौकर. '

' मी सुद्धां पुन्हां सांगतें कीं मी त्याला बरोबर घेणार नाहीं. त्याचं या वेळीं तिथं कांहीं अेक काम नाहीं. '

' मग मी पण तुला बजावतों, त्याला घेऊनच मी जाणार, त्याला नेलाच पाहिजे मला '

' हरकत नाहीं. त्याला घेऊन जा. मी येणार नाहीं. '

मधूला अितका संताप आला होता ! पण करणार काय ? तो अेवढंच म्हणाला, ' चुकतेस तूं बरं का. हें बरं नाहीं. तुझी अिच्छाच नसली तर तुझ्यावर मी जुलूम करीत नाहीं. मी बाळाला मात्र घेऊन जाणार. '

मधू मुलाला घेऊन घरीं आला. आओीनं विचारलं, ' आणि सूनबाओी ? '

' ती नाहीं येणार. आओी, ती मूर्ख आहे. ती तुझी कुणी नाहीं. मी आणि हा बाळ, आम्ही दोघं तुझे आहोंत. तूं आम्हांला जेवायला वाढ. आम्हीं जेवतों. आओी, तूं सुद्धां बैस माझ्याबरोबर जेवायला. '

मधूला मोठा हुंदका आला. त्याच्या आईला या वेळीं अश्रू आवरले नाहींत. जेवायच्या ताटावर ते अश्रू सांडले. सगळं यथास्थित असून त्यांच्या मनाला अगदीं अवकळा आली.

तिनं मुलाला आणि नातवाला जेवायला वाढलं. घडला हा प्रकार पाहूनच माअुलीचं पोट भरलं होतं. मधू जायला निघाला तेव्हां नातवाच्या हातांत

तिनं झारी दिली. पॉवडरचा आणि फराळाचा डबा मधूच्या हातांत दिला. म्हणाली, ‘ हें सूनबाअीला दे. ’ मधूला तिनं भांडं दिलं.

मधू बाळाला म्हणाला, ‘ राजा, आजी–आअीला नमस्कार कर. आअीच्या पायां पड. म्हणावं पुन्हां लवकर येअीन मी. ’

बाळानं अैकलं. त्या दोन वर्षांच्या गुटगुटीत छोकऱ्यानं आजीच्या अंगावर अेकदम झेप घेतली. मधूच्या आअीचा आशीर्वाद तोंडांतून फुटेना. गालांवरून अश्रू ओघळत होते. बाळाच्या गालांवरून, त्याच्या दाट जावळावरून आपले म्हातारे हात फिरवीत ती मनांतल्या मनांत म्हणाली, ‘ औक्षवंत व्हा बरं ! ’

मधू बाळाला घेअून गेला आणि तिला वाटलं की आज सगळे टाके अुसवले. आतां अिथून पुढं किती दिवस पाहाणार आपण ?

तेव्हांपासून मधूची आअी थकत चालली. जीवनाबद्दलची आसक्ति कमी होअूं लागली. चारदोन महिन्यांतच ती आजारी झाली. पण मधूच्या पत्राला तिनं अुत्तर लिहावं, ‘ माझी प्रकृति चांगली आहे. काळजी करूं नकोस. ’

मधू अज्ञानांतच राहिला. त्याची मनीऑर्डर न चुकता येत होती.

पण अिकडे मधूची आअी अंथरुणाला खिळली. तापांत फणफणून राहूं लागली. पण मुलाकडे कळवायच नाही हा तिचा निर्धार होता.

शेजारची माणसं म्हणत, ‘ मधूची आअी, मधूला बोलवा. नाहीं तर तुम्ही तरी जा तिकडे. ’

पण ती मुळीं आपण आजारी आहोंत असंसुद्धां कबूल करीत नसे. मधूची आअी मोठी करारी होती. अेवढा करार अंगीं असल्याशिवाय का ती स्वाभिमानानं आणि अब्रूनं जगली ? ती मोलानं काम करून घेअी आणि अंथरुणावर पडून राही.

पण पुढं मधूची आअी अेक दिवस बेशुद्ध झाली. शेजारच्या दामूकाकांनीं मधूला तार केली.

मधू आला तेव्हां घरघर लागली होती. आअीला पाहतांच, आजाराची हकीकत अैकतांच पश्चात्तापानं तो होरपळून निघाला. तिच्या कृश शरीरावरून हात फिरवीत, तिच्या तोंडाजवळ तोंड नेअून तो हांका मारूं लागला,

‘ आअी, आअी, मी आलोंय. मी आलोंय ग. मला ओळखलं नाहींस तूं ? मी तुझा मुलगा, तुझा मधू आलाय आअी. ’

आअी काय बोलणार ? तिचीं पावलं या धरित्रीवरून सुटत चाललीं होतीं. तिचे डोळे थिजत चालले होते.

मधूनं घामाघूम होअून आअीला भराभर चारसहा साष्टांग नमस्कार घातले. ‘ आअी, मी चुकलों; मी चुकलों. तुला सुख दिलं नाही मीं माझ्यावर रागावलीस तूं ? म्हणून बोलत नाहीस तू ? ’ मधू ओक्साबोक्शी रडूं लागला.

दामूकाकांनीं त्याच्या पाठीवर थोपटलं. म्हणाले, ‘ मधू, आअी कधी आपल्या मुलावर रागावत असते का रे ?’

आअीचा अंत्यविधि आटपून तो घरी गेला तेव्हां त्याच्या बायकोनं मृदुपणानं विचारलं, ‘ काय झालं होत त्यांना ?’ सासूबद्दल अेवढा मअू स्वर तिचा आजच अुमटला.

मधूनं कोटाच्या खिशांतून पैशाचं पाकीट काढलं आणि नोटांची भेंडोळीं तिच्याकडे भिरकावीत तो म्हणाला, ‘ दरमहा पाठवलेले तुझे पैसे तिनं परत केले आहेत. तिच्या अुशाला होते. तुझ आणि तुझ्या नवऱ्याचं ऋण घेतल्याशिवाय तिनं शेवटची यात्रा केली. तुझ्या घरांत येण्याचं पाप तिनं केलं नाही. जन्मभर ती धर्मशाळेंत राहिली आणि मी असूनसुद्धां अखेर ती आपल्याच मठीत गेली ! झालं तुझं समाधान ?”

## वाघिणीचें दूध : : ३

तो गांव आणि तो देशच मोठा विचित्र होता. पूर्वी तो मागासलेल्या, जुनाट आणि बुरसटलेल्या चालीरीतींचा होता तिकडल्या सर्व स्त्रिया बुरखा पांघरून असत. जाळीच्या त्या वीतभर फडक्यांतून त्या दीड वीत दुनिया बघत आणि अफाट जगापासून अगदीं दूरदूर असत. सौंदर्यप्रसाधन, चार अक्षरांची ओळख आणि घड्याळाची आंकडेमोड या साऱ्या गोष्टी त्या वेळीं सुधारकी चाळ्यांत जमा होत असत. घराबाहेरचें वारें बुरखा नसतांना स्त्रियांच्या अंगावरून गेलें तर त्यांच्या अंगावर कोड फुटेल आणि अेखादीनें डोळे भरून सृष्टिसौंदर्य आणि मानवनिर्मित करामत बघितली तर ती सात जन्म आंधळी होअून बसेल, अशी शास्त्रवचनें त्यांचे शास्त्रीपंडित सांगत असत !

त्यामुळें त्या साऱ्या स्त्रिया चुलीत जळत आणि मुलाबाळांची अुसाभर करीत सारा जन्म घालवीत. अेकत्र कुटुंबाची पद्धत असल्यानें चारदोन म्हातारी माणसें असतच आणि ती असत म्हणजे त्यांचा आजारहि असेच. त्यांची सेवा करा, त्यांच्या मात्रा अुगाळून द्या त्यांचे काढे अुकळून द्या आणि वर त्यांच्या उपदेशाचे डोस पचवीत पचवीत जन्म काढा, असा हा मोठा कष्टप्रद खाक्या होता !

पण तरी हें सारें त्या सहन करीत. अुपदेश आणि घालूनपाडून बोलणीं हें त्या वेळच्या बायकांचें अेक टॉनिकच होतें. ज्या घरांत याचें प्रमाण जास्त तें घराणें मोठें खानदानी !

माणसाला जसें आपलें बारसें आठवत नाहीं तसें या बायकांना आणि पुरुषांनाहि आपलीं लग्नें केव्हां झालीं हेंहि आठवत नसे. दुपट्ट्यांत गुंडाळलेली वधू आणि पांगुळगाडा ओढणारा कुंचीवाला वर ह्यांना धरून त्यांचीं मातापितरें भराभर लग्नाचे बार अुडवून देत !

आणखी अेक चाल त्यांच्यांत होती. मुलगा आणि मुलगी जन्माला आलीं म्हणजे त्यांना अेक प्रकारचें बाळकडू पाजीत. या बाळकडूचे मोठमोठाले वृक्ष त्या देशांत फार माजून राहिले होते. त्यांचा विस्तार अेवढा अफाट झाला होता कीं आपल्याकडील वडांपिंपळाचीं झाडें त्यापुढें अेखाद्या रोपट्यासारखीं दिसूं लागतील. या झाडाची मुळी मुलाला वाघिणीच्या दुधांतून देत आणि मुलीला शेळीच्या दुधांतून.

त्यामुळें तिथले सगळे पुरुष वाघासारखे शूर आणि क्रूर झाले होते आणि तिथल्या सगळ्या स्त्रिया शेळीसारख्या गरीब आणि बावळट होअून बसल्या होत्या. घरांतल्या घरांत पुरुष स्त्रियांशीं सहज बोलूं लागले तरी अगदीं सहजगत्या वाघासारखे गुरगुरून बोलत! थोडें जरी मनाविरुद्ध झालें तरी 'आँव, खाँव' करून अंगावर येत. हें ते मुद्दाम करीत नसत. लाटेंतून फेस वर यावा तसं हें होअी. ज्याच्या अंगीं हें पाणी नाहीं तो मेंढीचें दूध प्याला असें म्हणत. त्यामुळें अेखाद्या बाअीनेंहि आपल्या मुलाला अेक वेळ अुपाशी ठेवलें असतें, पण वाघिणीचें दूध पाजायला ती कधीं विसरली नसती.

हें वाघिणीचें दूध आणून देण्याचें काम अर्थातच मर्द पुरुषांचें होतें. त्यांना त्यांत कांहीं विशेष वाटत नसे. त्यांच्या रक्तांत भिनलेल्या वाघिणीच्या दुधाचा वास वाघिणीला बरोबर समजे आणि आपल्या पिलांना दूध द्यावें तशी ती या पुरुषांना, मांजरीसारखी सुस्त पडून खुशाल आपल्या आचळांना हात लावूं देअी!

हे सारे पुरुष दिवसभर वाघासारखें काम करीत आणि रात्रीं बायकापोरांना खुशाल झोडपून काढीत. कधींकधीं ही अुपासना खंडित झाली तर साऱ्यांनाच चुकल्यासारखें होअी. आपण जसें चहा प्यालो नाहीं म्हणजे निरुत्साही होतों, डोकें जड होतें तसें त्या साऱ्यांचें होअी. या अशा जीवनक्रमांत ती बहुतेक प्रजा अेकंदरींत सुखांत नांदत होती.

पण क्रांतीचें मूळ कुठें आणि कसें अंकुरित होअील हें नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ शोधण्याअितकेंच कठीण! अेका बाअीला अेकदां जुळीं मुलें झालीं. अेक मुलगा आणि अेक मुलगी. तिच्या आअीनें चुकून मुलीला वाघिणीच्या दुधांतून घुटी पाजली आणि मुलाला शेळीच्या दुधांतून! पण अकदां जी वाघिणीच्या दुधाची चव त्या मुलीला लागली ती मुळीं शेळीचें दूध

पिअीचना आणि अेकदां शेळीचें दूध प्यालेलें असल्यानें तो मुलगा जो मलूल झाला तो आपला मुकाट्यानें शेळीचें दूध पिअूं लागला.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. मुलगा रडला तरी नाजुकपणें, फार तर मेंढीच्या पिलाअितपत रडे. मुलगी मात्र गजून गुरगुरून सारी आळी दणाणून सोडी !

हा अेक आजारच त्या घरांत होअून बसला. सगळ्या तऱ्हेचे अुपाय झाले पण सगळे फुकट गेले !

अितके अुपाय झाले पण दुधाच्या अदलाबदलीची शंका अेकाच्यासुद्धां सुपीक डोक्यांतून अुद्‌भवली नाहीं. आअीला हें गुपित माहीत होतें. पण तिनें असा विचार केला, कोणी तरी अेक मूल गुरगुरायचें आणि कोणी तरी अेक निपचित पडून राहावयाचें. मग कोणी का गुरगुरेना ? दुधाची अदलाबदल करून पाहिली आणि दोघेहि मोठमोठ्यानें ओरडत राहिले तरी सांभाळतां-सांभाळतां आपला जीव फेसाटीला यायचा. त्यापेक्षां आहे हें बरें.

आअीसुद्धां चुकून वाघिणीचें दूध प्यायली असावी. त्याशिवाय असा लुच्चा विचार तिला कोठून सुचायला ? बाकी ती बकरीचें दूधहि प्यायली होती यांत शंकाच नाहीं. नाहींतर "आहे हें बरें" असला पडखाअू युक्तिवाद तिला कधींच सुचला नसता.

असें होतांहोतां तीं मुलें मोठीं होअूं लागलीं. मुलगा शाळेंत जाअूं लागला. मुलगी शेणगोळा घेअून अुष्ट्यांना शेण लावूं लागली. पण हा तिचा खरा अवतार नव्हता. मुलगा शांतपणानें वावरे. पण ही ज्याच्या त्याच्या अंगावर खेकसायची. धाकटें भावंड रडूं लागलें तर ही खाड्‌कन् त्याच्या थोबाडींत मारी. आअीनें भांडें मागितलें कीं ही भांडें तिच्या पुढ्यांत आदळी. केरसुणीनें केर काढूं लागली तरी चार तडाखे भिंतीच्या खांबांना मारायला ती कमी करीत नसे.

तिचे हे वेडेचार बघून साऱ्यांनीं तिला वेडी ठरवली होती. वैद्यभूषण त्रिंबकशास्त्र्यांनीं चार दिवस नाडीपरीक्षा करून आपला निर्णय सांगितला, कीं हिच्या डोक्यांत मुळी मेंदूचा पत्ताच नाहीं. त्या जागीं नुसता अेक खाबड-खुबड दगड बसवलेला आहे !

आतां काय करावें ? नाना अुपाय केले, पण जों जों तिला यांची अुपाधि

होऊं लागली तों तों ती जास्तच चेकाळल्यासारखें करी. अेवढी तेरातेरा चौदाचौदा वर्षांची झाली तरी खुशाल मोठ्यानें हंसे. कोणी रागावलें तर ही त्याला चांगलें तासभर पुरुषासारखें व्याख्यान देअी !

तिचें लग्न तर दुपट्ट्यांत असतांच अेका झबलेवाल्या मुलाबरोबर लागलें होतें. आतां हिनें सासरीं जायला हवें होतें. पण सासरची मंडळी म्हणत, 'या वेडीला अन् भुताला कुणी आणावी घरांत ? '

तिच्या भावाचेंहि–नारायणाचें–लहानपणींच लग्न झालें होतें. आणि त्याची बायको आतां नांदायला घरीं आली होती. ती छोटी वहिनी बिचारी गरीब, सालस. काम कर, केलें. जेव म्हटलें, जेवली. मार खा, खाल्ला. ती कशाला नाहीं म्हणत नव्हती. नारायण बिचारा मेंढीचें दूध प्याला होता. त्यामुळें दोघांचें चांगलें जमे. ती अेकमेकांना प्यार करीत आणि कबुतराच्या जोडी-प्रमाणें मोठ्या सुखानें राहात.

पण ही–बिझली हिचें नांव– आतां मोठी होऊं लागली. तारुण्यात येअूं लागली. नवी हुरहूर आणि नवी नवलाअी तिला दिसूं लागली. अेकटेपणाची जाणीव तिला होअूं लागली.

पण तिच्या वेडेपणामुळें तिला कोणी जरासुद्धां शहाणी समजत नव्हतें. ती खुशाल झाडावर चढे. घराबाहेर बुरख्याशिवाय हिंडे. ती कोणाला भीत नसे. खुशाल मोठमोठ्यानें गात बसे. तासन् तास लिहीतवाचीत बसे. या साऱ्या गोष्टी म्हणजे तिच्या वेडेपणाची अुघड अुघड साक्ष होती. तिच्या कोणत्याहि कृत्याला विरोध करण्याचें साऱ्यांनीं सोडन दिलें होतें. तिनें कांहीहि करावें. खुशाल वेड्यासारखें वाचावें लिहावें ! वेडीच ती !

अेक दिवस तिचा नवरा प्रतापसिंह बिझलीची हालत पहाण्यासाठीं, कधीं नव्हे तो, या घरीं येत होता. त्याचा मित्र त्याला नुकताच भेटला होता आणि म्हणाला होता, 'तुझी बायको मोठी खुबसुरत दिसते.'

'खरंच म्हणतोस कीं काय तूं ? पण तिचं तें वेड . . . तें वेड जोंपर्यंत आहे तोंपर्यंत . . . ' प्रतापसिंहानें मोठा अुसासा टाकला.

'वेडी खरीच ! रस्त्यांतून हिंडते. बुरखा घेत नाहीं. खुशाल मोकळ्या

गळयानं गाते. हें सारं खरं. पण भाओ, तिचा आवाज भारी गोड आहे तिच्या गळयांतून जणूं सारंगी बोलते.'

'सारंगी बोलते! पण अरेरे! ती अशी मोठयानं गाअून आपल्या वेडाचं प्रदर्शन करते. पण अेरवीं ...'

प्रतापसिंहाचा जीव खालींवर होअूं लागला.

अेरवी तशी ती फार चांगली आहे. ती कुणाला दगड मारीत नाहीं, कीं शिव्या देत नाही. बोलायला गेलों तर क्वचित् अंगावर धावून येते. पण भाओ, अेरवी ती फार चांगली आहे तिचा पदर तिच्या माथ्यावरून कधीं ढळायचा नाहीं. पुरुषांशीं ती बोलते खरी, पण परवां अेकानं डोळा वर करून तिच्याकडे पाहिलं तर तिनं पायांतला जोडा काढला! खरंच प्रतापसिंह, तुमची बायको भारी चांगली आहे. अेकदा भेटून या तिला. पण ... अरेरे! बिचारी वेडी आहे!' असें म्हणून तो निघून गेला होता.

तेव्हांपासून प्रतापसिंहाला तिची ओढ वाटूं लागली. त्याला वाटलें, तिचें सौंदर्य निदान या डोळयांनीं बघून तरी यावें.

त्याला पाहतांच बिझलीच्या बापाची भारी गडबड अुडाली. मुलगी ही अशी वेडीखुळी. त्यामुळें जावअी आल्याचें सुखहि त्याला होअीना.

त्यानें जावयाला विचारलें, 'काय, यंदा पीकपाणी काय म्हणतंय? किती जनावरं आहेत तुमच्याकडे? घरची सारीं माणसं बरी आहेत ना?'

जावअी माना डोलवीत होते. त्यांना सासऱ्याचें बोलणें समजतसुद्धां नव्हतें. बिझलीचा विषय कसा काढावा या विवंचनेंत ते पडले होते. पण सासरा कांहीं तिचें नांवसुद्धां काढीना.

अखेर प्रतापसिंह हिय्या करून म्हणाला, 'म्हटलं प्रकृति कशी आहे ती बघावी बिझलीची, म्हणून मद्दाम तिला भेटायला आलों.'

तेव्हां बिझलीचा बाप जावयाला आंत घेअून गेला. बिझली गाणें गुणगुणत खिडकींतून दूरवर कुठेंतरी पाहत होती. हातांत बोटाची खूण घातलेलें अेक पुस्तक होतेंच.

मुलीचा हा अवतार दाखवण्याची बापाला मोठी शरम वाटत होती. पण

करतो काय बिचारा ? त्यानें बिझलीला हांक मारली, ' अेकलंस बिझली ? हे प्रतापसिंह आलेत. '

बिझली अेकदम भारी लाजली. तिनें हातांतलें पुस्तक कोनाड्यांत ठेवलें. गुणगुणणें आपोआप बंद पडलें. तिनें आपल्या जिवलगाकड डोळे वर करून बघितलें आणि जिवणीच्या पाकळ्या न अुलगडतां ती हळूच हंसली.

तिनें असें त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां त्याच्या अंगांतून विजेचा चमचमाट चमकून गेला. ती हंसली. तिनें असें हंसायचें नाहीं. पण तें हंसणें किती गोड होतें ! तिनें माथ्यावरून पदर घ्यायचा. पण तो घेतला नाहीं. म्हणूनच आपली बायको फार देखणी आहे हें त्याला समजून चुकलें. पायापासून डोक्यापर्यंत ती चांदणीच्या रंगानें न्हाअून निघाली होती.

प्रतापसिंहानें तिच्याकडे पाहिलें. तिनें भिवया अुंचावल्या होत्या आणि दाट केसांच्या पापण्यांखालन विस्फारित नेत्रांनीं ती त्याच्याकडे पाहत होती. वेडी असूनसुद्धां ती फार सुंदर दिसत होती.

बिझलीचा बाप कधीच निघून गेला होता. प्रतापसिंह पुढें झाला आणि तिच्या दंडाला स्पर्श करून तो म्हणाला, ' कशी आहे आतां तुझी प्रकृति ?'

' मी कधीं आजारी होतें ? छान आहे माझी तब्येत. तुम्ही बरे आहांत ना ?' आपला हात तसाच त्याच्या हातांत ठेवून तिनें त्याला विचारलें.

प्रतापसिह मनांत म्हणाला, ' अरेरे ! वेडी खरीच ! न लाजतां ही मलाच विचारते आहे. '

मग तो अुघड म्हणाला, ' तूं बुरखा कां घेत नाहींस ? गाणं कसं म्हणतेस पुरुषांसारखी ? आणि खुशाल अेखाद्या पंडितासारखीं पुस्तकं वाचून ढीग पाडतेस. हें बरं दिसत नाहीं. असं करूं नये आपण. '

ती हंसली. मग म्हणाली, ' मग काय चोवीस तास काय रांधा वाढा अुष्टीं काढाच करूं कीं काय ? या पुस्तकांत किती सुंदरसुंदर गोष्टी आहेत ! तुम्हांला दाखवूं माझीं पुस्तकं ? ' तिनें अेक ट्रंक काढली. ती पुस्तकांनीं खचून गेली होती. अेक पुस्तक काढून ती वाचूं लागली—' यांत लिहिलं आहे कीं, ' स्त्रीपुरुषांचा दर्जा समान झाला पाहिजे. कोणी कोणाचा गुलाम नाहीं. कलांची वाढ करणें ही स्त्रीपुरुषांच्या सारख्याच हक्काची गोष्ट आहे.

बायकांनीं लिहिलं पाहिजे, वाचलं पाहिजे, त्यांना हें पुरुषांनीं करूं दिलं नाहीं तर त्यांना अेकदां गोषांत बसविलं पाहिजे. त्यांना स्वयंपाक करायला लावला पाहिजे. त्यांना केर काढायला लावला पाहिजे. त्यांना—त्यांना . . .'

'हो, हो, हो, थांब !' प्रतापसिंह म्हणाला. तोसुद्धां चार अक्षरें शिकला होता. पण त्याच्या पुस्तकांतून हें असलें कांही नव्हतें. तो मनांत म्हणाला, 'दगड मारायचं वेड नाहीं खरं; पण हिला हें असलं लिहिण्यावाचण्याचं भलतंच वेड लागलं आहे. अरेरे ! अितक्या सुंदर तरुणीची काय दुर्दशा होअून गेली आहे ही !'

तो कांहींच बोलला नाहीं. त्याला वाटलें सिमेंट आणि चुन्यासारखें वेड पक्कें झालें आहे. हिच्याशीं आपण काय बोलावें ? त्यानें मुलाखत बरखास्त केली आणि तिची हनुवटी वर अुचलून आपल्या ओठांनीं तिच्या ओठांना स्पर्श केला !

त्या क्षणीं आणि तिथून गेल्यानंतरसुद्धां तिच्या स्पर्शसुखांत त्याला परमावधीचें सुख वाटलें. त्या नादांत ती वेडी आहे हेंसुद्धां तो विसरून गेला.

आणि तेव्हांपासून तो तिला वरचेवर भेटायला येअूं लागला. अखेर तिला त्यानें घरीं नेण्याचें ठरविलें. तिलाहि त्याच्याबरोबर जाण्याची अिच्छा होती. दोघे अेकमेकांना वेडे समजत होते आणि घरीं गेल्यावर शहाण करण्याचे बेत करीत होते !

पण जाण्यापूर्वी तिनें अट घातली. 'मी येअीन पण माझीं हीं पुस्तकं घेअून जायला आधीं अेक खटारा घेअून या. मी बुरखा वापरणार नाहीं. फिरायला जाणार आणि अधूनमधून गाणारसुद्धां.'

त्याला बायको हवी होती. हें वेड सोडलें तर ती फार चांगली होती. त्यानें कबूल केलें आणि राजाराणी घरीं यायला निघालीं. विझलीला तिच्या आअीनें कानमंत्र दिला. 'तुझ्या कार्यक्रमांत कांहीं फरक करूं नकोस. आहे हेंच चालूं दे.'

अखेर बिझली नांदायला गेली. कांहीं दिवसांनीं तिला दिवस गेले आणि आअीसारखेंच तिलाहि जुळें झालें. अेक मुलगा, अेक मुलगी. बिझलीच्या आअीनें पुन्हां कानगोष्ट सांगितली. वाघिणीचें दूध मुलीला मेंढीचें दूध मुलाला !

हें गुपित बिझलीनें अनेकींना सांगितलें. तिच्या बरोबरच्या बायका तिला आतां वेडी म्हणायला तयार नव्हत्या. त्याहि आपल्या मुलांना असेंच बाळकडू पाजूं लागल्या.

असें होतांहोतां बिझली मरून गेली. तीन चार पिढ्या झाल्या. पण ती गेली तर तिच्या जागीं हजारों, लाखों बिझल्या तयार झाल्या. जिकडेतिकडे स्त्रियांचें राज्य. त्यांनीं झनानी पोशाख टाकला नव्हता. पण बांगड्या-कुंकूला रजा दिली. त्या अंगांत कोट घालीत. नांवाला ओढणीचें लोढणें त्यांनीं शिल्लक ठेवलें.

दुकानांत, रस्त्यांतून सगळ्या बायका. ट्रॅम कंडक्टर स्त्री. बस-ड्रायव्हर स्त्री. मोटारी आणि विमानांची चाकें स्त्रियांच्या हातांत. पुरुष आपले गोषा घेऊन मागें बसूं लागले. त्यांच्या हातांत मुलांचीं गाठोडीं आणि दुपट्यांच्या पिशव्या !

पेढीवर, रेल्वेंत, पोस्टांत, बॅंकेंत स्त्रिया. पुरुष औषधालासुद्धां दिसेना.

सगळी अुलटापालट झाली होती. गव्हर्नर जनरलच्या जागीं नुकतीच अेका विद्वान् अधिकारी स्त्रीची नेमणूक झाली होती. त्या स्त्रीला नुकतींच साठ वर्षे पुरीं झालीं होतीं. तिचा जेव्हां सत्कार–समारंभ झाला तेव्हां अेकसष्ट पुरुषांनीं बुरखा पांघरून तिला पंचारती ओवाळली ! आणि ते सारे पुरुष अगदीं नम्रपणानें पुन्हां पडद्याआड जाअून बसले. समोर अफाट स्त्रीसमाज पसरला होता. आणि आपली मालमत्ता जागच्याजागीं आहे ना, याची त्या पडद्याकडे दृष्टि टाकून खात्री करून घेत होत्या.

अलीकडे पुरुषांचा वरचेवर विनयभंग होअूं लागला होता ! त्या साऱ्यांनीं मोठा अर्ज करून स्त्री अधिकाऱ्यांकडे पाठविला होता.

अेकदां अेका मुलाला बायका पाहावयास यायच्या होत्या. तो बिचारा अगदीं घाबरून गेला होता. त्या साऱ्या आल्या तेव्हां त्यानें साऱ्यांना खालीं वाकून नमस्कार केला. त्या म्हणाल्या, ‘ मुला बैस खालीं. स्वयंपाक येतो का करायला ?’ त्यानें नुसती मान डोलावली. ‘ हो नाहींतर अलीकडे मुलांना स्वयंपाक नकोसा झाला आहे. त्यांना वाटतं, आपल्या बायकोनंच स्वयंपाक करावा. आमच्याकडे नाहीं हो तसं चालायचं. ’

अेवढ्यांत तिसऱ्या अेका बाअीच्या ध्यानांत आलें. तिनें स्पष्टच विचारलें, ‘ डोक्यांत गंगावन नाहीं ना घातलेलं ?नाहीं तर हल्लीं पुरुष आपले खुशाल गंगावनं लावतात नि हिंडतात. मूळचे केस सुंदर हवेत. ’

‘ नांव काय तुझं ? भाअूबहिणी किती तुला ? वाचायला शिकला आहेस का चार अक्षरं ? आणि भरतकाम ? आण बघूं अेखादा नमुना. ’

त्यानें चार विणलेले नमुने आणले. तो चालत आला तेव्हां अेक बाअी पुटपुटली, ‘ चालण्याबिलण्यांत कांहीं खोड नाहीं. ’

त्या मुलाचा आजोबा आणि वडील जवळच बसले होते. ते अगदीं लाचार चेहरे करून म्हणाले, ‘ पदरांत घ्यायचं आमच्या मुलाला ! आपण म्हणाल ती करणी; सांगाल तो हुंडा. मुलगा भारी सालस आणि गरीब. खाण्या-पिण्याची कसली खोड नाहीं. आमच्या घरची शिस्तच त्याला आहे. कधीं वर मान करून अुलट बोलायचा नाहीं. आपलं स्थळ—आपली मुलगी लाखांतली, आय. सी. अेस. झालेली, म्हणून आम्ही आपल्या दारीं आलों. ’

त्या बायका जरा थोड्या ताठ बसल्या. त्यांनीं अैकल्या न अैकल्यासारखेंच केलें आणि मुलाच्या वडिलांनीं सांगितलें, ‘ अैकलंस का रे श्रीधर, यांना चहा घेअून ये. बशींत सांडूं नकोस बरं. ’

तो अगदीं घाबरून गेला होता. आय. सी. अेस्. बायकोच्या घरीं नांदायला जायचं, हें घरदार सोडायचं म्हणजे काय चेष्टा होती ? ‘ हें नाहीं आपल्याला जमायचं, ’ असें कांहींसें त्याला वाटत होतें. तोंच आजोबा पुन्हां ओरडला, ‘ सुपारी आण रे, ’ आणि त्याबरोबर त्याच्या हातांतलें कपबशांचें ताट धाडकन् खालीं पडलें. लाजेनें तो अर्धमेला झाला.

पण ही सोयरीक जमली. लग्नांत पांच हजार हुंडा, तीन हजार करणी. मुलीची आअी म्हणाली, ‘ मुलाला दागिने आम्ही घालणार नाहीं. महागाअी कोण ! तुम्ही आपल्या मुलाचं सालंकृत पुत्रदान करा. वधुघोडा तुम्हीं मिरवला पाहिजे. आम्ही वरात काढली तर काढूं. महागाअी कोण झाली आहे ! रेशनचं धान्य तुम्ही जमवा आणि दोन्हीकडचा खर्च तुम्हीं करून हें कार्य अुलगडून टाका. दिवस हे असे. सर्वांनींच समजुतीनं घेतलं पाहिजे ! ’

आणि तें लग्न अेकदाचें लागलें. मुलानें मुलीचें अुष्टें खाल्लें. वरातीच्या

वेळीं तो बुरखा घेऊन बसला आणि मुलगी बूटसूट घालून समोर उडविलेली दारू अैटींत पाहत होती.

मुलाचें 'श्रीधर' नांव बदलून 'परशुराम' ठेवलें. त्याच्या माहेरचीं माणसं परत जाअूं लागलीं तेव्हां तो खूप रडला. त्याचा बापसुद्धां भारी रडला. आअीनें त्या मानानें धीर धरला होता. मग अेक मुलगा त्याची पाठराखण करायला राहिला. सगळीं निघालीं तेव्हां त्यानें नांव घेतलं–' बापाचं वळण, आअीचं शिक्षण, अुमाबाअींच्या जिवावर होअीन अुभय कुलाचं भूषण!'

अलिकडे पुरुषांनीं पायजम्याची अुंची गुडघ्याच्या थोडी खालीं आणि घोटयाच्या बरीच वर अशी करून टाकली होती. कुडत्याच्या बाह्या पोलक्यासारख्या करून टाकल्या होत्या. नाहींतर कामें करतांना त्यांना भारी त्रास होअी. स्वयंपाकघराचा चार्ज पुरुषांकडे. घरांत आतां आजीबाअींअैवजीं आजोबा असत आणि आजीबाअी बाहेरच्या खोलींत अंथरूण टाकून सुपारी कातरीत किंवा वर्तमानपत्राच्या आडून आल्यागेल्यावर कोल्हयासारखा पहारा करीत बसत.

माझ्या समोरच्या घरांतला तो आजोबा चुलींत लांकडें सरकवीत सरकवीत ओरडूं लागला, 'अैकलंस कारे बाबा? भांडीं विसळतांना तो तुझा पायजमा जरा वर घेत जा, अगदीं जमिनीला घासून जातो. म्युनिसिपालिटीचा खराटा का आहे तो? अुद्यां सासरीं गेलास म्हणजे बायको नांदवून घेअील का तुला?'

अितक्यांत दुसरा अेक पुरुष कणीक तिंबतांतिंबतां दुसऱ्या अेका मुलाला म्हणाला, 'कमाल आहे बाबा तुझी. मघाशीं ती शेजारची बाअी येअून गेली तर तूं आपला खुशाल तोंड अुघडं टाकून बसला होतास. ओढणीचा पदर जरा नीट घ्यायला काय झालं? आणि ती कोथिंबीर पाण्यांत नाहीं ठेवलीस? पापड घालायचेत आज. पापडखाराची पूड करून ठेव आणि तें लोणचं कालच भरून ठेवायला हवं होतं. डाळी वाळत घातल्यास का? हीं कामं केलीं नाहींत तर बायकोच्या घरीं गेल्यावर होअील कसं बाबा तुझं? मुलाचा जन्म म्हणजे पाप आहे बरं!'

तो मुलगा कंटाळला होता. तो म्हणाला, 'होय बाबा, करतो सगळं. पण

हा धाकटा रडतोय मघापासनं. त्याला जरा दूध पाजतों. चिंगीला आंघोळ घालतों. आजीला मात्रा द्यायची राहिलीय ती देतों. पूजेची तयारी करतों. अजून माझी वेणीसुद्धां झाली नाहीं. आत्याबाओीनं ओकूनखोकून सारी घाण केलीय्, ती निस्तरली पाहिजे, नळ आतां जाअील, त्याचं पाणी भरायचं आहे. धुण्याचा डोंगर बडवायचा आहे. मला काय चार हात आहेत? आम्ही पुरुष आपलें सहन करतों म्हणून आमच्या फारच बोकांडीं बसतंय्.'

त्याचा बाप कणकीच्या गोळ्याला अेक थपाटा देअून म्हणाला, 'तूं फार वर तोंड करून बोलायला लागला आहेस बरं का. तुझ्या तोंडाला कुणी लागावं ? तुझं तोंड म्हणजे तोफखाना आहे नुसता. पण पुरुषाचा जन्म आपला किती झालं तरी आपण पुरुष. मुलीचा जन्म असता तर जमीनं चार बोटं वर झाली असती. अरे, तो गोप्या बघ, त्यानं दुपटं भिजवलं वाटतं सगळं तो लेंगा जरा वर खोचून धर. आतां बाओीसाहेब कामावरनं घरीं आल्या तर अनअन भात, वरण, भाजी वाढली पाहिजे.'

तो असे म्हणत आहे तों रस्त्यावरून बुरखा काढून टाकलेल्या दहावीस पुरुषांची अेक टोळी आरडाओरडा करीत बिगुल फुंकीत आली. त्यांच्याभोंवती सगळीं बायकापोरें जमलीं. कर्णा तोंडाशीं धरून तो ओरडला, 'असं आश्चर्यानं आमच्याकडे बघू नका. आमच्यावर हा जुलूम आहे. हा अन्याय आहे. आम्ही पुरुष यापुढं नुसतं चूलमूल नाहीं करणार. आम्हांला शिक्षण पाहिजे. आम्ही गोषा फेकून देणार. आम्ही कुणाचं अैकणार नाहीं. पुरुषांची जात म्हणजे पापाची परंपरा ही खोटी समजूत आहे. आम्हीसुद्धां स्त्रियांच्या खांद्याला खांदा लावून काम करूं. आम्ही कांहीं वेडे म्हणून बोलत नाहीं. आम्ही जागे झालोंत. तुम्हीसुद्धां जागे व्हा. पण आमचं हें म्हणणं पुरुषांनीं अैकायला हवं आहे. बायकांची ही लुडबूड आम्हांला नको आहे.'

आणि त्यांनीं पुन्हां धाडधुम धाडधुम करीत बिगुल नि ताशा वाजवला. शूर स्त्रियांसारखे ते खुशाल लेफ्ट-राअिट करीत चालूं लागले. त्यांनीं आपले केस आंखूड करून घेतले होते. आणि ओढणीची अडगळ भिरकावून दिली होती.

त्याची ही अशी टोळधाड अचानक आली आणि अचानक निघून गेली.

त्यांचें भाषण माजघरांतल्या खिडक्या-दारांतून पुरुषांनीं अैकलें. ते आपल्या मुलांना दटावीत म्हणाले, डोकीं फिरलींत यांचीं. माथीं भडकलेले लोक आहेत हे. संसार सोडला अन् बायकांसारख्या नोकऱ्या करायला निघालेत. चला आटपा, बायकोची मर्जी संभाळणं ही अेक कला आहे. त्याशिवाय संसार होत नसतो. टॉवेल आहे का मोरींत ? आज आंघोळ व्हायची राहिलीय् त्यांची. '

अितक्यांत मोटारींतून त्या साऱ्यांची पोशिंदी खाडखाड बूट वाजवीत घरांत आली. तिनें कोट आपल्या नवऱ्याच्या हातांत दिला. बूट काढायला मुलापुढे पाय केला आणि कपाळाला आंठ्या घालीत ती म्हणाली, ' पाणी तापलंय का माझं ? जेवण झालं कीं नाहीं ? आज जेवून ताबडतोब मला मेल गाठायची आहे. माझ्या प्रवासाची तयारी करा. तो होल्डॉल आण, पाण्योचा ताब्या आण. फराळाचा डबा भर रे. ' ती अिकडे तिकडे धांवपळ करीत साऱ्यांची दाणादाण अुडवून देत होती. हातांतला रुमाल धुण्यासाठीं नवऱ्याच्या अंगावर फेंकून ती बाथरूमकडे गेली.

थोड्या वेळानें नवरा लुगड्याच्या निऱ्या तिच्या हातीं देत म्हणाला, ' अैकलं का, पाणी काढलंय आंघोळीला. '

—आणि मी अेकदम जागी झालें. माझी आअी मला अुठवीत होती आणि म्हणत होती, ' अूठ आतां. बंबांत विस्तव घाल बघूं. '

## तूं मला फसविलंस : : ४

तुझी माझी प्रथम भेट झाली ... म्हणजे तसा मी तुला ओळखीत होतों. आणि तूंहि मला ओळखीत होतीस. पण आपल्या जीवनाचे धागेदोरे अेकमेकांत ज्या प्रसंगानं गुंफले जाअू लागले तो प्रसंग ... तो आठवतो तुला ? त्या वेळीं तुझ्या भावानं आणि भावजयीनं तुला अेका वस्त्रानिशीं बाहेर काढली होती. तूं रडत होतीस. अगदीं हमसून हुमसून रडत होतीस. जी चूक तुझ्या हातून घडली ती पुन्हां कधींहि न होअू देण्याची हमी तूं तुझ्या दादा-वहिनींच्या पाया पडून देत होतीस. 'माझे अपराध पोटांत घाल, दादा-' असं आतडं पिळवटून तूं अेकीकडे म्हणत होतीस; आणि अेकीकडे तुझ्या अश्रूंनीं त्या घरची जमीन भिजवीत होतीस. तुझ्या आक्रोशानं त्या दगडा-मातीच्या कठीण हृदयालासुद्धां भेगा गेल्या असतील. पण तुझ्या रक्ताच्या नात्याला ... तुला आपल्या हातावर खेळविलेल्या तुझ्या दादाला तुझी करुणा आली नाहीं. संतापानं वेडा होअून तो सारखा बोलत होता; आणि त्याच्या शब्दांची धार तुझं हृदय विदीर्ण करीत होती. तो क्रोधानं थरथर कांपत होता आणि तूं दुःखभारानं गदगदून हालत होतीस. तुझं अजून लग्नसुद्धां झालं नव्हतं, कीं लग्नाचीं मंगलाष्टकं तूं अैकलीं नव्हतींस. गौरीहराचं पूजन करून दारच्या पाहुण्याचं शुभचिंतन तूं केलं नव्हतंस कीं बोहल्यावर चढून सप्तपदीचीं पावलं तूं टाकलीं नव्हतींस. मधुचंद्राचं दर्शन अजून तुला घडलं नव्हतं आणि सासूनं भरलेले तांदूळ तूं आपल्या सुकुमार पावलानं सांडले नव्हतेस. अजूनहि ज्याच्या भवितव्याशीं तुझा भविष्यकाल बांधला जायचा त्या भाग्यवान् (?) पुरुषाचं नांव तूं अुखाण्यांत गुंफलं नव्हतंस.

यांतलं कांहींच झालं नव्हतं. यांतलं तूं कांहींच अनुभवलं नव्हतंस आणि तरीहि ... तरीहि काय झालं होतं तें तुला माहीत आहे ! अशी चमकल्या-सारखी माझ्याकडे पाहूं नकोस. फक्त दोनच वर्षांपूर्वींची ही गोष्ट आहे. पण

ती घडली आहे. आज तुला त्याचं कांहीं वाटेनासं झालं आहे. जें भूतकाळांत जमा होतं तें तुझ्या लेखी विस्मृतीच्या अेकाच फटकाऱ्यानं शून्यांत विलीन होअून जातं. पण ज्या क्षणीं तुझ्या भावानं तुला बाहेरचा रस्ता दाखवला तेव्हां . . . तेव्हां तूं त्याच्या पायाला मिठी घातलीस. दुःखानं तुझ्या अंतः-करणाचा कणन् कण फाटून निघत होता. अेकदां दादाच्या आणि अेकदां वहिनीच्या पायांना विळखा घालून तूं त्यांची सारखी क्षमा मागत होतीस. पण पायाच्या अेकाच ठोकरीसरशीं तुला अुडवून जेव्हां तुझा दादा ओरडला, ' चालती हो अिथून. तुझ्या पापाचा निखारा पदरांत बांधून राहायची माझी अिच्छा नाहीं. हरामखोर ! कुळबुडवी ! माझी बहीण म्हणायची शरम वाटते मला. हलकट ! बेशरम— '

तेव्हां तुझा नाअिलाज झाला. अेका वस्त्रानिशीं तू घराबाहेर पडलीस. पाय नेतील तिकडे तूं जात होतीस, तू बेशुद्ध नव्हतीस; पण तरीहि शुद्धीवर नव्हतीस. तुझा विपुल केशसंभार सुटून अस्ताव्यस्त झाला होता आणि मावळत्या किरणांची निस्तेज मरगळी तुझ्या सबंध देहावर पसरली होती.

तूं आणि तुझा देह या जणू दोन वस्तू होत्या. तुझा जीव वैतागून पिसाटा-सारखा कुठेंतरी चालला होता. आणि तुझा भारावलेला, श्रांत झालेला देह तुझ्यामागून फरफटल्यासारखा येत होता.

तो असा किती फरफटत राहिला असता कोण जाणे ! पण मी समोरून येत होतों. शेजारच्या गांवांतलं काम संपवून मी गाडींतून येत होतों. प्रथम मीं तुला ओळखलीच नाहीं. परिस्थिति बदलली म्हणजे माणसाचा चेहराहि किती बदलतो याचं तूं म्हणजे मूर्तिमंत अुदाहरण होतं. मी गाडींतून अुतरलों आणि तुझ्याजवळ आलों. तुझ्याकडे मीं पाहिलं. तुला मीं हांका मारल्या; पण तूं अेखाद्या वेड्यासारखी दिसलीस. तुझ्या चेहऱ्यावर भयानक नैराश्या-ची वेडसर छाया अितकी दाट पसरली होती कीं मी मनांतल्या मनांत आश्चर्यानं आणि भीतीनं चूरमार होऊन गेलों. तुझे खांदे घुसळून मी जेव्हां तुला विचारलं, ' अिकड कुठं चाललीस तूं, सरला ? '

तेव्हां त्याचं अुत्तर तूं शब्दानं मुळींच दिलं नाहींस. तूं हंसलीस . . . अगदीं बेसूर हंसलीस. आणि हंसतांहंसतां रडलीसमुद्धां. माझ्या प्रश्नाला अुत्तर देण्या-

अितका वेळ अजून तुझ्यांत आला नव्हता. रस्त्यावरच्या धुळींतच असहाय्य-पणें तूं लोळण घेतलीस आणि अेवढंच म्हणालीस. 'मला अुभंसुद्धां राहवत नाहीं हो; मला नाहीं सहन होत आतां.'

काय झालं होतं हें मला कळलंच नव्हतं पण तुझी ती दु:स्थिति मलासुद्धां पाहवेना. 'चलतेस का माझ्याबरोबर?' असं मी तुला विचारलं; पण श्रमानं कीं काय तुला ग्लानी आली होती. तुझ्या तोंडावर पाण्याचा शिडकावा करून मी तुला थोडी सावध केली; आणि ह्या बाहूंनीं–कीं ज्यांच्या आधारासाठीं तूं पुढें वेडी झालीस––मी तुला अेखाद्या नाजुक फुलासारखी अुचलली आणि गाडींत ठेवली.

त्या रात्रीं त्या घरांत तूं, मी आणि माझा गडी अेवढेच आपण होतों. गार झालेल्या अन्नाचीं ताटं मीं वाढून घेतलीं. पण दोन घासांचीसुद्धा तुला भूक नव्हती. घरांत अेक दु:खीकष्टी जीव बघून माझीसुद्धां अन्नावरची अिच्छा अेकाअेकीं नाहींशी झाली. तुझं संकट मला पूर्णत्वानं कळलं नव्हतं, तरीहि तुझ्या दु:खाची हाय माझ्या संवेदनशील मनाला लागल्याशिवाय राहिली नाहीं. तुझ्या दु:खाचं कारण आपल्याला कळावं असं मला वाटत होतं; पण...पण तुझ्याकडे पाहून तुला विचारण्याचं धाडस त्या रात्रीं मी केलं नाहीं.

रात्रभर आंतल्या खोलींत तूं तळमळत होतीस आणि आंतल्याआंत धुमसून रडत होतीस, हें सारं मला बाहेरच्या खोलींत समजत होतं. पलीकडेच माझा गडी मात्र शांतचित्तानं घोरत पडला होता.

सकाळ झाली आणि अुठून तूं बाहेर आलीस सहा महिन्यांच्या आजाऱ्या-सारखा तुझा चेहरा अुतरून गेला होता. पण अेवढ्या अवधींत आपल्या मनाला तूं पुष्कळच सावरलं होतंस. माझ्यासमोर बसून तूं म्हणालीस, 'काल तुम्हीं मला रस्त्यांतून अिथं आणलीत आणि रात्रभर आपल्या घरांत थारा दिलात याचा लोक काय अर्थ काढतील याची कल्पना आहे तुम्हांला?'

मीं नुसतीच मान हालवली. कालच्या त्या प्रकारानंतर आज तुला अेवढं सुसंबद्ध बोलतां येत होतं याचंच मला भारी आश्चर्य वाटून राहिलं होतं. तूं म्हणालीस, 'हें असं कां झालं माहीत आहे तुम्हांला?'

मीं नुसतीच मान हालवली.

'आमच्याकडे दादाचा अेक मित्र नेहमीं येत असे त्या मित्राची आणि दादाची फार जानपछान होती. त्याची तो नेहमीं स्तुति करीत असे. तो मित्र सुशिक्षित, पदवीधर, सुंदर चेहऱ्यामोऱ्याचा आणि मोठा बुद्धिमान् होता. दादा–वहिनींबरोबर मीहि त्याच्याशीं बोलत असें त्याचं अिंग्रजी मोठं सुंदर होतं आणि माझं त्या मानानं फारच कच्चं होतं. सहज म्हणून मीं त्याला विचारलं, 'हें सारं तुम्हीं वाचलंत तरी कुठं आणि केव्हां ?' 'हें ज्ञानभांडार सारं अिंग्रजी भाषेंत भरलं आहे,' असं जेव्हां तो म्हणाला तेव्हां अिंग्रजी वाढविण्याची मला सुरसुरी आली आणि मग रोज संध्याकाळीं तो मला शिकवायला येअू लागला. दादावहिनींची ती फिरायला जायची वेळ होती. आणि घरांत आम्ही दोघंच बसत असूं.

'प्रथम प्रथम त्यानं फार चांगलं शिकवलं. पण नंतर तो शिकवायचं विसरूं लागला आणि मी शिकायचं विसरूं लागलें! आम्ही अेकमेकांकडे पाहात बसूं लागलों. दुसऱ्याच कसल्या गप्पा मारूं लागलों. पण पावलांना लोहचुंबक लावलेली बाहुली जशी कशीहि फेकली तरी नेमकी पावलांवरच अुभी राहते, तसंच, कसं कोण जाणे, गद्य, पद्य, वाङमय अितिहास असल्या निरनिराळ्या प्रांतांत जाअून आलों तरी 'लव्ह' या शब्दावर आमची गाडी येअून थांबे. पुनःपुन्हां तेंच! फिरून फिरून तेंच!

'दादाच्या हें सारं लक्षांत आलं होतं त्याला हें पसंत होतं. आणि अखेर त्याच्या संमतीनंच त्याच्या मित्राशीं माझं लग्न ठरलं

'आणि तें ठरलं त्या दिवसापासून दादावहिनींनीं आम्हांला वेळेची जास्त सवलत दिली.

'पण विश्वास, सुसंस्कृत भाषेच्या आवरणाखालीं झांकलेलं त्याचं अंतःकरण मात्र तसं नव्हतं. मिळालेल्या संधीचा दुरुपयोग करूं नये असं मला वाटत असतांना त्यानं तो सिद्धीस जाअूं दिला नाहीं. सुरुवातीला त्यानं आपल्या अुत्सुकतेचं प्रदर्शन कधीं केलं नाहीं. त्यामुळें त्याची अुत्सुकता मला समजे तरी तिच्या मागें जहरी सर्पाचा फूत्कार मला कधीं अेकूं आला नाहीं. भोळेपणानं त्याच्या सौजन्यावर मी विश्वासून राहिलें. पण विश्वास, तुम्ही माझे जुने स्नेही म्हणून तुम्हांला निर्लज्जपणानं सांगतें कीं त्या दिवशीं तो रानटी माणसा-

सारखं वागला. अेखाद्या अुपाशी लांडग्यानं शिकार दिसतांच ती ओरबाडून बोचकारून खावी, तसं त्या माझ्या वाङनिश्चित पुरुषानं माझं कौमार्य लुटून नेलं. ज्याच्यावर विश्वासून मी आयुष्यभर राहणार होतें, त्यानंच–त्या कृपणानंच शेत अेकाअेकीं गिळून टाकलं, खाअून टाकलं आणि–आणि—'

बोलूनबोलून तूं थकून गेली होतीस. दुःखानं दाटलेला आवंढा गिळून तूं पुन्हां सांगूं लागलीस. मी नुसता अैकत होतों. काय बोलावं हें मला सुचतच नव्हतं. तू म्हणालीस, 'यानंतरसुद्धां तो दोनतीन महिने येत होता. पण कां कोण जाणे, या पुरुषाचं दर्शनसुद्धां नको असं मला होअून जाअी. माझ्या मनाविरुद्ध त्यानं माझ्याशीं मर्यादा सोडून सलगी केली होती. त्यानं घरांत पाअूल टाकलं कीं कोपऱ्यांतला जोडा घेअून त्याला चांगला फोडून काढावा असं मला वाटे. पण तसं करणं माझ्या शक्तीबाहेरचं होतं आणि हिताचं तर मुळींच नव्हत. या विपरीत प्रकाराचा साक्षीदार अुद्यां अुभा राहिला तर नराधमाचं सोयरसुतक न पाळून माझं चालावं कसं ? या भयानं मी वरकरणी त्याच्याशीं हंसत असें, बोलत असें. पण भीतीनं आणि शरमेनं मी आंतल्या आंत अगदीं मरून गेलें होतें. त्याला मात्र त्याचा गंधसुद्धां नव्हता. पॅंटच्या खिशांत हात घालून अुभं राहण्याची त्याची ती अैट जरासुद्धां वाकली नव्हती. अजूनसुद्धां तो वाङमयाच्या आणि तत्त्वज्ञानाच्या दिलखुलास गप्पा मारी आणि विनोदानं आनंदित होअून खदखदून हंसायला तो कमी करीत नसे.

'हें सारं पाहून अेखाद्या वेळीं मला असं वाटे, की समजा, होअूं नये तें झालं तरी 'हें बाळ माझं नाहीं,' असं म्हणायचा निर्दयपणा हा करणार नाहीं.

'पण विश्वास, हा माझा भ्रम होता. त्याला जेव्हां हें समजलं तेव्हां मलाच अुलट त्यानं विचारलं, 'ही काय भानगड आहे सरला ? तुला आअी म्हणणारं हें मूल वडील म्हणून कुणाला बिलगणार आहे ? '

'कुणाला म्हणजे ? तुम्हांला ? '

'हें पहा, बनवाबनवी करून मी फसायचा नाहीं. प्रेम माझ्यावर दाखवून तूं बाहेर अुकिरडा फुंकलास कीं नाहीं ? माझ्याशीं बेअिमानी केलीस कीं नाहीं ? ' असं अद्वातद्वा अुलटया काळजानं बोलून माझं अेक अक्षरहि न अैकतां तो सत्पुरुष खाडखाड बूट वाजवीत निघून गेला.

'त्यानं दादाला सांगितलं, त्याला आणि वहिनीला त्यानं पुरतं बनवलं आणि माझं कुणीच खरं मानलं नाहीं. मी जीव तोडून सांगितलं तरी दादानं माझ्या म्हणण्याचा विचार केला नाहीं. कारण माझ्यापेक्षां त्याचा मित्रावर जास्त विश्वास होता.

'मित्रानं साऱ्या गांवांत सांगून टाकलं कीं 'आमचं लग्न मोडलं. सरला अेक बदफैली मुलगी आहे. आणि आतां ती लौकरच माता होणार आहे. बरं झालं. मला वेळींच समजलं आणि अेका आपत्तींतून मी वांचलों.'

'तो सुटला पण हें तोंड दाखवायचं म्हणजे मला मरणप्राय दुःख होअी. अिच्छा नसतांना या संकटांत मी सांपडलें होतें. आणि तो मात्र माझा सत्यानाश करूनसवरून नामानिराळा होअून बसला होता.

'ह्या गांवांत राहण्याची मला सोय अुरली नव्हती. अनाथाश्रमांत मी हूनच गेलें. जन्माला येणारं मूल जन्माआधींच मरून गेलं होतं. त्याच्याबरोबरच मीहि कां मरून गेलें नाहीं हें मात्र मला समजत नाहीं. मी जिवंत राहिलें—नको असतांना जिवंत राहिलें. आणि पुन्हां निर्लज्ज होअून दादाच्या घरीं आलें.

'आल्यापासून चार दिवस दादानं कसे तरी काढले आणि विश्वास, अखेर शेवटीं त्यानं काल मला घराबाहेर काढली. आज या जगांत मला माझं असं कोणी अुरलं नाहीं. माझ्यासाठीं अश्रू ढाळील असं अेकहि अंतःकरण शिल्लक राहिलं नाही. विश्वास, जीव जगावा असं कांहीं वाटत नाहीं. पण गाडीच्या रुळावर पडण्याचं किंवा रुपयाची अफू खाण्याचं धैर्य मात्र माझ्याजवळ नाहीं. मी काय करूं ? कशानं मला मरतां येअील ? आणि मरतां येणार नसेल तर कोणासाठीं मला जगतां येअील ? खरंच. खरंच कसं होअील आतां माझं ?'

असं म्हणून आपलं तोंड तूं दोन्ही हातांनी झांकून घेतलंस आणि अितका वेळ आवरलेल्या अश्रूंना वाट करून दिलीस.

तुझं सांत्वन कोणत्या शब्दांनीं करावं हेंच मला समजेना. तुझ्या जागीं मी असतों तर ? तर माझी अवस्था याहून काय निराळी झाली असती ? 'अमक्याच्या जागीं मी असतों तर ?' अशा प्रश्नानं दर वेळीं विचार करण्याची जी संवय मला लागली आहे त्यामुळंच मी तुझ्या असहाय्य परि-

अितका वेळ अजून तुझ्यांत आला नव्हता. रस्त्यावरच्या धुळींतच असहाय्य-पणें तूं लोळण घेतलीस आणि अेवढंच म्हणालीस. 'मला अुभंसुद्धां राहवत नाहीं हो; मला नाहीं सहन होत आतां.'

काय झालं होतं हें मला कळलंच नव्हतं पण तुझी ती दु:स्थिति मलासुद्धां पाहवेना. 'चलतेस का माझ्याबरोबर?' असं मी तुला विचारलं; पण श्रमानं कीं काय तुला ग्लानी आली होती. तुझ्या तोंडावर पाण्याचा शिडकावा करून मी तुला थोडी सावध केली; आणि ह्या बाहूंनीं—कीं ज्यांच्या आधारासाठीं तूं पुढें वेडी झालीस——मी तुला अेखाद्या नाजुक फुलासारखी अुचलली आणि गाडींत ठेवली.

त्या रात्रीं त्या घरांत तूं, मी आणि माझा गडी अेवढेच आपण होतों. गार झालेल्या अन्नाचीं ताटं मीं वाढून घेतलीं. पण दोन घासांचीसुद्धा तुला भूक नव्हती. घरांत अेक दु:खीकष्टी जीव बघून माझीसुद्धां अन्नावरची अिच्छा अेकाअेकीं नाहींशी झाली. तुझं संकट मला पूर्णत्वानं कळलं नव्हतं, तरीहि तुझ्या दु:खाची हाय माझ्या संवेदनशील मनाला लागल्याशिवाय राहिली नाहीं. तुझ्या दु:खाचं कारण आपल्याला कळावं असं मला वाटत होतं; पण...पण तुझ्याकडे पाहून तुला विचारण्याचं धाडस त्या रात्रीं मी केलं नाहीं.

रात्रभर आंतल्या खोलींत तूं तळमळत होतीस आणि आंतल्याआंत धुमसून रडत होतीस, हें सारं मला बाहेरच्या खोलींत समजत होतं. पलीकडेच माझा गडी मात्र शांतचित्तानं घोरत पडला होता.

सकाळ झाली आणि अुठून तूं बाहेर आलीस सहा महिन्यांच्या आजाऱ्या-सारखा तुझा चेहरा अुतरून गेला होता. पण अेवढ्या अवधींत आपल्या मनाला तूं पुष्कळच सावरलं होतंस. माझ्यासमोर बसून तू म्हणालीस, 'काल तुम्हीं मला रस्त्यांतून अिथं आणलीत आणि रात्रभर आपल्या घरांत थारा दिलात याचा लोक काय अर्थ काढतील याची कल्पना आहे तुम्हांला?'

मीं नुसतीच मान हालवली. कालच्या त्या प्रकारानंतर आज तुला अेवढं सुसंबद्ध बोलतां येत होतं याचंच मला भारी आश्चर्य वाटून राहिलं होतं. तूं म्हणालीस, 'हें असं कां झालं माहीत आहे तुम्हांला?'

मीं नुसतीच मान हालवली.

'आमच्याकडे दादाचा अेक मित्र नेहमीं येत असे त्या मित्राची आणि दादाची फार जानपछान होती. त्याची तो नेहमीं स्तुति करीत असे. तो मित्र सुशिक्षित, पदवीधर, सुंदर चेहऱ्यामोऱ्याचा आणि मोठा बुद्धिमान् होता. दादा–वहिनींबरोबर मीहि त्याच्याशीं बोलत असें. त्याच अिंग्रजी मोठं सुंदर होतं आणि माझं त्या मानानं फारच कच्चं होतं. सहज म्हणून मीं त्याला विचारलं, 'हें सारं तुम्हीं वाचलंत तरी कुठं आणि केव्हां ?' 'हें ज्ञानभांडार सारं अिंग्रजी भाषेंत भरलं आहे,' असं जेव्हां तो म्हणाला तेव्हां अिंग्रजी वाढविण्याची मला सुरसुरी आली आणि मग रोज संध्याकाळीं तो मला शिकवायला येअूं लागला. दादावहिनींची ती फिरायला जायची वेळ होती. आणि घरांत आम्ही दोघंच बसत असूं.

'प्रथम प्रथम त्यानं फार चांगलं शिकवलं. पण नंतर तो शिकवायचं विसरूं लागला आणि मी शिकायचं विसरूं लागलें! आम्ही अेकमेकांकडे पाहात बसूं लागलों. दुसऱ्याच कसल्या गप्पा मारूं लागलों. पण पावलांना लोहचुंबक लावलेली बाहुली जशी कशीहि फेकली तरी नेमकी पावलांवरच अुभी राहते, तसंच, कसं कोण जाणे, गद्य, पद्य, वाङमय अितिहास असल्या निरनिराळ्या प्रांतांत जाअून आलों तरी 'लव्ह' या शब्दावर आमची गाडी येअून थांबे. पुन:पुन्हां तेंच! फिरून फिरून तेंच!

'दादाच्या हें सारं लक्षांत आलं होतं त्याला हें पसंत होतं. आणि अखेर त्याच्या संमतीनंच त्याच्या मित्राशीं माझं लग्न ठरलं

'आणि तें ठरलं त्या दिवसापासून दादावहिनींनीं आम्हांला वेळेची जास्त सवलत दिली.

'पण विश्वास, सुसंस्कृत भाषेच्या आवरणाखालीं झांकलेलं त्याचं अंत:करण मात्र तसं नव्हतं. मिळालेल्या संधीचा दुरुपयोग करूं नये असं मला वाटत असतांना त्यानं तो सिद्धीस जाअूं दिला नाहीं. सुरुवातीला त्यानं आपल्या अुत्सुकतेचं प्रदर्शन कधीं केलं नाहीं. त्यामुळें त्याची अुत्सुकता मला समजे तरी तिच्या मागें जहरी सर्पाचा फूत्कार मला कधीं अेकूं आला नाहीं. भोळेपणानं त्याच्या सौजन्यावर मी विश्वासून राहिलें. पण विश्वास, तुम्ही माझे जुने स्नेही म्हणून तुम्हांला निर्लज्जपणानं सांगतें कीं त्या दिवशीं तो रानटी माणसा-

## तूं मला फसविलंस : : ४

तुझी माझी प्रथम भेट झाली ... म्हणजे तसा मी तुला ओळखीत होतों. आणि तूंहि मला ओळखीत होतीस. पण आपल्या जीवनाचे धागेदोरे अेकमेकांत ज्या प्रसंगानं गुंफले जाअू लागले तो प्रसंग ... तो आठवतो तुला ? त्या वेळीं तुझ्या भावानं आणि भावजयीनं तुला अेका वस्त्रानिशीं बाहेर काढली होती. तूं रडत होतीस. अगदीं हमसून हुमसून रडत होतीस. जी चूक तुझ्या हातून घडली ती पुन्हां कधींहि न होअूं देण्याची हमी तूं तुझ्या दादा–वहिनींच्या पाया पडून देत होतीस. 'माझे अपराध पोटांत घाल, दादा–' असं आतडं पिळवटून तूं अेकीकडे म्हणत होतीस; आणि अेकीकडे तुझ्या अश्रूंनीं त्या घरची जमीन भिजवीत होतीस. तुझ्या आक्रोशानं त्या दगडामातीच्या कठीण हृदयालासुद्धां भेगा गेल्या असतील. पण तुझ्या रक्ताच्या नात्याला ... तुला आपल्या हातावर खेळविलेल्या तुझ्या दादाला तुझी करुणा आली नाहीं. संतापानं वेडा होअून तो सारखा बोलत होता; आणि त्याच्या शब्दांची धार तुझं हृदय विदीर्ण करीत होती. तो क्रोधानं थरथर कांपत होता आणि तूं दुःखभारानं गदगदून हालत होतीस. तुझं अजून लग्नसुद्धां झालं नव्हतं, कीं लग्नाचीं मंगलाष्टकं तूं अैकलीं नव्हतींस. गौरीहराचं पूजन करून दारच्या पाहुण्याचं शुभचिंतन तूं केलं नव्हतंस कीं बोहल्यावर चढून सप्तपदीचीं पावलं तूं टाकलीं नव्हतींस. मधुचंद्राचं दर्शन अजून तुला घडलं नव्हतं आणि सासूनं भरलेले तांदूळ तूं आपल्या सुकुमार पावलानं सांडले नव्हतेस. अजूनहि ज्याच्या भवितव्याशीं तुझा भविष्यकाल बांधला जायचा त्या भाग्यवान् (?) पुरुषाचं नांव तूं अुखाण्यांत गुंफलं नव्हतंस.

यांतलं कांहींच झालं नव्हतं. यांतलं तूं कांहींच अनुभवलं नव्हतंस आणि तरीहि ... तरीहि काय झालं होतं तें तुला माहीत आहे ! अशी चमकल्यासारखी माझ्याकडे पाहूं नकोस. फक्त दोनच वर्षांपूर्वींची ही गोष्ट आहे. पण

ती घडली आहे. आज तुला त्याचं कांहीं वाटेनासं झालं आहे. जें भूतकाळांत जमा होतं तें तुझ्या लेखी विस्मृतीच्या अेकाच फटकाऱ्यानं शून्यांत विलीन होअून जातं. पण ज्या क्षणीं तुझ्या भावानं तुला बाहेरचा रस्ता दाखवला तेव्हां . . . तेव्हां तू त्याच्या पायाला मिठी घातलीस. दुःखानं तुझ्या अंतः-करणाचा कणन् कण फाटून निघत होता. अेकदां दादाच्या आणि अेकदां वहिनीच्या पायांना विळखा घालून तूं त्यांची सारखी क्षमा मागत होतीस. पण पायाच्या अेकाच ठोकरीसरशीं तुला अुडवून जेव्हां तुझा दादा ओरडला, 'चालती हो अिथून. तुझ्या पापाचा निखारा पदरांत बांधून राहायची माझी अिच्छा नाहीं. हरामखोर ! कुळबुडवी ! माझी बहीण म्हणायची शरम वाटते मला. हलकट ! बेशरम— '

तेव्हां तुझा नाअिलाज झाला. अेका वस्त्रानिशीं तूं घराबाहेर पडलीस. पाय नेतील तिकडे तूं जात होतीस, तूं बेशुद्ध नव्हतीस; पण तरीहि शुद्धीवर नव्हतीस. तुझा विपुल केशसंभार सुटून अस्ताव्यस्त झाला होता आणि मावळत्या किरणांची निस्तेज मरगळी तुझ्या सबंध देहावर पसरली होती.

तूं आणि तुझा देह या जणू दोन वस्तू होत्या. तुझा जीव वैतागून पिसाटा-सारखा कुठेंतरी चालला होता. आणि तुझा भारावलेला, श्रांत झालेला देह तुझ्यामागून फरफटल्यासारखा येत होता.

तो असा किती फरफटत राहिला असता कोण जाणे ! पण मी समोरून येत होतों. शेजारच्या गांवांतलं काम संपवून मी गाडींतून येत होतों. प्रथम मीं तुला ओळखलीच नाहीं. परिस्थिति बदलली म्हणजे माणसाचा चेहराहि किती बदलतो याचं तूं म्हणजे मूर्तिमंत अुदाहरण होतं. मी गाडींतून अुतरलों आणि तुझ्याजवळ आलों. तुझ्याकडे मीं पाहिलं. तुला मीं हांका मारल्या; पण तूं अेखाद्या वेड्यासारखी दिसलीस. तुझ्या चेहऱ्यावर भयानक नैराश्या-ची वेडसर छाया अितकी दाट पसरली होती कीं मी मनांतल्या मनांत आश्चर्यानं आणि भीतीनं चूरमार होऊन गेलों. तुझे खांदे घुसळून मी जेव्हां तुला विचारलं, 'अिकड कुठं चाललीस तूं, सरला ? '

तेव्हां त्याचं अुत्तर तूं शब्दानं मुळींच दिलं नाहींस. तूं हंसलीस . . . अगदीं अेसूर हंसलीस. आणि हंसतांहंसतां रडलीसमुद्धां. माझ्या प्रश्नाला अुत्तर देण्या-

हा धाकटा रडतोय मघापासनं. त्याला जरा दूध पाजतों. चिंगीला आंघोळ घालतो. आजीला मात्रा द्यायची राहिलीय ती देतों. पूजेची तयारी करतों. अजून माझी वेणीसुद्धां झाली नाहीं. आत्याबाओीनं ओकूनखोकून सारी घाण केलीय्, ती निस्तरली पाहिजे, नळ आतां जाओील, त्याचं पाणी भरायचं आहे. धुण्याचा डोंगर बडवायचा आहे. मला काय चार हात आहेत? आम्ही पुरुष आपलें सहन करतों म्हणून आमच्या फारच बोकांडीं बसतंय्.'

त्याचा बाप कणकीच्या गोळ्याला अेक धपाटा देअून म्हणाला, 'तूं फार वर तोंड करून बोलायला लागला आहेस वरं का. तुझ्या तोंडाला कुणी लागावं? तुझं तोंड म्हणजे तोफखाना आहे नुसता. पण पुरुषाचा जन्म आपला किती झालं तरी आपण पुरुष. मुलीचा जन्म असता तर जमीनं चार बोटं वर झाली असती. अरे, तो गोप्या बघ, त्यान दुपटं भिजवलं वाटतं सगळं तो लेंगा जरा वर खोचून धर. आतां बाओीसाहेब कामावरनं घरीं आल्या तर अूनअन भात, वरण, भाजी वाढली पाहिजे.'

तो असं म्हणत आहे तों रस्त्यावरून बुरखा काढून टाकलेल्या दहावीस पुरुषांची अेक टोळी आरडाओरडा करीत बिगुल फुंकीत आली. त्यांच्याभोंवतीं सगळीं बायकापोरें जमलीं. कर्णा तोंडाशीं धरून तो ओरडला, 'असं आश्चर्यानं आमच्याकडे बघूं नका. आमच्यावर हा जुलूम आहे. हा अन्याय आहे. आम्ही पुरुष यापुढं नुसतं चूलमूल नाहीं करणार. आम्हांला शिक्षण पाहिजे. आम्ही गोषा फेकून देणार. आम्ही कुणाचं अैकणार नाहीं. पुरुषांची जात म्हणजे पापाची परंपरा ही खोटी समजूत आहे. आम्हीसुद्धां स्त्रियांच्या खांद्याला खांदा लावून काम करूं. आम्ही कांहीं वेडे म्हणून बोलत नाहीं. आम्ही जागे झालोंत. तुम्हीसुद्धां जागे व्हा. पण आमचं हें म्हणणं पुरुषांनीं अैकायला हवं आहे. बायकांची ही लुडबूड आम्हांला नको आहे.'

आणि त्यांनीं पुन्हां धाडधुम धाडधुम करीत बिगुल नि ताशा वाजवला. शूर स्त्रियांसारखे ते खुशाल लेफ्ट–राअिट करीत चालूं लागले. त्यांनीं आपले केस आंखूड करून घेतले होते. आणि ओढणीची अडगळ भिरकावून दिली होती.

त्यांची ही अशी टोळधाड अचानक आली आणि अचानक निघून गेली.

त्यांचें भाषण माजघरांतल्या खिडक्या-दारांतून पुरुषांनीं अैकलें. ते आपल्या मुलांना दटावीत म्हणाले, डोकीं फिरलींत यांचीं. माथीं भडकलेले लोक आहेत हे. संसार सोडला अन् बायकांसारख्या नोकऱ्या करायला निघालेत. चला आटपा, बायकोची मर्जी संभाळणं ही अेक कला आहे. त्याशिवाय संसार होत नसतो. टॉवेल आहे का मोरींत ? आज आंघोळ व्हायची राहिलीय् त्यांची.'

अितक्यांत मोटारींतून त्या साऱ्यांची पोशिंदी खाडखाड बूट वाजवीत घरांत आली. तिनें कोट आपल्या नवऱ्याच्या हातांत दिला. बूट काढायला मुलापुढे पाय केला आणि कपाळाला आंठ्या घालीत ती म्हणाली, 'पाणी तापलंय का माझं ? जेवण झालं कीं नाहीं ? आज जेवून ताबडतोब मला मेल गाठायची आहे. माझ्या प्रवासाची तयारी करा. तो होल्डॉल आण, पाण्योचा ताब्या आण. फराळाचा डबा भर रे.' ती अिकडे तिकडे धांवपळ करीत साऱ्यांची दाणादाण अुडवून देत होती. हातांतला रुमाल धुण्यासाठीं नवऱ्याच्या अंगावर फेंकून ती बाथरूमकडे गेली.

थोड्या वेळानें नवरा लुगड्याच्या निऱ्या तिच्या हातीं देत म्हणाला, 'अैकलं का, पाणी काढलंय आंघोळीला.'

—आणि मी अेकदम जागी झालें. माझी आअी मला अुठवीत होती आणि म्हणत होती, 'अूठ आतां. बंबांत विस्तव घाल बघूं.'

अेवढ्यांत तिसऱ्या अेका बाअीच्या ध्यानांत आलें. तिनें स्पष्टच विचारलें, ' डोक्यांत गंगावन नाहीं ना घातलेलं ? नाहीं तर हल्लीं पुरुष आपले खुशाल गंगावनं लावतात नि हिंडतात. मूळचे केस सुंदर हवेत. '

' नांव काय तुझं ? भाअूबहिणी किती तुला ? वाचायला शिकला आहेस का चार अक्षरं ? आणि भरतकाम ? आण बघूं अेखादा नमुना. '

त्यानें चार विणलेले नमुने आणले. तो चालत आला तेव्हां अेक बाअी पुटपुटली, ' चालण्याबिलण्यांत कांहीं खोड नाहीं. '

त्या मुलाचा आजोबा आणि वडील जवळच बसले होते. ते अगदीं लाचार चेहरे करून म्हणाले, ' पदरांत घ्यायचं आमच्या मुलाला ! आपण म्हणाल ती करणी; सांगाल तो हुंडा. मुलगा भारी सालस आणि गरीब. खाण्या-पिण्याची कसली खोड नाहीं. आमच्या घरची शिस्तच त्याला आहे. कधीं वर मान करून अुलट बोलायचा नाहीं. आपलं स्थळ—आपली मुलगी लाखांतली, आय. सो. अेस. झालेली, म्हणून आम्ही आपल्या दारीं आलों. '

त्या बायका जरा थोड्या ताठ बसल्या. त्यांनीं अैकल्या न अैकल्यासारखेंच केलें आणि मुलाच्या वडिलांनीं सांगितलें, ' अैकलंस का रे श्रीधर, यांना चहा घेअून ये. बशींत सांडूं नकोस बरं. '

तो अगदीं घाबरून गेला होता. आय. सी. अेस्. बायकोच्या घरीं नांदायला जायचं, हें घरदार सोडायचं म्हणजे काय चेष्टा होती ? ' हें नाहीं आपल्याला जमायचं, ' असें कांहींसें त्याला वाटत होतें. तोंच आजोबा पुन्हां ओरडला, ' सुपारी आण रे, ' आणि त्याबरोबर त्याच्या हातांतलें कपबशाचें ताट धाडकन् खालीं पडलें. लाजेनें तो अर्धमेला झाला.

पण ही सोयरीक जमली. लग्नांत पांच हजार हुंडा, तीन हजार करणी. मुलीची आअी म्हणाली, ' मुलाला दागिने आम्ही घालणार नाहीं. महागाअी कोण ! तुम्ही आपल्या मुलाचं सालंकृत पुत्रदान करा. वधुघोडा तुम्हीं मिरवला पाहिजे. आम्ही वरात काढली तर काढूं. महागाअी कोण झाली आहे ! रेशनचं धान्य तुम्ही जमवा आणि दोन्हीकडचा खर्च तुम्हीं करून हें कार्य अुलगडून टाका. दिवस हे असे. सर्वांनींच समजुतीनं घेतलं पाहिजे ! '

आणि तें लग्न अेकदाचें लागलें. मुलानें मुलीचें अुष्टें खाल्लें. वरातीच्या

वेळीं तो बुरखा घेअून बसला आणि मुलगी बूटसूट घालून समोर उडविलेली दारू अैटींत पाहत होती.

मुलाचें 'श्रीधर' नांव बदलून 'परशुराम' ठेवलें. त्याच्या माहेरचीं माणसं परत जाअूं लागलीं तेव्हां तो खूप रडला. त्याचा बापसुद्धां भारी रडला. आअीनें त्या मानानें धीर धरला होता. मग अेक मुलगा त्याची पाठ-राखण करायला राहिला. सगळीं निघालीं तेव्हां त्यानें नांव घेतलं–'बापाचं वळण, आअीचं शिक्षण, अुमाबाअींच्या जिवावर होअीन अुभय कुलाचं भूषण!'

अिकडे पुरुषांनीं पायजम्याची अुंची गुडघ्याच्या थोडी खालीं आणि घोटयाच्या बरीच वर अशी करून टाकली होती. कुडत्याच्या बाह्या पोलक्यासारख्या करून टाकल्या होत्या. नाहींतर कामें करतांना त्यांना भारी त्रास होअी. स्वयंपाकघराचा चार्ज पुरुषांकडे. घरांत आतां आजीबाअीअैवजीं आजोबा असत आणि आजीबाअी बाहेरच्या खोलीत अंथरूण टाकून सुपारी कातरीत किंवा वर्तमानपत्राच्या आडून आल्यागेल्यावर कोल्ह्यासारखा पहारा करीत बसत.

माझ्या समोरच्या घरांतला तो आजोबा चुलींत लांकडें सरकवीत सरक-वीत ओरडूं लागला, 'अैकलंस कारे बाबा? भांडीं विसळतांना तो तुझा पायजमा जरा वर घेत जा, अगदीं जमिनीला घासून जातो. म्युनिसिपालिटी-चा खराटा का आहे तो? अुद्यां सासरीं गेलास म्हणजे बायको नांदवून घेअील का तुला?'

अितक्यांत दुसरा अेक पुरुष कणीक तिंबतांतिंबतां दुसऱ्या अेका मुलाला म्हणाला, 'कमाल आहे बाबा तुझी. मघाशीं ती शेजारची बाअी येअून गेली तर तूं आपला खुशाल तोंड अुघडं टाकून बसला होतास. ओढणीचा पदर जरा नीट घ्यायला काय झालं? आणि ती कोथिंबीर पाण्यांत नाहीं ठेवलीस? पापड घालायचेत आज. पापडखाराची पूड करून ठेव आणि तें लोणचं कालच भरून ठेवायला हवं होतं. डाळी वाळत घातल्यास का? हीं कामं केलीं नाहींत तर बायकोच्या घरीं गेल्यावर होअील कसं बात्रा तुझं? मुलाचा जन्म म्हणजे पाप आहे बरं!'

तो मुलगा कंटाळला होता. तो म्हणाला, 'होय बाबा, करतो सगळं. पण

बायकांनीं लिहिलं पाहिजे, वाचलं पाहिजे, त्यांना हें पुरुषांनी करूं दिलं नाहीं तर त्यांना अेकदां गोषांत बसविलं पाहिजे. त्यांना स्वयंपाक करायला लावला पाहिजे. त्यांना केर काढायला लावला पाहिजे. त्यांना–त्यांना . . .'

'हो, हो, हो, थांब !' प्रतापसिंह म्हणाला. तोसुद्धां चार अक्षरें शिकला होता. पण त्याच्या पुस्तकांतून हें असलें कांहीं नव्हतें. तो मनांत म्हणाला, 'दगड मारायचं वेड नाहीं खरं; पण हिला हें असलं लिहिण्यावाचण्याचं भलतंच वेड लागलं आहे. अरेरे ! अितक्या सुंदर तरुणीची काय दुर्दशा होअून गेली आहे ही !'

तो कांहींच बोलला नाहीं. त्याला वाटलें सिमेंट आणि चुन्यासारखें वेड पक्कें झालें आहे. हिच्याशीं आपण काय बोलावें ? त्यानें मुलाखत बरखास्त केली आणि तिची हनुवटी वर अुचलून आपल्या ओठांनीं तिच्या ओठांना स्पर्श केला !

त्या क्षणीं आणि तिथून गेल्यानंतरसुद्धां तिच्या स्पर्शसुखांत त्याला परमावधीचें सुख वाटलें. त्या नादांत ती वेडी आहे हेंसुद्धां तो विसरून गेला.

आणि तेव्हांपासून तो तिला वरचेवर भेटायला येअूं लागला. अखेर तिला त्यानें घरीं नेण्याचें ठरविलें. तिलाहि त्याच्याबरोबर जाण्याची अिच्छा होती. दोघे अेकमेकांना वेडे समजत होते आणि घरीं गेल्यावर शहाणं करण्याचे बेत करीत होते !

पण जाण्यापूर्वी तिनें अट घातली. 'मी येअीन पण माझीं ही पुस्तकं घेअून जायला आधीं अेक खटारा घेअून या. मी बुरखा वापरणार नाहीं. फिरायला जाणार आणि अधूनमधून गाणारसुद्धां.'

त्याला बायको हवी होती. हें वेड सोडलें तर ती फार चांगली होती. त्यानें कबूल केलें आणि राजाराणी घरीं यायला निघालीं. विझलीला तिच्या आअीनें कानमंत्र दिला. 'तुझ्या कार्यक्रमांत कांहीं फरक करूं नकोस. आहे हेंच चालूं दे.'

अखेर बिझली नांदायला गेली. कांहीं दिवसांनीं तिला दिवस गेले आणि आअीसारखेंच तिलाहि जुळें झालें. अेक मुलगा, अेक मुलगी. विझलीच्या आअीनें पुन्हां कानगोष्ट सांगितली. वाघिणीचें दूध मुलीला मेंढीचें दूध मुलाला !

हें गुपित बिझलीनें अनेकींना सांगितलें. तिच्या बरोबरच्या बायका तिला आतां वेडी म्हणायला तयार नव्हत्या. त्याहि आपल्या मुलांना असेंच बाळकडू पाजूं लागल्या.

असें होतांहोतां बिझली मरून गेली. तीन चार पिढ्या झाल्या. पण ती गेली तर तिच्या जागीं हजारों, लाखों बिझल्या तयार झाल्या. जिकडेतिकडे स्त्रियांचें राज्य. त्यांनीं झनानी पोशाख टाकला नव्हता. पण बांगड्या-कुंकूला रजा दिली. त्या अंगांत कोट घालीत. नांवाला ओढणीचें लोढणें त्यांनीं शिल्लक ठेवलें.

दुकानांत, रस्त्यांतून सगळ्या बायका. ट्रॅम कंडक्टर स्त्री. बस-ड्रायव्हर स्त्री. मोटारी आणि विमानांची चाकें स्त्रियांच्या हातांत. पुरुष आपले गोषा घेऊन मागें बसूं लागले. त्यांच्या हातांत मुलांचीं गाठोडीं आणि दुपट्यांच्या पिशव्या !

पेढीवर, रेल्वेंत, पोस्टांत, बँकेंत स्त्रिया. पुरुष औषधालासुद्धां दिसेना.

सगळी अुलटापालट झाली होती. गव्हर्नर जनरलच्या जागी नुकतीच अेका विद्वान् अधिकारी स्त्रीची नेमणूक झाली होती. त्या स्त्रीला नुकतींच साठ वर्षें पुरीं झालीं होतीं. तिचा जेव्हां सत्कार–समारंभ झाला तेव्हां अेकसष्ट पुरुषांनीं बुरखा पांघरून तिला पंचारती ओवाळली ! आणि ते सारे पुरुष अगदीं नम्रपणानें पुन्हां पडद्याआड जाअून बसले. समोर अफाट स्त्रीसमाज पसरला होता. आणि आपली मालमत्ता जागच्याजागीं आहे ना, याची त्या पडद्याकडे दृष्टि टाकून खात्री करून घेत होत्या.

अलीकडे पुरुषांचा वरचेवर विनयभंग होअूं लागला होता ! त्या साऱ्यांनीं मोठा अर्ज करून स्त्री अधिकाऱ्यांकडे पाठविला होता.

अेकदां अेका मुलाला बायका पाहावयास यायच्या होत्या. तो बिचारा अगदीं घाबरून गेला होता. त्या साऱ्या आल्या तेव्हां त्यानें साऱ्यांना खालीं वाकून नमस्कार केला. त्या म्हणाल्या, ‘ मुला बैस खालीं. स्वयंपाक येतो का करायला ?’ त्यानें नुसती मान डोलावली. ‘ हो नाहीतर अलीकडे मुलांना स्वयंपाक नकोसा झाला आहे. त्यांना वाटतं, आपल्या बायकोनंच स्वयंपाक करावा. आमच्याकडे नाहीं हो तसं चालायचं. ’

गळ्यानं गाते. हें सारं खरं. पण भाओी, तिचा आवाज भारी गोड आहे तिच्या गळ्यांतून जणूं सारंगी बोलते.'

'सारंगी बोलते ! पण अरेरे ! ती अशी मोठ्यानं गाअून आपल्या वेडाचं प्रदर्शन करते. पण अेरवीं ...'

प्रतापसिंहाचा जीव खालींवर होअूं लागला.

अेरवीं तशी ती फार चांगली आहे. ती कुणाला दगड मारीत नाहीं, कीं शिव्या देत नाही. बोलायला गेलों तर क्वचित् अंगावर धावून येते. पण भाओी, अेरवीं ती फार चांगली आहे तिचा पदर तिच्या माथ्यावरून कधीं ढळायचा नाहीं. पुरुषांशीं ती बोलते खरी, पण परवां अेकानं डोळा वर करून तिच्याकडे पाहिलं तर तिनं पायांतला जोडा काढला ! खरंच प्रतापसिंह, तुमची बायको भारी चांगली आहे. अेकदा भेटून या तिला. पण ... अरेरे ! बिचारी वेडी आहे ! ' असें म्हणून तो निघून गेला होता.

तेव्हांपासून प्रतापसिंहाला तिची ओढ वाटूं लागली. त्याला वाटलें, तिचें सौंदर्य निदान या डोळ्यांनीं बघून तरी यावें.

त्याला पाहतांच बिझलीच्या बापाची भारी गडबड अुडाली. मुलगी ही अशी वेडीखुळी. त्यामुळें जावअी आल्याचें सुखहि त्याला होअीना.

त्यानें जावयाला विचारलें, 'काय, यंदा पीकपाणी काय म्हणतंय ? किती जनावरं आहेत तुमच्याकडे ? घरची सारीं माणसं बरीं आहेत ना ? '

जावअी माना डोलवीत होते. त्यांना सासऱ्याचें बोलणें समजतसुद्धां नव्हतें. बिझलीचा विषय कसा काढावा या विवंचनेंत ते पडले होते. पण सासरा कांहीं तिचें नांवसुद्धां काढीना.

अखेर प्रतापसिंह हिय्या करून म्हणाला, 'म्हटलं प्रकृति कशी आहे ती बघावी बिझलीची, म्हणून मद्दाम तिला भेटायला आलों.'

तेव्हां बिझलीचा बाप जावयाला आंत घेअून गेला. बिझली गाणें गुणगुणत खिडकींतून दूरवर कुठेंतरी पाहत होती. हातांत बोटाची खूण घातलेलें अेक पुस्तक होतेंच.

मुलीचा हा अवतार दाखवण्याची बापाला मोठी शरम वाटत होती. पण

करतो काय बिचारा ? त्यानें बिझलीला हांक मारली, ' अैकलंस बिझली ? हे प्रतापसिह आलेत. '

बिझली अेकदम भारी लाजली. तिनें हातांतलें पुस्तक कोनाडयांत ठेवलें. गुणगुणणें आपोआप बंद पडलें. तिनें आपल्या जिवलगाकड डोळे वर करून बघितलें आणि जिवणीच्या पाकळया न अुलगडतां ती हळूच हंसली.

तिनें असें त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां त्याच्या अंगांतून विजेचा चमचमाट चमकून गेला. ती हंसली. तिनें असें हंसायचें नाहीं. पण तें हंसणें किती गोड होतें ! तिनें माथ्यावरून पदर घ्यायचा. पण तो घेतला नाहीं. म्हणूनच आपली बायको फार देखणी आहे हें त्याला समजून चुकलें. पायापासून डोक्यापर्यंत ती चांदणीच्या रंगानें न्हाअून निघाली होती.

प्रतापसिंहानें तिच्याकडे पाहिलें. तिनें भिवया अुंचावल्या होत्या आणि दाट केसांच्या पापण्यांखालन विस्फारित नेत्रांनीं ती त्याच्याकडे पाहत होती. वेडी असूनसुद्धां ती फार सुंदर दिसत होती.

बिझलीचा बाप कधीच निघून गेला होता. प्रतापसिंह पुढें झाला आणि तिच्या दंडाला स्पर्श करून तो म्हणाला, ' कशी आहे आतां तुझी प्रकृति ?'

' मी कधीं आजारी होतें ? छान आहे माझी तब्येत. तुम्ही बरे आहांत ना ?' आपला हात तसाच त्याच्या हातांत ठेवून तिनें त्याला विचारलें.

प्रतापसिंह मनांत म्हणाला, ' अरेरे ! वेडी खरीच ! न लाजतां ही मलाच विचारते आहे. '

मग तो अुघड म्हणाला, ' तूं बुरखा कां घेत नाहींस ? गाणं कसं म्हणतेस पुरुषांसारखी ? आणि खुशाल अेखाद्या पंडितासारखीं पुस्तकं वाचून ढीग पाडतेस. हें बरं दिसत नाहीं. असं करूं नये आपण. '

ती हंसली. मग म्हणाली, ' मग काय चोवीस तास काय रांधा वाढा अुष्टीं काढाच करूं कीं काय ? या पुस्तकांत किती सुंदरसुंदर गोष्टी आहेत ! तुम्हांला दाखवूं माझीं पुस्तकं ? ' तिनें अेक ट्रंक काढली. ती पुस्तकांनीं खचून गेली होती. अेक पुस्तक काढून ती वाचूं लागली—' यांत लिहिलं आहे कीं, ' स्त्रीपुरुषांचा दर्जा समान झाला पाहिजे. कोणी कोणाचा गुलाम नाही. कलांची वाढ करणें ही स्त्रीपुरुषांच्या सारख्याच हक्काची गोष्ट आहे.

पिअीचना आणि अेकदां शेळीचें दूध प्यालेलें असल्यानें तो मुलगा जो मलूल झाला तो आपला मुकाट्यानें शेळीचें दूध पिअूं लागला.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. मुलगा रडला तरी नाजुकपणें, फार तर मेंढीच्या पिलाअितपत रडे. मुलगी मात्र गजून गुरगुरून सारी आळी दणाणून सोडी !

हा अेक आजारच त्या घरांत होअून बसला. सगळ्या तऱ्हेचे अुपाय झाले पण सगळे फुकट गेले !

अितके अुपाय झाले पण दुधाच्या अदलाबदलीची शंका अेकाच्यासुद्धां सुपीक डोक्यांतून अुद्भवली नाहीं. आअीला हें गुपित माहीत होतें. पण तिनें असा विचार केला, कोणी तरी अेक मूल गुरगुरायचें आणि कोणी तरी अेक निपचित पडून राहावयाचें. मग कोणी का गुरगुरेना ? दुधाची अदलाबदल करून पाहिली आणि दोघेहि मोठमोठ्यानें ओरडत राहिले तरी सांभाळतां-सांभाळतां आपला जीव फेसाटीला यायचा. त्यापेक्षां आहे हें बरें.

आअीसुद्धां चुकून वाघिणीचें दूध प्यायली असावी. त्याशिवाय असा लुच्चा विचार तिला कोठून सुचायला ? बाकी ती बकरीचें दूधहि प्यायली होती यांत शंकाच नाहीं. नाहींतर "आहे हें बरें" असला पडखाअू युक्तिवाद तिला कधींच सुचला नसता.

असें होतांहोतां तीं मुलें मोठीं होअूं लागलीं. मुलगा शाळेंत जाअूं लागला. मुलगी शेणगोळा घेअून अुष्ट्यांना शेण लावूं लागली. पण हा तिचा खरा अवतार नव्हता. मुलगा शांतपणानें वावरे. पण ही ज्याच्या त्याच्या अंगावर खेकसायची. धाकटें भावंड रडूं लागलें तर ही खाड्कन् त्याच्या थोबाडींत मारी. आअीनें भांडें मागितलें कीं ही भांडें तिच्या पुढ्यांत आदळी. केरसुणीनें केर काढूं लागली तरी चार तडाखे भिंतीच्या खांबांना मारायला ती कमी करीत नसे.

तिचे हे वेडेचार बघून साऱ्यांनीं तिला वेडी ठरवली होती. वैद्यभूषण त्रिंबकशास्त्र्यांनीं चार दिवस नाडीपरीक्षा करून आपला निर्णय सांगितला, कीं हिच्या डोक्यांत मुळी मेंदूचा पत्ताच नाहीं. त्या जागीं नुसता अेक खाबड-खुबड दगड बसवलेला आहे !

आतां काय करावें ? नाना अुपाय केले, पण जों जों तिला यांची अुपाधि

होऊं लागली तों तों ती जास्तच चेकाळल्यासारखें करी. अेवढी तेरातेरा चौदाचौदा वर्षांची झाली तरी खुशाल मोठ्यानें हंसे. कोणी रागावलें तर ही त्याला चांगलें तासभर पुरुषासारखें व्याख्यान देअी !

तिचें लग्न तर दुपट्ट्यांत असतांच अेका झबलेवाल्या मुलाबरोबर लागलें होतें. आतां हिनें सासरी जायला हवें होतें. पण सासरची मंडळी म्हणत, 'या वेडीला अन् भुताला कुणी आणावी घरांत ?'

तिच्या भावाचेंहि–नारायणाचें–लहानपणींच लग्न झालें होतें. आणि त्याची बायको आतां नांदायला घरीं आली होती. ती छोटी वहिनी बिचारी गरीब, सालस. काम कर, केलें. जेव म्हटलें, जेवली. मार खा, खाल्ला. ती कशाला नाहीं म्हणत नव्हती. नारायण बिचारा मेंढीचें दूध प्याला होता. त्यामुळें दोघांचें चांगलें जमे. ती अेकमेकांना प्यार करीत आणि कबुतराच्या जोडी-प्रमाणें मोठ्या सुखानें राहात.

पण ही–बिझली हिचें नांव– आतां मोठी होऊं लागली. तारुण्यात येअूं लागली. नवी हुरहूर आणि नवी नवलाअी तिला दिसूं लागली. अेकटेपणाची जाणीव तिला होऊं लागली.

पण तिच्या वेडेपणामुळें तिला कोणी जरासुद्धां शहाणी समजत नव्हतें. ती खुशाल झाडावर चढे. घराबाहेर बुरख्याशिवाय हिंडे. ती कोणाला भीत नसे. खुशाल मोठमोठ्यानें गात बसे. तासन् तास लिहीतवाचीत बसे. या साऱ्या गोष्टी म्हणजे तिच्या वेडेपणाची अुघड अुघड साक्ष होती. तिच्या कोणत्याहि कृत्याला विरोध करण्याचें साऱ्यांनीं सोडून दिलें होतें. तिनें कांहीहि करावें. खुशाल वेड्यासारखें वाचावें लिहावें ! वेडीच ती !

अेक दिवस तिचा नवरा प्रतापसिंह बिझलीची हालत पहाण्यासाठी, कधीं नव्हे तो, या घरीं येत होता. त्याचा मित्र त्याला नुकताच भेटला होता आणि म्हणाला होता, 'तुझी बायको मोठी खुबसुरत दिसते.'

'खरंच म्हणतोस कीं काय तूं ? पण तिचं तें वेड . . . तें वेड जोपर्यंत आहे तोंपर्यंत . . .' प्रतापसिंहानें मोठा अुसासा टाकला.

'वेडी खरीच ! रस्त्यांतून हिंडते. बुरखा घेत नाहीं. खुशाल मोकळ्या

## वाघिणीचें दूध : : ३

तो गांव आणि तो देशच मोठा विचित्र होता. पूर्वी तो मागासलेल्या, जुनाट आणि बुरसटलेल्या चालीरीतींचा होता. तिकडल्या सर्व स्त्रिया बुरखा पांघरून असत. जाळीच्या त्या वीतभर फडक्यांतून त्या दीड वीत दुनिया बघत आणि अफाट जगापासून अगदी दूरदूर असत. सौंदर्यप्रसाधन, चार अक्षरांची ओळख आणि घड्याळाची आंकडेमोड या साऱ्या गोष्टी त्या वेळीं सुधारकी चाळ्यांत जमा होत असत. घराबाहेरचें वारें बुरखा नसतांना स्त्रियांच्या अंगावरून गेलें तर त्यांच्या अंगावर कोड फुटेल आणि अेखादीनें डोळे भरून सृष्टिसौंदर्य आणि मानवनिर्मित करामत बघितली तर ती सात जन्म आंधळी होअून बसेल, अशीं शास्त्रवचनें त्यांचे शास्त्रीपंडित सांगत असत !

त्यामुळें त्या साऱ्या स्त्रिया चुलींत जळत आणि मुलाबाळांची अुसाभर करीत सारा जन्म घालवीत. अेकत्र कुटुंबाची पद्धत असल्यानें चारदोन म्हातारीं माणसें असतच आणि ती असत म्हणजे त्यांचा आजारहि असेच. त्यांची सेवा करा, त्यांच्या मात्रा अुगाळून द्या, त्यांचे काढे अुकळून द्या आणि वर त्यांच्या उपदेशाचे डोस पचवीत पचवीत जन्म काढा, असा हा मोठा कष्टप्रद खाक्या होता !

पण तरी हें सारें त्या सहन करीत. अुपदेश आणि घालूनपाडून बोलणीं हें त्या वेळच्या बायकांचें अेक टॉनिकच होतें. ज्या घरांत याचें प्रमाण जास्त तें घराणें मोठें खानदानी !

माणसाला जसें आपलें बारसें आठवत नाहीं तसें या बायकांना आणि पुरुषांनाहि आपलीं लग्नें केव्हां झालीं हेंहि आठवत नसे. दुपट्ट्यांत गुंडाळलेली वधू आणि पांगुळगाडा ओढणारा कुंचीवाला वर ह्यांना धरून त्यांचीं मातापितरें भराभर लग्नाचे बार अुडवून देत !

आणखी अेक चाल त्यांच्यांत होती. मुलगा आणि मुलगी जन्माला आलीं म्हणजे त्यांना अेक प्रकारचें बाळकडू पाजीत. या बाळकडूचे मोठमोठाले वृक्ष त्या देशांत फार माजून राहिले होते. त्यांचा विस्तार अेवढा अफाट झाला होता कीं आपल्याकडील वडापिंपळाचीं झाडें त्यापुढें अेखाद्या रोपट्यासारखीं दिसूं लागतील. या झाडाची मुळी मुलाला वाघिणीच्या दुधांतून देत आणि मुलीला शेळीच्या दुधांतून.

त्यामुळें तिथले सगळे पुरुष वाघासारखे शूर आणि क्रूर झाले होते आणि तिथल्या सगळ्या स्त्रिया शेळीसारख्या गरीब आणि बावळट होअून बसल्या होत्या. घरांतल्या घरांत पुरुष स्त्रियांशीं सहज बोलूं लागले तरी अगदीं सहजगत्या वाघासारखे गुरगुरून बोलत! थोडें जरी मनाविरुद्ध झालें तरी 'आँव, खाँव' करून अंगावर येत. हें ते मुद्दाम करीत नसत. लाटेंतून फेस वर यावा तसं हें होअी. ज्याच्या अंगीं हें पाणी नाहीं तो मेंढीचें दूध प्याला असें म्हणत. त्यामुळें अेखाद्या बाअीनेंहि आपल्या मुलाला अेक वेळ अुपाशी ठेवलें असतें, पण वाघिणीचें दूध पाजायला ती कधीं विसरली नसती.

हें वाघिणीचें दूध आणून देण्याचें काम अर्थातच मर्द पुरुषांचें होतें. त्यांना त्यात कांहीं विशेष वाटत नसे. त्यांच्या रक्तांत भिनलेल्या वाघिणीच्या दुधाचा वास वाघिणीला बरोबर समजे आणि आपल्या पिलांना दूध द्यावें तशी ती या पुरुषांना, मांजरीसारखी सुस्त पडून खुशाल आपल्या आचळांना हात लावूं देअी!

हे सारे पुरुष दिवसभर वाघासारखें काम करीत आणि रात्रीं बायकापोरांना खुशाल झोडपून काढीत. कधींकधीं ही अुपासना खंडित झाली तर साऱ्यांनाच चुकल्यासारखें होअी. आपण जसें चहा प्यालो नाहीं म्हणजे निरुत्साही होतों, डोकें जड होतें तसें त्या साऱ्यांचें होअी. या अशा जीवनक्रमांत ती बहुतेक प्रजा अेकंदरींत सुखांत नांदत होती.

पण क्रांतीचें मूळ कुठें आणि कसें अंकुरित होअील हें नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ शोधण्याअितकेंच कठीण! अेका बाअीला अेकदां जुळीं मुलें झालीं. अेक मुलगा आणि अेक मुलगी. तिच्या आअीनें चुकून मुलीला वाघिणीच्या दुधांतून घुटी पाजली आणि मुलाला शेळीच्या दुधांतून! पण अकदां जी वाघिणीच्या दुधाची चव त्या मुलीला लागली ती मुळीं शेळीचें दूध

तिनं झारी दिली. पॉवडरचा आणि फराळाचा डबा मधूच्या हातांत दिला. म्हणाली, 'हें सूनबाओीला दे.' मधूला तिनं भांडं दिलं.

मधू बाळाला म्हणाला, 'राजा, आजी–आओीला नमस्कार कर. आओीच्या पायां पड. म्हणावं पुन्हां लवकर येओीन मी.'

बाळानं अैकलं. त्या दोन वर्षाच्या गुटगुटीत छोकऱ्यानं आजीच्या अंगावर अेकदम झेप घेतली. मधूच्या आओीचा आशीर्वाद तोंडांतून फुटेना. गालांवरून अश्रू ओघळत होते. बाळाच्या गालांवरून, त्याच्या दाट जावळावरून आपले म्हातारे हात फिरवीत ती मनांतल्या मनांत म्हणाली, 'औक्षवंत व्हा बरं!'

मधू बाळाला घेअून गेला आणि तिला वाटलं की आज सगळे टाके अुसवले. आतां अिथून पुढं किती दिवस पाहाणार आपण?

तेव्हांपासून मधूची आओी थकत चालली. जीवनाबद्दलची आसक्ति कमी होअूं लागली. चारदोन महिन्यांतच ती आजारी झाली. पण मधूच्या पत्राला तिनं अुत्तर लिहावं, 'माझी प्रकृति चांगली आहे. काळजी करूं नकोस.'

मधू अज्ञानांतच राहिला. त्याची मनीऑर्डर न चुकता येत होती.

पण अिकडे मधूची आओी अंथरुणाला खिळली. तापांत फणफणून राहूं लागली पण मुलाकडे कळवायच नाही हा तिचा निर्धार होता.

शेजारचीं माणसं म्हणत, 'मधूची आओी, मधूला बोलवा. नाहीं तर तुम्ही तरी जा तिकडे.'

पण ती मुळीं आपण आजारी आहोंत असंसुद्धां कबूल करीत नसे. मधूची आओी मोठी करारी होती. अेवढा करार अंगीं असल्याशिवाय का ती स्वाभिमानानं आणि अब्रूनं जगली? ती मोलानं काम करून घेओी आणि अंथरुणावर पडून राही.

पण पुढं मधूची आओी अेक दिवस बेशुद्ध झाली. शेजारच्या दामूकाकांनीं मधूला तार केली.

मधू आला तेव्हां घरघर लागली होती. आओीला पाहतांच, आजाराची हकीकत अैकतांच पश्चात्तापानं तो होरपळून निघाला. तिच्या कृश शरीरावरून हात फिरवीत, तिच्या तोंडाजवळ तोंड नेअून तो हांका मारूं लागला,

'आअी, आअी, मी आलोंय. मी आलोंय ग. मला ओळखलं नाहींस तूं ? मी तुझा मुलगा, तुझा मधू आलाय आअी.'

आअी काय बोलणार ? तिचीं पावलं या धरित्रीवरून सुटत चाललीं होतीं. तिचे डोळे थिजत चालले होते

मधूनं घामाघूम होअून आअीला भराभर चारसहा साष्टांग नमस्कार घातले. 'आअी, मी चुकलों; मी चुकलो. तुला सुख दिलं नाहीं मीं माझ्या-वर रागावलीस तूं ? म्हणून बोलत नाहीस तू ?' मधू ओक्साबोक्शी रडू लागला.

दामूकाकांनीं त्याच्या पाठीवर थोपटलं. म्हणाले, 'मधू, आअी कधी आपल्या मुलावर रागावत असते का रे ?'

आअीचा अंत्यविधि आटपून तो घरी गेला तेव्हां त्याच्या बायकोनं मृदुपणानं विचारलं, 'काय झालं होतं त्यांना ?' सासूबद्दल अेवढा मअू स्वर तिचा आजच अुमटला.

मधूनं कोटाच्या खिशांतून पैशाचं पाकीट काढलं आणि नोटांची भेंडोळी तिच्याकडे भिरकावीत तो म्हणाला, 'दरमहा पाठवलेले तुझे पैसे तिनं परत केले आहेत. तिच्या अुशाला होते. तुझं आणि तुझ्या नवऱ्याचं ऋण घेतल्याशिवाय तिनं शेवटची यात्रा केली. तुझ्या घरांत येण्याचं पाप तिनं केलं नाहीं. जन्मभर ती धर्मशाळेंत राहिली आणि मी असूनसुद्धां अखेर ती आपल्याच मठींत गेली ! झालं तुझं समाधान ?"

आणि आओीचा किंवा स्वत:चा पाणउतारा बायकोकडून होऊं नये म्हणून काळजी घेणंहि त्याला जरूर होतं. त्याला दोन माणसं सांभाळायचीं होतीं. आणि मधल्यामधें त्याचा कोंडमारा होत होता.

सूनबाओी जायला निघाली तेव्हां मधूची आओी म्हणाली, 'हें बघ सूनबाओी, अुद्यांचा पाडवा आहे. तेव्हां मुलाला घेऊन अिथंच जेवायला ये. मधूला मग अिथंच ओवाळ.'

ती मानेनंच 'हो' म्हणाली. मधू आणि मधूची बायको अेकदम बाहेर पडलीं.

दुसऱ्या दिवशीं मधूच्या आओीनं श्रीखंड-पुरीचं जेवण केलं. दहा साडेदहा झाल्यावर मधू बायकोला आणायला निघाला.

मधूच्या आओीनं पाट–रांगोळी केली. नातवाला रंगीत पाट मांडला. बाकीच्या वस्तू काढल्या आणि ती वाट पाहत बसली.

मधू आणायला गेला तेव्हां त्याची बायको तयारच होती. पण ती म्हणाली, 'मुलाला नाहीं न्यायचा. त्याचं आज काय आहे तिथं? अेखादी खरी प्रेमळ आजी असती तर ती स्टेशनवर आली असती. अिथं येऊन पाहून गेली असती नातवाला. पण नुसतं बोलण्याचं कोरडं कौतुक. बारशाच्या दिवशीं आणून आणून आणलं काय, तर अर्धा तोळा सोनं. माहीत आहे तुमच्या आओीचं प्रेम!'

'मग काय तुझ्या माणसांनाच तेवढा प्रेमळपणाचा हक्क दिला आहे आणि माझी आओी अेखादी राक्षशीण आहे असं म्हणायचं आहे तुला?'

'तें मी कशाला म्हणूं? तुमचं तुम्ही पाहा. लग्नाला आतां चार वर्षं झालीं. कायकाय हौशी केल्या तुमच्या आओीनं माझ्या?'

'किती दिवस राहिलीस तूं तिच्याजवळ? तूं कायकाय कर्तव्यं बजावलींस तिच्याबाबत? आणि 'तुमची आओी, तुमची आओी' म्हणतेस ती तुझी कुणी लागत नाहीं वाटतं ती?'

'माझी कुणी असती तर त्यांनीं असा निष्ठुरपणा केला नसता. मला काय दिलंय त्यांनीं? अुलट आमचेच पैसे...'

'चूप! काय निष्ठुरपणा केला म तिनं? तिचा हक्क आहे माझ्यावर.

जास्त बोलूं नकोस. चोराच्या उलटचा म्हणतात त्या ह्या. उशीर होतोय अुगीच. आओी वाट पहात बसली असेल. झटपट त्याला कपडे घाल आणि चल माझ्याबरोबर. बाळासाठीं तिनं रंगीत पाट आणला आहे. आपण गेलों नाही तर तिचा केवढा हिरमोड होओील ! '

' मला नाही त्या लांकडी पाटाची अेवढी अभिलाषा. असले छपन्न पाट आहेत माझ्या घरीं. तुम्हांला वाटत असेल त्याची आशा, पण मला नाहीं त्यांच्या कवडीचीदेखील अिच्छा ! '

' हें तूंच का बोलते आहेस ? दोन्ही बाजूंनीं, अुलटंसुलटं, आपल्याच विरुद्धसुद्धां बोलतां यावं लागतं माणसाला. मी पुन्हां सांगतों–बाळाला कपडे घाल आणि चल लौकर. '

' मी सुद्धां पुन्हां सांगतें कीं मी त्याला बरोबर घेणार नाहीं. त्याचं या वेळीं तिथं कांही अेक काम नाहीं. '

' मग मी पण तुला बजावतों, त्याला घेऊनच मी जाणार, त्याला नेलाच पाहिजे मला '

' हरकत नाहीं. त्याला घेऊन जा. मी येणार नाहीं. '

मधूला अितका संताप आला होता ! पण करणार काय ? तो अेवढंच म्हणाला, ' चुकतेस तूं बरं का. हें बरं नाहीं. तुझी अिच्छाच नसली तर तुझ्यावर मी जुलूम करीत नाहीं. मी बाळाला मात्र घेऊन जाणार. '

मधू मुलाला घेऊन घरीं आला. आओीनं विचारलं, ' आणि सूनबाओी ? '

' ती नाहीं येणार. आओी, ती मूर्ख आहे. ती तुझी कुणी नाहीं. मी आणि हा बाळ, आम्ही दोघं तुझे आहोंत. तूं आम्हांला जेवायला वाढ. आम्हीं जेवतों. आओी, तूं सुद्धां बैस माझ्याबरोबर जेवायला. '

मधूला मोठा हुंदका आला. त्याच्या आईला या वेळीं अश्रू आवरले नाहींत. जेवायच्या ताटावर ते अश्रू सांडले. सगळं यथास्थित असून त्यांच्या मनाला अगदीं अवकळा आली.

तिनं मुलाला आणि नातवाला जेवायला वाढलं. घडला हा प्रकार पाहूनच माअुलीचं पोट भरलं होतं. मधू जायला निघाला तेव्हां नातवाच्या हातांत

घेतला. चांदीची झारी घेतली. सूनेला आवडेल म्हणून चादीचा पॉवडरचा डबा घेतला आणि मुलासाठीं चांदीचं भांडं घेतलं.

घरीं आल्यावर म्हातारी मैत्रीण धापा टाकीत म्हणाली, ' मधूच्या आओी, बरीच खरेदी केलीत ! '

उभ्या जन्मांत अेवढी मोठी खरेदी तिनं प्रथमच केली होती. ती म्हणाली, ' मग आतां काय कमी आहे मला ? मधूला पांचशें रुपये पगार. त्यानं आतां चांदीच्या भांड्यांतनं पाणी नको प्यायला ? मी सांगणार आहें सूनबाओीला कीं त्याला हें रोज ठेवीत जा. '

मधूच्या आओीनं खूप तयारी केली. फराळाचं केलं. साखरेसाठीं हेलपाटे घातले. रॉकेलच्या बारीला अुन्हातान्हांत उभी राहिली. बिचारी दमून गेली.

नर्कचतुर्दशीच्या पहांटेच मधू यायचा होता. नेहमींप्रमाणंच तिची धांदल उडाली. आशानिराशेचे झोके खाल्ले. पण मधूनं उशीर केला नाहीं. पहांटे चारला मधू आला.

आला, पण अेकटाच !

· कमरेवर हात देत तिनं विचारलं, ' आणि सूनबाओी ? तुझा मुलगा ? '

' आलीं आहेत. पण ती गेली घेअून त्याला मैत्रिणीकडे. संध्याकाळीं येईल ती. ' तो खालच्या मानेनंच आंत गेला.

मधूच्या आओीला टाका अुसवल्यासारखं वाटलं. पण तिनं मनाचा तोल सांवरला.

मधूला स्नान घातलं. तिच्या स्नानांत रामच नव्हता, न्हायचं म्हणून न्हायली. मधूला फराळाचं दिलं. मधू म्हणाला, ' आओी, तूं घे ना. '

' मला अजून भूक नाहीं रे लागली. '

' मग मला पण नाहीं लागली. तूं घे त्याशिवाय मी नाहीं खाणार. '

मधूच्या आओीनं फराळाची बशी घेतली. तुकडा मोडून तोंडांत टाकला. मधूनंहि घेतला. ' लाडू फार चांगला झालाय् ' तो म्हणाला.

पण घास तोंडांतच फिरत होते. कुणाच्याहि घशाखालीं अुतरत नव्हते. अेकमेकांना बघून पोटं भरलीं होतीं कीं आपण दोघंच म्हणून भूक आटली होती कोण जाणे ! दोघंहि अेकमेकांकडे बघून केविलवाणी हंसलीं.

मधू म्हणाला, 'आओी, माझं लहानपण आठवतं तुला ?'

'म्हणजे रे काय ? तुला नाहीं आठवण राहणार. पण मी कशी विसरेन रे ?'

'मलासुद्धां थोडं थोडं आठवतंय. शेजारच्या रंगूताओी म्हणायच्या नाहीं का, कीं तुमचा मुलगा अगदीं आओीवेडा आहे.'

'होय, होतास खरा तूं. मीं नुसती हांक मारली तरी आनंदातिशयानं अेकदम हंसायचास आणि धांवत यायचास. तुझा मुलगासुद्धां तसाच आहे का रे ?'

'तें आतां तूंच बघून सांग. पण तो बापवेडा आहे. मी यायच्या वेळेला दारांत बसून राहतो आणि त्याला अुचलून घेतल्याशिवाय मला आंत जाअूं देत नाहीं.'

'तुझ्यासारखाच दिसतो का रे ? बारशाच्या वेळीं बघितला होता. त्यावर कांहीं पाहिला नाहीं.' असं म्हणतां म्हणतांच तिनं मोठा आवंढा गिळला आणि झर्रकन् आंत अुठून गेली.

संध्याकाळीं सूनबाओी येणार होत्या. मधू घरींच होता. तो तिची वाट पहात होता. त्याच्या ग्यालरींत सारख्या खेपा चालल्या होत्या. पण सूनबाओी आल्या त्या अेकटयाच !

'मुलाला नाहीं का ग आणलास ?'

'त्याची फिरायची वेळ आहे ही. म्हणून मैत्रिणीच्या गड्याबरोबर दिला समुद्रावर पाठवून.'

'बरं वरं. तब्बेत बरी आहे ना त्याची ?'

सूनबाओीनं नुसतीच मान हलवली. मधूनं तिच्यावर डोळे वटारले होते.

मधूच्या आओीनं कांहीं झालंच नाहीं असं दाखवून विचारलं, 'काय घेणार तूं ? चहा कीं कॉफी ? फराळाचं आधीं देअूं तुला कीं मग देअूं ?'

'मला भूक नाहीं मुळींच. सकाळीं फराळ झाला आहे माझा.'

तरी मधूच्या आओीनं फराळाची ताटली तिच्यापुढं ठेवलीच. सूनबाओींनीं तुकडा मोडल्यासारखा केला आणि त्या उठून गॅलरींत गेल्या.

मधू बायकोवर गरम झाला होता. तिला चांगली फेरावर घेण्याचा त्याचा विचार होता. पण त्याला बायकोचं वैगुण्य आओीसमोर उघडं करायचं नव्हतं.

पोंचल्याचं पत्र टाक.' मग गाडींतल्या अेका तरुण माणसाकडे पाहून तो म्हणाला, 'आमच्या आओीला सोबत करा बरं का!' गाडी सुटली. चाल झाली. मधूची आओी अुभी राहून डब्यांतून वाकून मुलाकडे पाहूं लागली.

दूर जाणाऱ्या म्हाताऱ्या आओीला जेव्हां हात अुंचावून मधू निरोप देअूं लागला तेव्हां त्याच्या मनांत आलं, माझ्या आओीला कुणी नाहीं या जगांत. जेव्हां मी तिचा होतों तेव्हां मला कांहीं कळत नव्हतं. आतां मला कळनंयं तर मी तिचा राहिलों नाहीं! मधू मोठ्यानं ओरडला, 'आओी, संभाळून जा. पत्र पाठव.'......

आणि आपल्याच आवाजानं तो दचकला. गाडी केव्हांच निघून गेली होती. फलाटावर फक्त अेकदोन हमाल होते. त्यांनींसुद्धां मधूकडे पाहिलं. मधू मग जड पावलांनीं स्टेशनच्याबाहेर जाअूं लागला.

दिवस, महिने, सन, वार– सर्व निर्विकार मनानं येत होते, जात होते. मधूचा मुलगा दोन वर्षांचा झाला. नातवाला खेळवण्याची, सूनबाओीशीं हितगुज करण्याची, मुलाचं वैभव पाहण्याची... मधूच्या आओीच्या सगळ्या अिच्छा तिच्या मनांतच थिजत होत्या. परिस्थितीनं तिला जास्त अपेक्षा न ठेवण्याचंच शिकवलं होतं. पण ज्या स्वप्नाच्या आशेवर तिनं दिवस ओढून काढले होते, तें अखेर स्वप्नच ठरलं. मधूच्या बायकोला सासूजवळ राहण्याची अिच्छा नव्हती. आपल्या नवऱ्यानं आओीच्या भावनांना हळुवार फुंकर घालावी हें तिला आवडत नव्हतं. ती म्हणे, 'तुमच्या आओीनं कष्ट केले, मग माझ्या आओीनं नाहीं का केले? तिला कां नाहीं पाठवायचे दरमहा?'

तो म्हणे, 'तुझ्या आओीला सुखांत ठेवणं हें तुझ्या भावाचं कर्तव्य आहे. शिवाय माझ्या अैपतीप्रमाणं तिलांहि मी मदत करतोंच आहें. आणि माझ्या आओीला तुझ्या भावानं मदत करावी असं मी म्हणालोंय् का कधीं तुम्हांला?'

पण तिला तें कधीं पटलं नाहीं. आपल्या माहेरच्या माणसांसाठीं तिच्या जिवाची घालमेल चाले. कुणी ना कुणी ती सारखी आपल्याकडे आणून ठेवी. मधूला हें आवडत नसे. पण तो फारसा विरोध करीत नसे. अर्थात् त्याचा ओढा आपल्या वृद्ध आओीकडे असेच. पण असून करणार काय?

हें सारं मधूच्या आओीला माहीत होतं. आओी आणि बायको या दोघींच्या

फरफटींत त्याची ओढाताण होत होती हें तिला कळत होतं. त्या नवरा-बायकोचं बिनसूं नये म्हणून मधूची आओी मधूला या विषयाबद्दल अेक चकार शब्द बोलली नाहीं. आतांपर्यंत त्याच्या सुखासाठींच ती झटली होती. आयुष्याचा पुढला टप्पा तर आतां थोडाच राहिला होता. ती विचार करी, मधू आणि त्याची बायको यांची सगळीच वाटचाल अजून व्हायची आहे. मी कांहीं आतां पुढं जायची नाहीं. माझीं पावलं थकलीं. माघारीं वळूं लागलीं. चालच मंदावली. जिथून आलें तिकडे तीं फिरूं लागलीं. त्यांच्या पावलांत आपलीं पावलं कशाला घोटाळूं द्यायचीं ? ती जणूं मागल्या दारीं अुभी राहून पुढल्या दाराची हालचाल पाहत होती.

पण अेखाद्या वेळीं तिच्या मनाची स्थिति दूध अुतूं गेल्यासारखी होओी. मायापाशांतून ती मोकळी होत नव्हती. माझ्या मुलावर माझी अेवढीसुद्धां सत्ता नाहीं कीं काय ? माझ्या मुलाशीं मीं मोकळ्या मनानं बोलायचंसुद्धां नाहीं ? माझ्या सगळ्या कष्टावर, प्रेमावर अगदीं पाणी पडलं ? तें कांहीं नाहीं. मी त्यालाच बोलावीन अिकडे. त्याच्या बायकोलासुद्धां बोलावीन. आणि मुलालासुद्धां. मधूला काय सूनबाओीनं वाढवला काय ? माझ्याआधीं तिनं पाहिला काय ? माझ्याआधी तिनं प्रेम केलं त्याच्यावर ? मला मधू झालाच नसता तर मधूवर हिनं कसा हक्क गाजवला असता ? कानामागून आली आणि तिखट झाली ! तें कांहीं नाहीं. या सर्वांच्यावर माझा हक्क आहे. सगळ्यांना या दिवाळींत अिकडे हक्कानं बोलवीन. या म्हणावं अिथं. चार दिवस राहा आणि जा परत. मी काय त्याचं अैश्वर्य मागतें कीं काय ? तें दे तूं आपल्या बायकोला. मला फक्त तुझी माया– प्रेम पाहिजे मधू. पुत्र-सुखाचा अनुभव या दुर्दैवी आओीनं कधींच घेअूं नये काय ?

मधूच्या आओीन मधूला अगदीं अधिकारानं पत्र लिहिलं कीं, ‘ दीवाळीला बायको मुलाला घेअून ये. ’

मधूचंहि लगेच अुत्तर आलं कीं ‘ नर्कचतुर्दशीच्या दिवशींच येतों. ’

मधूच्या आओीला तरतरी आली. तिनं आपली अेक म्हातारी मैत्रीण बरोबर घेतली आणि बाजारांत गेली. नातवासाठीं तिनं अेक रंगीत पाट

'मग प्रत्येक आओीच आपल्या मुलासाठीं कष्ट करते. यांत ऋण कसलं आलं आहे ? '

'पण माझ्या आओीची गोष्ट निराळी आहे. तिनं दोन्ही कर्तव्यं बजावलीं. बापाच्या आणि आओीच्या दोन्ही नात्यानं तिनं मला वाढवला. तिचे हाल आणि तिच्या मनाच्या व्यथा तुला काय समजणार ! पण माझी ती आओी आहे. तिच्यासाठीं माझा जीव तुटतो. तिला मी माझ्याजवळ आणून ठेवीत नाहीं याचा मला सारखा पश्चात्ताप होत असतो. '

'मग ठेवा ना अिथं आणून. '

'मी पुष्कळ ठेवीन. पण तुझं आणि तिचं पटणार नाहीं हें मला माहीत आहे. ती चार दिवसांसाठीं आली तर तुझा आंतल्या आंत जळफळाट होतो आहे. मग कायमची आली तर.....'

'मी माहेरीं जाअून राहीन ! तुम्ही राहा आपल्या आओीला घेअून. '

'फार शहाणी आहेस तूं. मी सांगतों तसं झालं पाहिजे. पन्नासाच्यावर खर्च होतां कामा नये. ' असं म्हणून मधू तिथून निघून गेला.

त्याच्या आर्जानं हें सारं अैकलं होतं. आपल्या राहण्याची शोभा काय आहे हें तिला कळून चुकलं.

मधूच्या बायकोला दिवस गेले होते. तिचं डोहाळजेवण आपण करावं आणि परत जावं असा तिचा विचार होता. सूनबाओीच्या दृष्टीनं याला किंमत नव्हती. पण ती मधूकडे पाहून सारं करायला धांवत होती. तिनं विचारलं, ' सूनबाओी, महिना कितवा सातवा का ? '

'हं. '

'मग अुद्यां तुझं डोहाळजेवण करीन आणि परवां जाओीन म्हणतें. '

'मला असल्या या रानटी चाली आवडत नाहींत ! खा खा खायचं आणि अजीर्ण करून बसायचं. '

मधूची आओी जास्त बोलली नाहीं. त्यांनीं नुसती तिची ओटी भरली, खण दिला आणि संध्याकाळीं मधूला म्हणाल्या, ' मधू, अुद्यां जाओीन म्हणतें मुंबईला. तिकीट काढून आण. सुटे नसले तर हे घे पैसे तिकिटाला. '

मधूच्या पोटांत ऊन ऊन वाफा आल्या. पैसे परत करीत तो म्हणाला,

'असं काय करतेस आओी परक्यासारखं? पैसे काय देतेस मला? आणि आल्यासारखी चार दिवस रहा. मग जा परत. थोडं अिकडे तिकडे जाअून येअूं. या बाजूचा प्रदेश तूं बघितला नाहींस तो बघ आणि मग जा. वाटलं तर आपण सगळींच बडोद्याला जाअून येअूं.'

'सगळींच' म्हणतांच सूनबाओी तिथं बसल्या होत्या त्या फणकाऱ्यानं अुठून गेल्या.

मधूची आओी सहज दाखवल्यासारखं करून म्हणाली, 'नको मधू. शिवण बरंच राहिलं आहे. आतां माहीत झालं घर. केव्हाहि येओीन. चार दिवस राहीन. तेव्हां जाऊं बडोद्याला. पण आत्तां मात्र नको. तिकडे बायका माझी वाट बघत असतील.'

आओीची समजूत पाहून मधूचा जीव आंतल्या आंत गोठल्यासारखा झाला. पण त्याला दोन्हीकडची ओढ होती. बायकोशीं त्याला जन्म काढायचा होता आणि तिच्या स्वभावाला मुरड घालणं आपल्या सामर्थ्यापलीकडचं आहे हें त्याला समजून चुकलं होतं. बायकोसमोर आओीचा आणि आओीसमोर बायकोचा पाणउतारा होअूं नये ही त्याच्या सुजन मनाची अिच्छा होती. पण कांहीं झालं तरी बायकोचं समाधान करणं त्याला अधिक जरूर होतं. आपली आओी किती शहाणी आणि सहनशील आहे याचा त्याला पुन्हां अेकदां अनुभव आला. आपल्या आओीचं आयुष्य फुकट गेलेलं पाहून तो कष्टी झाला. आपल्या आओीचं शहाणपण पाहायला, तिचं कौतुक करायला अितके दिवस कुणी नव्हतंच आणि मोठं झाल्यावर आपण पाहतोंय तर तसं म्हणायची चोरी झाली. मिळून आओीचा वनवास कांहीं संपत नाहीं.

मधूच्या आओीला त्या घरांत अगदीं अुबल्यासारखं झालं. परक्यासारखं वाटूं लागलं. पण मधूनं जेव्हां तिला गाडींत बसवून दिलं तेव्हां आपण फार दूर कुठं कधीं गेलों नाहीं अितक्या दूर जात असल्याची जाणीव तिला झाली. गाडीची शिटी होओीपर्यंत दोघंहि कांहींच बोललीं नाहींत. मधू आओीजवळ बसून राहिला होता. गाडी सुटायच्या वेळेला मधूनं घाओीघाओीनं तिच्या हातांत नोटा कोंबल्या आणि तिच्या हातांतल्या झिजलेल्या पाटल्यांवरून हात फिरवीत तो म्हणाला, 'आओी, संभाळून जा बरं. बॉम्बेसेंट्रलला अुतर आणि

भडोचला जाअीपर्यंत तुझे पाय रगडीत असें. म्हणून वाटलं कीं आजसुद्धां थोडा हात फिरवावा. काम होत नाहीं तुला. दमून जात असशील तूं.'

मधूची आअी कांहींच बोलली नाहीं. डोळ्यांत पुन्हां अश्रूंनीं गर्दी केली; पण मनाला वाटलं कीं आपला मुलगा कांहीं आपल्याला विसरला नाहीं.

दोनतीन दिवसांनीं मधू जायला निघाला. आअीनं दिलेला फराळाचा डबा त्यानं हातांत घेतला आणि नमस्कार करतां करतां शंभराची नोट त्यानं आअीच्या हातांत दिली. आअीनं बजावलं, 'संभाळून जा रे. सूनबाअीच्या तब्बेतीचं कळव. जपून राहा.'

मधू गेला. मधूच्या आअीला पुन्हां धर्मशाळेंत पडल्यासारखं वाटलं. मग त्यांच्या ध्यानांत आलं कीं मधूनं आपल्याला भडोचला बोलावलं नाहीं. मागल्या वेळीं तो आपल्याला आग्रह करीत होता. पहिल्या पत्रांतून सुद्धां त्यानं तसं लिहिलं होतं. पण मग त्यानं तो विषयच काढला नाहीं. कां कोण जाणे! मधूच्या आअीला कुठं तरी खटकलं. अंत:करणांत नुसती पोकळी भरल्यासारखी वाटली. कांहीं करूं नये आणि नुसतं पडून राहावं असं वाटूं लागलं.

पण यंत्र तिची वाट पाहत होतं. त्याला आणि तिला फक्त अेकच काम होतं. शिवायचं! नुसतं कापड शिवायचं आणि गप्प बसून राहायचं.

मधूचीं पत्रं येत होतीं. खुशाली कळत होती. मधूच्या आअीला मधेंच भडोचला जाऊन यावंसं वाटे. पण तो 'ये' म्हणून पत्रांतून लिहीना. महिन्या-काठीं पैसे मात्र तो न चुकतां पाठवी. 'म्हातारपणीं तूं आतां काम करूं नयेस.' असं पत्रांतून कळवी. ती म्हणे, 'मग हा मला ये म्हणून कां लिहीत नाहीं? अिथं काय माझं गाठोडं पुरून ठेवलं आहे?'

अेक दिवस तिनं विचार केला कीं, मुलाकडे जायला आअीला बोलावणं कशाला हवं आहे? आपल्या हक्काचं घर आहे. जावं, राहावं, परत यावं.

आणि खरोखरच ती अेक दिवस भडोचला गेली. स्टेशनवर मधू आला होता. पण घरीं आल्यावर पाहाते तों सूनबाअींच्या कपाळाला आंठ्या! तिच्या बहिणी आल्या होत्या. अेक भाऊ आला होता. त्या सर्वांनींच असं दाखवलं कीं ही अुगीचच आली. मधूच्या आअीला पुन्हां अेकदां परक्यासारखं

वाटलं. ती कांहींच बोलली नाहीं. तिनं सूनबाओीला विचारलं, 'बरी आहेस ना? ठीक चाललंय ना?'

सूनबाओी नुसतंच 'हूं' म्हणाल्या.

'बंगला सरकारी आहे वाटतं?'

'सरकार कुठला देतोय? आम्हीच भाडं भरतोंय पासष्ट रुपये!' त्या 'आम्ही' वर जोर होता.

सासूबाओींना अंदाज आला. त्या बंगला पाहण्याच्या निमित्तानं हिंडून आल्या तेव्हां सूनबाओी बहिणीला सांगत होत्या, 'तुम्हीं आलांत चार दिवस तर ही धिडका आली लगेच पाठोपाठ! आतां जरा मोकळेपणा नाहीं कीं चार पैसे खर्च करायची सोय नाहीं. शिवाय या शिवणकाम करणाऱ्या बाओीला सासूबाओी म्हणायचं म्हणजे मला लाज वाटते! पण ह्यांना भारी आपल्या आओीचा अभिमान आहे. आतां बाहेरून आले कीं दिसतील तुला मायलेकरांच्या गोष्टी.'

मधूच्या आओीनं ट्रंकेंतलं लुगडं काढलं. त्या आंघोळीला गेल्या. मन भारी अस्वस्थ झालं. लगेचच्या गाडीनं निघून जावं असंसुद्धां वाटलं. पण पुन्हां त्यांनीं विवेक केला कीं तिला कांहींहि शोभेल तरी मला हा नाचरेपणा बरा दिसायचा नाहीं.

तो दिवस तसाच गेला. सूनबाओींच्या भावंडांना कांहीं कापडचोपड आणायचं होतं. मधू बायकोला सांगत होता, 'पन्नास रुपयांपर्यंत तुझ्या भावंडांचं कापड घे. कारण आओी आली आहे. तिला मला थोडेतरी पैसे दिले पाहिजेत.'

'त्यांना आणखी पैसे काय करायचे आहेत? दर महिन्याच्या महिन्याला तर कर भरतांच आहां. आतां आणखी ही बिदागी कशाबद्दल?'

'हें बघ, आओीला पैसे द्यायला काय सणवार, मुहूर्त बघावा लागतो? तिनं हाडाचीं काडं करून मला वाढवला. तिच्या स्वार्थत्यागावर आपण ही मौज करतों आहोंत. तिनं या वयांत कष्ट करावेत हें मला बरं नाहीं वाटत. तिचं ऋण माझ्या हातून फिटेल असं वाटतंय तुला?'

मुळ्याची कोशिंबीर, टोमॅटोचा रस्सा आणि मुगाच्या डाळीची खिचडी— तिच्या मधूला फार आवडत हे पदार्थ ! मुळा घेतांना ती पुटपुटली, 'सून-बाअीला मुळा आवडतो कीं नाहीं कोण जाणे !'

पिशवी घेअून ती घरीं आली. वाटेंत कोण आयाबाया भेटल्या त्यांना सांगितलं, 'आज मधू येणार आहे !' घरीं आल्यावर खोकल्याची अुबळ दाबीत, पाठीचं पोक ताठ करीत येणाऱ्या शेजारच्या आजीबाअीपुढं तिनं मधूचं कार्ड टाकलं. तिनं अुलटं पालटं केलं आणि ज्योतिषासारखं विचारलं, 'काय म्हणतोय मधू ? कधीं येणार ह्किडं ?' तिला वाचतां येत नव्हतं तरी तिला माहीत होतं कीं मधूशिवाय आअीला दुसऱ्या कुणाचं पत्र येणार? मग मधूच्या आअीनं आजीबाअीला सांगितलं. आजीनं मग आणखी कुणाला सांगितलं. मग सगळ्या चाळींत समजलं कीं, 'आज मधू येणार ! त्याची बायको येणार !'

आठ वाजतां मधू यायचा, पण सात वाजतांच ती स्वयंपाक झांकून ठेवून गॅलरींत येअून अुभी राहिली. 'काय मेलं घड्याळ ! म्हातारं झालंय माझ्यासारखच. चालतं तेव्हां चालतं अन् नाहीं तेव्हां आळसावून जांभया देतं.' मधूच्या आअीनं आंतबाहेर खेपा घातल्या. मध्येंच अेकदां दामोधर-काकांना विचारून आल्या, 'काय हो, भडोचची गाडी मुंबअीला कधीं येते ? आजीबाअींच्या घड्याळांत डोकावून पाहिलं. पण तिच्या घड्याळापेक्षां आजीबाअींचं घड्याळ पांच मिनिटं मागंच होतं आणि तरीसुद्धां तें हळूंच चालत होतं.

होतांहोतां आठ वाजले. साडेआठचा ठोका पडला. पाअुणे नअ...नअू... जिनं तिनं विचारावं, 'आला का मधू ?'

मधूच्या आअीला बारा वाजल्यासारखं वाटलं. तिनं जेवण तसंच झांकून ठेवलं आणि भिंतीजवळची वळकटी अुलगडून ती तशीच पडून राहिली. मधू आला नाहीं म्हणून तिची फार निराशा झाली. ती निराशा मग अश्रुरूपानं पाझरूं लागली. मधू आपल्याला दुरावला हेंच खरं. आपण, आपलं शिवण आणि आपलं हें अेकलकोंडं जीवन—तिच्या मनांत असे विचार येअूं लागले

तोंच दाराची कडी वाजली. कुणीतरी मोठ्यानं हांक मारली, 'आओी ! मी आलोंय ग ! दार अुघड.'

मधूची आओी धडपडून अुठली. आपल्या डोळ्यांत अश्रू होते हें सुद्धां ती विसरली. दार अुघडीत ती म्हणाली, 'आलास का मधू ? आणि सूनबाओी कुठं आहे ?'

मधून आओीला नमस्कार केला. म्हणाला, 'तिची तब्बेत जरा बरी नव्हती म्हणून ती म्हणाली आज मी नाहीं येत. पुढल्या वेळीं मी येओीन.' पण हें सांगतांना मधूचा आवाज जरा नरम होता. तिनं विचारलं, 'काय होतंय ? तापबीप ? अेकटीच राहिली का तिथं ?'

'छे छे ! तशी बरी आहे ती. अुगीच थंडीचं पडसंबिडसं' असं म्हणत त्यानं तो विषयच टाळला. बॅग अुघडून त्यानं आओीला सुरतेचीं दोन पातळं दिलीं. बर्फीचा अेक पुडा दिला आणि म्हणाला, 'बघ बरं. आवडतील का हीं पातळं तुला ?'

मधूची आओी म्हणाली, 'छान आहेत. लहान मुलासारखा मलाच खाअू आणलास. पण पाय धू आधीं. जेवायला चल. भाताच्या अगदीं गारगोट्या झाल्या असतील.'

त्याच्या गप्पा बराच वेळ चालू होत्या. तरी मधूची अस्वस्थता तिला जाणवत होती. मग तीच म्हणाली, 'नीज आतां. प्रवासाचा त्रास झाला असेल.'

गप्पा मारतां मारतां रात्रींचे अकरा वाजले होते. मधूला काय वाटलं कोण जाणे ! त्याच्या आओीच्या मनांत तरी काय घोळत होतं कुणास ठाअूक ! जाग्रण नको म्हणून दोघं न बोलतां निजून राहिलीं. पण झोप कुणालाच येत नव्हती. मधू अुठला आणि आओीच्या जवळ बसून तिच्या पावलांवरून हात फिरवीत म्हणाला, 'आओी, पाय रगडून देतों तुझे आणि मग निजतों.'

मधूच्या आओीचा म्हातारा होअू लागलेला घसा अेकदम कशानंसा दाटून आला—त्या अेकदम अुठून बसल्या. म्हणाल्या, 'छे रे ! मला काय झालंय ? दमला असशील तूं. मीच तुला अुद्यां तेल लावून न्हाअू घालणार आहें.'

'मला कशाला तेल लावायचं ! मी काय लहान राहिलों आहें अजून !

मधूची आओी मी खरोखरीच 'मी आओी आहें, मी मधूची आओी आहें' हा मंत्र अहोरात्र घोकीत राहिली.

मधूची आओी चार अक्षरओोळखीपलीकडे शिकलेली नव्हती. प्रथम कांहीं दिवस तिला तिच्या विधवा आओीनं आपल्या घरीं नेलं होतं. पण भरींत भर आणि जन्मभर लाचारी हें मधूच्या आओीला आवडण्यासारखं नव्हतं. तिनं विचार केला कीं लग्न झालं म्हणजे आओीबापाच्या घरावर आपला हक्क नाहीं. जिथं हक्क असायचा तिथला मालक अुठून गेला. आपण धर्मशाळेचे धनी बनलों. पण मधू घर बांधील तेव्हां घर म्हणायचं. तोंपर्यंत . . .

मधूची आओी शिवण शिकली. कपडे शिदून देअूं लागली. तिचा मधू मग शाळेंत जाअूं लागला. त्याच्यासाठीं तिनं दूध घ्यावं, आपण न पितां त्याला द्यावं. स्वतः फाटकीं लुगडीं नेसावींत, पण मधूला चांगले कपडे करावेत, आपल्या आजाराला ती पातीचहा घेओी, पण मधूचं पडसं–खोकलासुद्धां तिचा जीव अर्धा करून टाकी. मधू म्हणजे तिचं सर्वस्व होतं. मधूला घेअून ती कशी-बशी आडोशाला राहत होती. तो मोठा झाला म्हणजे मग ती घरांत राह-णार होती. मधूला शिकवायचा, त्याला मोठा करायचा, त्याचं लग्न करायचं आणि सूनबाईचं कौतुक करीत नातवंडं खेळवायचीं हें त्या दुःखी जीवाचं अेक रम्य स्वप्न होतं. या स्वप्नासाठीं ती रात्रंदिवस कपडे शिवायची. मधू मोठा झाला म्हणजे ती त्याच्याशीं खूप बोलणार होती. आपला मोठेपणा टाकून ती त्याच्याशीं बरोबरीनं वागणार होती. सध्यांच्या स्थितीबद्दल ती समाधान मानून घ्यायला शिकली होती. विचार करतांकरतां, कपड्याला टाके घालतां घालतांच तिला कितीदां तरी वाटे कीं जीवन हीच मुळीं अेक अुसवाअुसव आहे ! आपण टाके घालीत राहायचं. अुसवलं कीं पुन्हां टाका घालायचा. फाटलं कीं ठिगळ जोडायचं. कपडा अेकदांच फाडला आणि अंगाला अगदीं फिट्ट बसला असं फार थोड्यांचं होतं. नाहीं तर लहान झाला, मोठा झाला, अपुरा झाला, बेडौल झाला, त्याला दोरा घाला, त्याला पट्टी जोडा आणि कांहींतरी करून अंगांत घाला. परिस्थितीनं तिची मनोवृत्ति तत्त्वज्ञान निर्माण करण्याची झाली होती. माणसाला जें हवंसं वाटतं तें मिळत नाहीं. नको असतं तें घ्यावंच लागतं. तें नको असलेलंच अंगाला अितकं चिकटतं कीं तें घ्यावंच

लागतं. हवं असलेलं आपल्या अंगालाच येत नाहीं. त्या हव्या असलेल्याचीं मापं तरी चुकतील, शिवण तरी अुलटी बसेल किंवा तें वेडंवाकडंच बेतलं जाअील. मधूची आअी भराभर टाके घाली. मधूच्या आशेवर ती अुसवलेली शिवण शिवत होती.

या साऱ्या आठवणी तिच्या डोळ्यांपुढून सरकल्या. तिनं मधूचं पत्र पुन्हां अेकदां वाचलं. आज रात्रीं तो बायकोसह खरोखरीच येणार होता. तिचं मन पुन्हां अुत्तेजित झालं. तिचा मुलगा चांगला निघाला होता. तो खूप शिकला, त्याला मोठी पांचशें रुपयांची नोकरीसुद्धां लागली आणि त्यानं अेका सुस्वरूप मुलीशीं लग्नसुद्धां केलं !

मधूची आअी पुन्हां आठवणींत गुंतली. सूनबाअी घरांत आल्या तेव्हां आपल्या धर्मशाळेचं घर झालं असं तिला वाटलं. पण कां कोण जाणे ! मधू थोडा दूर गेल्यासारखा वाटला. अेकाअेकीं तिला गंगाधरपंतांची आठवण झाली आणि खरोखरीच दुःखाची धार अंतःकरण कापीत गेली.

लग्नानंतर आठपंधरा दिवस मधू आणि सूनबाअी तिच्याजवळ होतीं. तिचा ओढा आपल्या माहेराकडे असायचाच ! पुढं मग मधू आपल्या बायकोला घेअून नोकरीच्या गांवीं निघाला. तो आअीला म्हणत होता, 'चल आअी, तूंसुद्धां चल तिकडे. अिथें आतां काय आहे तुझं ? '

तो चांगला दोनचार वेळां असं म्हणाला, पण तो जेव्हां असं म्हणे तेव्हां सूनबाअी कावऱ्याबावऱ्या होत, हें मधूच्या आअीनं पाहिलं होतं. तिनं मधूला अुत्तर दिलं होतं कीं, 'तूं म्हणतोस तें खरं. पण माझा पसारा बराच आहे. थोडं अिथलं लागी लागलं म्हणजे मी येअीन. '

मधू जरी नाराज होत होता तरी सूनबाअींचा जीव भांड्यांत पडत होता हें मधूच्या चतुर आअीनं ओळखलं होतं. जाण्याची अिच्छा असून तिनं मन आवरलं होतं. संयम हाच तिच्या आयुष्याचा गाभा होता. त्या मानानं हा प्रसंग कांहींच नव्हता. पण तिला असं मात्र जाणवलं कीं कुठला तरी टाका आज उसवला. तिचं मन खट्टू झालं.

मधूच्या आअीनं पुन्हां अेकदां पत्रावरून नजर टाकली. आणि अुशीर होत असलेला पाहून बाजारांत जाअून तिनं लगबगीनं भाजी आणली.

सामानाचा डोंगर आणला असेल तिनं. मित्रहो, माझ्या संसाराचं समाधान तुम्हांला सांगून झालेलं आहे. जातों मी. बाय बाय.'

साखरदांडे झटक्यानं निघून गेला.

साखरदांडेचं व्याख्यान आणि त्याच्या सुखी संसाराचं वर्णन अैकून परुळे-कर–घारपुरेना आश्चर्यानं झीट यायची वेळ आली होती. परुळेकरांनीं जोशांना विचारलं, 'खरंच? अेवढा सुखी आहे हा प्राणी? त्याची बायको अेकदां बघितली पाहिजे.'

जोशी अेक सुस्कारा टाकून उद्गारले, 'छे! अविवाहित आहे साखरदांडे!'

# मधूची आअी : : २

शिवण्याचं यंत्र पुढं ठेवून मधूची आअी कपडे शिवीत होती. दुपारचे तीन वाजायला आले होते. पोष्टमन यायची वेळ झाली होती. मधू आअीला नियमित पत्र टाकीत असे. त्यामुळं आज त्याचं पत्र येअील असा तिचा अंदाज होता. शिवणाकडे तिचं लक्षच नव्हतं. पोष्टमन येअून गेला म्हणजे मग ती चहा करून पिणार होती. तिचा अपेक्षाभंग झाला नाहीं. पोष्टमननं दारांतून अेक कार्ड भिरकावलं आणि मधूच्या आअीनं तें लगबगीनं अुचललं. तिचा मधू आज रात्रीं येणार होता! मधूची आणि त्याच्या बायकोची आठवण होतांच त्या आपल्याशींच हंसल्या आणि स्वतःशींच पुटपुटल्या, 'परवांपरवां मधू अगदीं लहान होता आणि आतां अेकदम मोठा झाला. अेवढा मोठा कीं त्याला बायकोसुद्धां आली!'

मधूच्या आअीनं शिवण्याचं यंत्र कोपऱ्यांत ठेवून दिलं. स्टोव्ह पेटवला, चहा केला आणि तोंडाला बशी लावतांलावतां तिला पंचवीस वर्षांपूर्वीची आठवण झाली—

मधूचा जन्म झाल्यापासून तिला सारीं 'मधूची आअी' म्हणूनच ओळखीत. गंगाधरपंतांची पत्नी सावित्रीबाअी असं फारच थोड्यांना माहीत होतं. कारण मधूचा जन्म होण्यापूर्वींच दोनतीन महिने गंगाधरपंत सर्पदंशानं गेले. कल्पना नसतांना मधूच्या आअीवर हा आघात झाला आणि मग पुढं मधूचा जन्म झाला. तेव्हां तिचं वय फार तर सतराअठरा वर्षांचं असेल. मधूमुळं तिला सगळीं 'मधूची आअी' असंच म्हणत. तें नांव अैकून अैकून तिच्याहि मनांत अेक दिवस आलं कीं, 'बाअी ग, तुझं पत्नीचं आयुष्य संपलं. तूं आअी झालीस. याच भूमिकेचीं कर्तव्यं तुला बजावलीं पाहिजेत. तूं तरुण आहेस. हें तुला विसरलं पाहिजे आणि आअी आहेस हें ध्यानांत ठेवलं पाहिजेस.'

आम्हीं अेकदम वाचतों. विनोदी पुस्तक असलं तर ज्योत्स्ना अितकी हंसते कीं अखेर ती जमिनीवर लोळण घेते. शिवाय आम्ही केरम खेळतों, पत्ते खेळतों, बॅडमिंटनसुद्धां खेळतों. गाण्याचा तिला थोडासा नाद आहे. आवाज थोडा घोगरा आहे. पण आमच्या शाअी अुडालेल्या तबल्यावर मी ठेका धरतों आणि भाता फुटलेल्या पेटीचा सूर धरून ती सिनेमांतलीं गाणीं म्हणते. तुम्हांला खोटें वाटेल पण कधीं कधीं ती मला नाचूनसुद्धां दाखवते. येत कांहींच नाहीं. पण आपले उगीच थोडे हातवारे. थोडा वेळ गंमत येते.

'परवांच मी तिला नव्या बांगडया केल्या आहेत. तिच्या सावळया, गोजिऱ्या रूपाला त्या छान दिसतात. निदान मला तरी तसं वाटतं. मला वाटतं सौंदर्यशोधनाची माणसाला दृष्टि असावी लागते. ती सुंदर आहे असं कांहीं नाहीं. पण मी तिच्यांतच सौंदर्य शोधून काढतों. मोहकपणा हेंच तिच्या सौंदर्याचं वैशिष्टय आहे. तिच्या निरोगी, सतेज आणि हंसऱ्या चेहऱ्याकडे मी कित्येकदां अर्धाअर्धा तास पहात बसतों. मग काय होतं कुणास ठाअूक! माझ्यापासून तिला मग दूर बसवत नाहीं. दिवसांतून किती वेळां ती 'अिश्श' म्हणत असेल कोण जाणे! ती 'अिश्श' म्हणाली कीं मी तिला 'ओ' देतों. अेकदां तर दिवसांतून ती पन्नास वेळां म्हणाली, तितके वेळां मी काय केलं असेल असं वाटतंय तुम्हांला? त्या पन्नास अिश्शना मी पन्नास चुंबनं घेअून अुत्तरं दिलीं.

तुमच्या पद्धतीनं दोषच काढायचा तर तो अेकच आहे. तिच्या प्रत्येक गोष्टीवर तिला माझा अभिप्राय हवा असतो. मी चांगलं म्हटलं, तिचे दोन्ही दंड धरून तिला अेकदां गदगदां हलवली कीं ती आनंदानं वेडी होते. त्यामुळें तिचा अेखादा पदार्थ मला जरी आवडला नसला तरी मी म्हणतों 'वा! फार छान झाला आहे. माझ्या आअीचासुद्धां असा होत नव्हता.' 'खरंच?' अेवढंच ती म्हणते आणि दोन पळया अधिक माझ्या पानांत घालते. माझी कुचंबणा होत असली तर अिथेंच. खारट पदार्थाला मी 'चांगला' म्हणतों आणि तिच्या मोहब्बतीखातर मला तो खावा लागतो. पण तिच्या गोड भावना आणि मोहक चेहऱ्याकडे पहात मी तो खारट पदार्थ हंसऱ्या मुखानं खातों.

आणखी अेक बारिकसा दोष सांगतों. तिला मधून मधून माहेरीं जायची

हुक्की येते. मला मात्र तें पसंत नसतं. ती घरांत नसली तर मला मुळींच चैन पडत नाहीं. मग अेखाद्या वेळीं तिच्या माहेरीं ती सहकुटुंब जाते. म्हणजे मला घेऊन जाते.

मला अकच मुलगा आहे. आणि तो सुद्धां नुसता गोटया आहे. त्याच्यावर अधिक प्रेम कुणाचं याच्यावरच आमचं भांडण होतं. तो कुणासारखा दिसतो यावरच आम्ही वाद करतों. पण मिस्टर, तुमच्या आणि आमच्या भांडणाची तऱ्हा फार वेगळी आहे. तुम्ही म्हणालां असतांत, 'मुलगा माझ्यासारखा दिसतो. माझंच त्याच्यावर प्रेम आहे.' पण आमचं याच्या उलट आहे. मी म्हणतों, 'राजा तुझ्यासारखा दिसतो.' ती म्हणते, 'छे! तो बापाच्या वळणावर गेला आहे' आम्ही कां म्हणतों माहीत आहे? आम्हांला दोघांनाहि स्वत:च्या रूपापेक्षां अेकमेकांचं रूप अधिक आवडतं. मी म्हणतों, 'राजावर माझ्यापेक्षां तुझं प्रेम जास्त आहे.' तिला तें पटत नाहीं. याचा खरा अर्थ आम्ही अेकमेकांवर फार प्रेम करतों.

'आपल्या मैत्रिणींजवळ ती माझ्याबद्दल किती अभिमानानं बोलत असते! अहो, अशा बायकोबद्दल नवऱ्याला तरी अभिमान वाटल्याशिवाय कसा राहील?

'माझं तारुण्य माझ्या बायकोनं मुळींच वायां घालवलेलं नाहीं. माझ्या सहवासांत ती मशगुल असते. सगळया जगाचा तिला आणि मला विसर पडतो. तुम्हांला आणखी किती गोष्टी सांगाव्यात? तिच्या विणकामाच्या कुशलतेनं माझ्या घराला रम्यता आली आहे. भांडणं, रडारड, धुसपूस, उसासे यांतलं आम्हांला कांहीं माहीत नाहीं. आम्ही अितके सुखी आहोंत कीं जन्मोजन्मीं हीच बायको मिळावी अशी माझी परमेश्वराला प्रार्थना आहे.

'आणखी थोडं राहिलं. ती जरा ठेंगणी आहे. ठेंगणी आहे म्हणजे उंच नाहीं. आमच्या फळीवरचे डबे तिला मलाच काढून द्यावे लागतात. रात्रींच्या वेळीं किंवा जेवायच्या वेळेला मी घरीं यायला उशीर केला तर तें तिला मुळींच खपत नाहीं. शाळकरी पोरासारखें ती मला कान धरून अुठाबशा काढायला लावते. भिंतीकडे तोंड करून उभा करते. अरे हो, किती वाजले?' साखरदांडे लगबगीनं उठत म्हणाला, 'आज संध्याकाळीं सात वाजतां ती परत यायची आहे. मला स्टेशनवर गेलं पाहिजे. गोटया, सामान, आणि ती.

बघायची असते. पण संसाराकडे या निरोगी दृष्टिकोनानं, विनोदबुद्धीनं आपण पहातच नाहीं. आपली दृष्टि सदा कारुण्याचीच.

' रागावूं नका. पण मला खरी अनुकंपा घारपुऱ्यांबद्दलच वाटते. त्यांनीं दुःखांतून मार्ग काढला आहे असं म्हणण्यापेक्षां त्यांना मार्गच उरला नाहीं असं म्हणणं अधिक बरोबर आहे. तरीसुद्धां त्यांनीं निर्णय घेतला आहे. पण त्यांचा विवाह हा खरोखरच उलटलेला जुगार आहे त्यांची या कुचंबणेंतून कधीं काळी सुटका होईल असं मला वाटत नाहीं. पण जगांत ट्रॅजेडी फार आहे म्हणूनच माणसानं संसाराकडे निरनिराळ्या दृष्टिकोनानं बघायला शिकलं पाहिजे. रडायच्या वेळीं सारींच रडतात. पण त्यावेळीं सुद्धां हंसून गोड करणाऱ्या माणसाच्या सामर्थ्याची कसोटी लागत असते. आनंद झाल्यावर माणूस हंसेल यांत नवल कसलं? पण दुर्दैवालाच अुपहासानं हंसणाराच्या ओठांत विषाचा प्याला पचविण्याचं सामर्थ्य असतं. आनंदानं नाचणाराच्या बेहोशींत अुन्माद असतो. पण दुःखांतसुद्धां अुत्साह दाखविणाराच्या हास्यांतच जगांतल्या समविषमतेवर काव्य रचलेलं असतं. आपल्या जीवनांत हें काव्य असावं असं नाहीं तुम्हांला वाटत? रडायचं. सारखं रडायचं! मग हंसायचं कुणी? या संसारांत हंसायचं तरी कुणी? तुम्हांला नाहीं हंसावंसं वाटत?

' वांझोटी रडते आणि सातपुत्रीहि अश्रूच ढाळते. विवाहिताला आपल्या लग्नाचा पश्चात्ताप होतो, आणि अविवाहिताला लग्न न झाल्याचं दुःख होत असतं. लग्न करून माणसं सुखी होत नाहींत आणि न करूनहि दुःख संपत नाहीं. मग हें दुःख संपणार आहे तरी कधीं? सुख केवळ मानण्यावर असतं असलं रूक्ष, पंडिती थाटाचं विधान मला करायचं नाहीं. विहिरींत असावं लागतं तेव्हांच पोहऱ्यांत अुतरतं हें मला माहीत आहे. पण पोहरा करणं तरी आपल्याच हातीं आहे ना? जोशी-परुळेकरांना आपल्या बायकांत सुधारणा झाली तर त्यांना त्या हव्या आहेत. म्हणजे यांच्या वांट्याला कोरड्या विहिरी आलेल्या नाहींत. घारपुऱ्यांचं दान मात्र उलटं पडलं आहे. संसाराच्या वाळवंटांतच त्यांच्या नशिबानं त्यांना ढकलून दिलं आहे. या वाळवंटांत आपल्या सौख्याची नदी दुथडी भरून वाहील आणि तिच्या कांठीं आनंदाचा मोहोर फुलेल असली आशा त्यांना करायला लावणें यासारखी निर्दय थट्टा

नाहीं दुसरी ! पण तरी ते हंसत आहेत. खोटं खोटं हंसत आहेत; आणि म्हणूनच माझ्यासारख्या बेछूट वृत्तीच्या माणसाच्या डोळ्यांतहि अश्रु जमा होत आहेत.

'माफ करा हं ! नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां मी फार मोठं व्याख्यान दिलं तुम्हांला. पण तें कसंहि असो. तुम्हां तिघांबद्दल मला फार सहानुभूति वाटते. पण तुम्हांला सांगायला मला आनंद वाटतो कीं मी अेक अत्यंत सुखी प्राणी आहें. माझी बायको मीच पसंत केलेली आहे किंवा थोडं फार मी लव्ह मॅरेज केलं आहे असंच म्हणाना ! तिचं नांव मी ज्योत्स्ना ठेवलं आहे. माझी बायको म्हणजे माझ्या संसारांत पडलेलं सुखाचं चांदणं आहे. तिच्या रूपाबद्दल, कामसूपणाबद्दल किंवा तिच्या बुद्धिमत्तेबद्दल माझी कसलीहि तक्रार नाहीं. मला शेळपट वृत्तीच्या, मेणचट मनाच्या स्त्रिया मुळींच आवडत नाहींत. 'जहांबाज' हा शब्द तुम्हांला कदाचित् कडू लागेल. पण फाड-फाड बोलणाऱ्या, तडफेनं वागणाऱ्या आणि आपल्या व्यक्तिमत्वाची जाणीव देणाऱ्या स्त्रियाच मला आवडतात. सुदैवानं माझी बायकोसुद्धां तशीच आहे. म्हणजे ती भांडखोर आहे असं तुम्ही समजूं नका. पण वाद घाल-ण्यांत, शब्दानं अेकमेकांना अडविण्यांत आम्हांला अेक प्रकारची मौज वाटते. त्याचं मोठ्ठं कारण, सर्वसाधारण स्त्रियांत जो चिडकेपणाचा दुर्गुण असतो तो तिच्याजवळ मुळींच नाहीं. ती कधींच चिडत नाहीं. आणि मी तिच्याशीं अगदीं बरोबरीच्या नात्यानं वागतों. ती माझ्याशीं समरस झाली आहे याचा मला अनेकदां प्रत्यय येतो. पण तिनं आपलं व्यक्तिमत्व अबाधित ठेवलं आहे. माझीं सगळीं कामं तीच करते. पण थोडंसं जरी बरं नसलं तरी आपले पाय ती माझ्याकडून रगडून घेते. मधूनच ती सुद्धां हट्ट करते. पण तो हट्ट किती लडिवाळ असतो ! माझ्यावर ती संपूर्ण अधिकार गाजवते. पण माझ्या डोक्यावर ती चढून बसली असं मात्र मला कधीं वाटत नाहीं. तिच्या स्वयंपाकांत मी तिला मदत करतों. त्या वेळीं मी बाहेरच्या खोलींत वाचत बसावं हें तिला मुळींच आवडत नाहीं. आम्ही जेवायला अेक-दम बसतों. अजूनसुद्धां आम्ही अेकमेकांना घास देतों. रोज आम्ही फिरायला जातों. सिनेमा नाटकं आम्ही अेकमेकांशिवाय पहात नाहीं. कितीतरी पुस्तकं

पाहून तुमच्या मनःस्थितीची कोणालाहि कल्पना करतां यायची नाहीं. काय गंमत आहे ! माणसाला आयुष्यभर केवढं नाटक करावं लागतं !'

पुन्हां थोडा वेळ अगदींच शांत होतं. शांततेचा भंग करीत साखरदांडे म्हणाले,' किती अुदास वाटतं आहे नाहीं ? अेखाद्या माणसानं तुमच्या हकीकती अैकल्या तर लग्नसंस्थेबद्दल तो कायमची हाय खाईल. तुम्हां तिघांवरून सर्व जोडप्यांचा अंदाज कोणी घेतला तर कडवट निराशेनं ो शहारून निघेल. लग्न हें सुखासाठीं नसतं, माणसानं आपल्यावर ओढवून घेतलेली ही आपत्ति आहे असं त्याला वाटेल. '

' पण मला वाटतं घारपुरे सोडले तर प्रथमदर्शनी तुमच्या संसाराचा जेवढा विचका झालेला दिसतो तेवढा खरोखरी मला दिसत नाहीं. तुम्हां दोघांच्या तक्रारी सर्वस्वीं रास्त असतील असं मला वाटत नाहीं. तुमच्या बायकांनाहि कांहीं बाजू असेलच ना ? परुळेकरच्या बायकोनं त्याचं पाणी जोखलं आहे आणि जोशाच्या बायकोची अलिप्तवृत्ति जन्मभर अशीच राहील असं वाटणं म्हणजे मानसशास्त्राबद्दलचं मोठं अज्ञान आहे मला वाटतं तुम्हां दोघांना अितकं निराश होण्याचं कारण नाहीं. प्रत्यक्ष संकटापेक्षांहि संकटाच्या कल्पनेनंच तुम्ही घाबरून गेलेले आहांत. परुळेकरांनीं बायकोला माहेरीं पाठविण्याअैवजीं महिना दोन महिने आपणच कुठेंतरी निघून जायला हवं होतं आणि जोशानं आपल्याहि बायकोपेक्षां अलिप्तपणानं वागायला हवं होतं. तिच्याजवळ जाअून तिच्या भावना जागृत होणार नाहींत. तिनं पुनर्विवाह केला याचा अर्थ तिला सांसारिक सुखाची अभिलाषा निश्चित आहे. पण मनावरचे संस्कार तिला दूर सारतां येत नाहींत. पण सुखनिधान समोर असतांना हे संस्कार जन्मभर असेच टिकतील असं वाटतंय तुला ? माणसाला जसं सतत आनंदी रहायला मिळत नाहीं तसाच तो कायमचा दुःखीसुद्धां कधींच नसतो. जीवनाकडे पहाण्याची तुमची वृत्ति कुरकुऱ्या पाटलाची आहे. आपण अपेक्षासुद्धां किती ठेवाव्यात ह्याला तुमच्याजवळ तारतम्य दिसत नाहीं. जगांतल्या प्रत्येक सुखी जोडप्यानं आपले अनुभव सांगण्याचं ठरवलं तर तो सुद्धां असं सांगेल कीं ' अेक काळ आमचा थोडा आणीबाणीचा गेला. आमच्या वैवाहिक जीवनावरहि कांहीं काळ अभ्रं आलीं. आम्हांलासुद्धां रस्ता

दिसत नव्हता. आतां आम्ही जन्मभर असमाधानीच राहणार असं आम्हांला वाटूं लागलं. पण आपली अेकच अेक परिस्थिति कायम टिकत नसते, तिच्यांतहि बदल होत जातात हें सत्य ज्यानं जाणलं तोच खरा शहाणा होय. बहुतेक संकटांवर अुपाय असतात. आणि ते थंड डोक्यानं केले कीं माणसं त्यांतून निभावून जातात. आतां आम्ही सुखी आहोंत.

'पण तुम्ही हें विसरलां आहांत. बहुतेकजण हीच चूक करतात. आयुष्यांत संकटं नाहींत, माणसाच्या उभ्या आयुष्यांत अेकदां सुद्धां त्याची मति गुंग होत नाहीं, अेकदां सुद्धां त्याचं डोकं सुन्न होत नाहीं, अेकदां सुद्धां त्याच्या चित्तवृत्ति सैरभैर होअून जात नाहींत, असल्या अळणी, मिळमिळीत आयुष्याचा तुम्हांला कंटाळा वाटणार नाहीं? आपल्यावर आफत आली तर तिला चारीमुंडे चीत करून आपण त्यांतून सहीसलामत बाहेर पडावं असला धाडशी आनंद अुपभोगण्याची खुमखुमी तुम्हांला कां वाटत नाहीं? सुखाच्या कल्पनेनं जर आपण हुरळून जातों तर संकटाच्या कल्पनेनं आपल्या निरोगी मनाची नसन् नस खडबडून जागी कां होअूं नये? आमचीं मनं अेवढीं लेचींपेचीं कां असावींत कीं दुःखाच्या चाहुलीनं आम्ही लगेच माना टाकाव्यात? बहुतेक गोष्टींवर अुपाय असतो ही साधी गोष्ट आपण कशी बरं विसरून जातों? घरांत औषधं असावींत पण प्रसंगांत गांगरून जाअून त्यांची आपल्याला आठवणसुद्धां होऊं नये याला काय म्हणावं? दर वेळीं दुसरा माणूस आपल्यावर मात करतो याची तुम्हांला चीड कशी येत नाहीं? माफ करा हं! मी तुम्हांला व्याख्यान अैकवत नाहीं पण जोशी-परुळेकरांच्या दुखण्यावरचे अिलाज मला सुचले आहेत म्हणून मी विचारतों, बायकोला अलिप्त रहातां येतं मग जोश्यांनाच कां येऊं नये? तिचीं आर्जवं करणं हा त्यावरचा अुपाय नव्हे आणि परुळेकरांच्या बायकोला जर फिट आणतां येते तर परुळेकरांनाहि त्याच वेळीं तिच्याच शेजारीं धाडकन् अंग टाकून फेफरं कां आणतां येत नाहीं? याचं कारण अेकच, तुम्ही आपल्या बायकांना मार्गावर आणण्याचे प्रयत्न केलेले दिसत नाहींत. माणसांचे स्वभाव कसे असतात, तीं नाटकं कशीं करतात, त्यांच्या खोड्या कशा असतात, त्यांच्या संवयी काय असतात, माणसांचीं मनं किती विविध तऱ्हा दाखवितात त्यांचीसुद्धां हौशी मनानं मौज

असती तर तिनं किती चांगुलपणा दाखवला असता असा मात्र तिनं कधीं विचार केला नाहीं. पण आज १८ वर्षं मी तिच्याशीं शांत डोक्यानं संसार करीत आलों आणि अजून करतों आहें. पण यांत माझ्या जीवाची कुचंबणा, मला करावं लागलेलं दिव्य.. त्या यातना माझ्या मीच जाणें! स्त्रियांची कुचंबणा होते असं सारेजण म्हणतात. पण माझ्याबाबत तरी मी असं निःशंकपणानं म्हणूं शकतों कीं गेलीं १८ वर्षं मी नुसती कुचंबणा सहन करतों आहें. माझ्या चार मुलांची ती आई झाली आहे. पण अितक्या वर्षांत मला अेकदांसुद्धां असं वाटलं नाहीं कीं हिच्याजवळ आपण बोलत बसावं. छे! ती निराळीच आहे. पैसा अडका, मुलं बाळं आणि आपल्या माहेरच्या माणसांचा गोतावळा जमा करून बसण्यांत ती स्वतःला धन्य समजते आहे. 'माझा नवरा माझ्यावर प्रेम करीत नाहीं, माझी हेळसांड करतो, माझ्याकडे त्याच लक्षच नाहीं' असं आणखी लोकांना सांगत असते. अेका दृष्टीनं तिचं नुकसान झालं हें खरं आहे. पण त्याला मी जबाबदार नाहीं. माझ्याकडून मी तिला दुखवली नाहीं. आपल्याला न आवडणाऱ्या माणसाशीं जन्मभर बांधून, कोंडून घ्यायचं ही केवढी जबरदस्त शिक्षा आहे याची तिला कल्पना नाहीं म्हणून ती असं म्हणते.

'मी घरांत लक्ष देत नाहीं. काय लक्ष द्यायचं घरांत? मी घरांत पहात नाहीं म्हणूनच घरांत थोडीशी शांतता आहे. मी फक्त तिला पैसे देतों. बाकी सगळे व्यवहार तिच्या मनाप्रमाणें चालतात. कित्येकदां खानावळींत जेवतों. दूध फळावर रहातों. उरलेल्या वेळांत मी माझी वकिली संभाळतों. मी व्यसनांत सांपडलों नाहीं ही माझ्यावर प्रभूची आणि तिच्यावर माझी केवढी कृपा आहे! तिनं थोडंसं तरी समाधान कां मानून घेऊं नये? मी अेका अक्षरानं तिला विरोध करीत नाहीं. परवां तिनं सोन्याच्या पाटल्या विकल्या त्या पैशांचं तिनं काय केलं तें मला ठाऊक नाहीं. दोन महिन्यांपूर्वी चारशें रुपयांचं कापड घेऊन आली आणि तें बिल मला भरावं लागलं. अशानं माझ्या पैशालासुद्धां ओहोटी लागेल हा साधा विचार तिला अजून कळत नाहीं. घरांत तर अेक क्षणभरसुद्धां मला बसावंसं वाटत नाहीं. घरांत माणसांचा नुसता पांजरपोळ अुघडलेला आहे. त्यांचा कलकलाट, हिचा कच-

कचाट आणि तें स्नेहशून्य वातावरण यानं मी कसा आंबून जातों. हें नकोच म्हणून झोपेशिवायचा सगळा वेळ मी बाहेर काढतों. लग्न झाल्यापासून मी घराला पारखा झालों आहें. गेलीं अठरा वर्षं मी जणुं कांहीं अेखाद्या खाना-वळींत रहातों आहें. समाधानी आणि आनंदशोधक वृत्तीमुळें मी सदा माझं मन माझ्या व्यवसायांत आणि मित्रमंडळींत गुंतवून ठेवतों. माझ्या खऱ्या मनापासून मी जसा कांहीं दूर रहात असतों. वैवाहिक जीवनाचं अपयश पहाण्याचं धारिष्टच मला होत नाहीं. पण कामानं दमून जेव्हां मी रात्रीं अंथरुणावर पडतों तेव्हां माझ्या जिवाची नुसती तगमग होत असते डोळ्यां-तून अश्रु ओघळूं लागतात. कुणासाठीं मी धडपडलों ? कुणासाठीं मी पैसा मिळवला ? कुणासाठीं मी जगलों ? या प्रश्नांची अुत्तरें मला देतां येत नाहींत. अवघड जागीचं दुखणं म्हणून कोणाजवळ बोलतांहि येत नाही. मी अेक कुटुंबवत्सल माणूस आहें. पण कौटुंबिक सुखाचा मला काडीमात्र अनुभव नाहीं. असं वाटतं कीं लग्न करून आणि चारपांच मुलांचा बाप होअूनहि मी अखेर अेकटाच राहिलों. पत्नीप्रेमाचा लेशहि नाहीं म्हणूनच कीं काय माझ्या मुलांचा ळळा असा मला लागलाच नाही. तिच्यापासून दूर रहाण्या-च्या खटपटीमुळें मी अिच्छा नसतांना माझ्या मुलांपासूनहि दूरच राहिलों. अेकटेपणाचं दुःख मोठं बोचक असतं नाहीं ? पण हा नुसताच अेकटेपणा नाहीं. मला नको असलेल्या अेका मूर्ख स्त्रीशीं संसार करण्याची आपत्ति माझ्यावर ओढवली. या जबरदस्तीचा ताप अधिकच असह्य आहे. ज्या स्त्रीबद्दल आपल्या मनांत आस्था नाहीं, काडीमात्र आदर नाहीं तिच्याशीं जन्मभर प्रेमाचं नाटक करीत संसार करणं ही माझ्यावर विनाकारण जबर-दस्ती नाहीं असं तुम्ही म्हणूं शकाल ?'

घारपुऱ्यांना आणखी बोलावंसं वाटत होतं. पण कां कोण जाणें ! ते अेकदम थांबले. विशेष गंभीर न होणारे साखरदांडेहि सुस्कारा सोडून स्वस्थ बसले.

कुणालाच बोलण्याची अिच्छा होईना. पण थोडा वेळ गेल्यानंतर जोशी म्हणाले, ' अेकूण असं आहे तर ! तुमच्या चेहऱ्यावरचा प्रसन्न समाधानी भाव

'त्यावेळच्या माझ्या मनःस्थितीचं वर्णन मी कसं करूं? माझ्यासारख्या शिकलेल्या, रसिक, आनंदी, सुस्वरूप माणसाला अेका कुरूप आणि निरक्षर स्त्रीशीं संसार करण्याचा प्रसंग यावा यासारखा दैवदुर्विलास तरी कोणता असेल? मी अमृत पिणार होतों पण माझ्यापुढें काडेचिराअिताचा काढा आला. आयुष्यभर हंसावं, खेळावं असं वाटण्याच्या वयांत माझ्यावर कपाळावर हात मारून घेण्याची पाळी आली. तुम्ही मला दुबळा म्हणा हवं तर, पण माझ्यापेक्षां यांत वडिलांचाच दोष अधिक होता. माझा कांहीं अेक अपराध नसतांना माझ्यावर ही जन्माची सक्ती आली होती. या मुलीशीं काय बोलावं, कसं वागावं, हिच्यावर प्रेम तरी कसं करावं असं मला वाटे. प्रथम कांहीं दिवस डोकं शांत ठेवण्याचा मी प्रयत्न केला. पण मला असं समजलं कीं तिच्या बापानं आठ हजार रुपये हुंडा दिला म्हणून माझ्या वडिलांनीं माझ्या गळयांत ही घोरपड बांधून माझा गळा कापला. हें ज्या दिवशीं मला समजलं त्या दिवशीं संतापानं मी अक्षरशः वेडा झालों. आणि यापुढें बाबांचा आणि बायकोचा संबंध नको. म्हणून मी अेक दिवस घर सोडून पळून गेलों.'

'पळून गेलांत?' परुळेकर.

'हो. पळून गेलों. मी दाढी वाढवली. जटा वाढवल्या. अेका बैराग्याच्या मठांत जाअून राहिलों आणि माझ्या परिस्थितीपासून शक्य तेवढा दूर जाण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. मला माझ्या घराशींच काय पण जगाशींसुद्धां संबंध ठेवण्याची अिच्छा उरली नाहीं. मला माझी, बायकोची, बाबांची साऱ्यांची शरम वाटत होती. तिचा नवरा म्हणवून घेण्यांत मला मरणप्राय दुःख होत होतं. तिच्याशीं अेक अक्षर बोलण्याचीसुद्धां मला शिसारी येत होती. कुरूप आणि अडाणी मुलीशीं संसार करणं म्हणजे जन्मभर केवढी भयंकर शिक्षा असते याची तुम्हांला कल्पना येणार नाहीं. अशा विद्रूप मुलीचा पाश माझ्या गळयाशीं आवळून बाबांनीं माझ्या आयुष्याचा खेळखंडोबा करून टाकला होता. विचार करून करून माझ्या डोक्याच्या अक्षरशः चिंधडया अुडाल्या. मी पळून गेल्यामुळें आमच्या घरांत अेकच हाहाःकार अुडाला होता. माझा तपास त्यांनीं बरेच दिवस केला आणि अखेर अेक दिवस मी त्यांना सांपडलों. माझं मन वळवण्याचा खूप प्रयत्न झाला. अखेर बाबांनीं

आपल्याच थोबाडींत मारून घेतल्या. सासऱ्यांनीं माझ्यापुढें नाकदुऱ्या काढल्या. आणि आओ बिचारी आपल्या स्वभावाप्रमाणें माझ्याच पाया पडूं लागली.

' कॉलेजचा अभ्यास तसाच अर्धवट राहिला होता. चरितार्थाची सोय तर नव्हतीच. मग असं बैराग्यासारखं राहून मी काय मिळवणार होतों ? तेव्हां मी मग घरीं आलों.

' अेखाद्या दुःखावर काळ हीच मोठी औषधी आहे. दुःखाची तीव्रता काळानं कमी होते. माणसाला विचार सुचूं लागतात. त्यांतूनच मार्ग निघतो. माझं तसंच झालं. मी विचार केला कीं त्या मुलीला रूप नाहीं हा तिचा दोष आहे काय ? ती अशिक्षित आहे त्यालाहि केवळ तीच जबाबदार आहे काय ? माझ्याशीं लग्न लावण्याचा तिनं का हट्ट घतला ? तिच्याहि अंगीं चार चांगले गुण असतील. मोठ्या माणसांनीं केलेल्या गुन्ह्याचं खापर आपण तिच्या डोक्यावर काय म्हणून फोडावं ? तिच्याशीं बोलूं लागलों. तिला शिकविण्याचा प्रयत्न करूं लागलों. आपला अजागळ पोशाख सोडावा म्हणून खटपट करूं लागलों.

' पण खरं सांगूं ? माझा जीव त्या मुलीवर लागेचना. प्रेम असं बळजबरीनं अुत्पन्न होत नसतं हेंच खरं आहे. मी अितका प्रयत्न केला पण चार बाराखड्यां-पलीकडे तिची प्रगति झाली नाहीं. त्यामुळें तिच्या त्या निर्बुद्ध मनाची आणि कुरूप देहाची मला शिसारी आली. मी आनंद शोधायचा प्रयत्न करीत होतों. तिला शहाणी करण्याची धडपड करीत होतों. पण ती जातिवंत मूर्ख होती. तिच्या माझ्यांतला फरक तिला कधीं समजलाच नाहीं. माझी कुचंबणा तिनं कधीं उघड्या डोळ्यांनीं पाहिलीच नाहीं. चोवीस तास मी तिच्याभोंवतीं पिंगा घालावा असं तिला वाटे. तिनं माझ्या मनासारख्या, मला आवडतील अशा चार गोष्टी केल्या असत्या तर मी तिचा विचार अधिक केला असता. तिला थोडी जरी देवानं बुद्धि दिली असती तरी मी तिच्या कुरुपतेकडे डोळे-झांक केली असती. तिच्या बुद्धीवर तरी मी निश्चित प्रेम केलं असतं. कारण माझा तसा प्रयत्न होता. तिच्याशीं संसार करणं हें मी माझ्यावर लादलेलं का होओीना, पण अेक कर्तव्य समजत होतों. तेंहि अेकाच हेतूनं. तिचं नुकसान आपण करूं नये. मीच तिच्या जागीं असतों तर ? पण तीच माझ्या जागीं

कीं या मूर्ख, हावऱ्या, डाकिणीवर मी भाळलों तरी कसा ? तिचा तो कचकचाट, तिच्या त्या फिट्स, तिचा तो सदा असमाधानी, रागीट, चवताळलेला चेहरा आणि चिरचिरा आवाज यांना मी गोड स्वभाव आणि सौंदर्य-गुण समजत होतों तेव्हां माझ्या गाढवपणाबद्दल माझी जेवढी पाठ थोपटावी तेवढी थोडीच आहे. खरंच, मी तिच्यांत काय पाहिलं आणि अितके दिवस मी कशावर प्रेम करीत होतों हेंच मला आतां कळत नाहीं. मला वाटतं आपण आपल्या कल्पनेवर प्रेम करीत असतों. आपल्या भावनेवर आपला जीव असतो. (ती संभाळली जाते तोंपर्यंत आपल्याला तें माणूस हवं असतं. पण आपल्या भावनेला धक्का बसला कीं तें माणूस डोळ्यासमोरसुद्धां नको होतं.) अेकटचा जीवनाचा जोशीबुवांना वीट आला आहे. मला जानवं तोडून हिमालयांत जावंसं वाटतं. अेकटं रहाण्यासाठीं माझा जीव तळमळतो आहे. दोन्ही मुलांना घेअून ती माहेरीं गेल्यापासून मी फार सुखी आहें. ती लौकर तर परत येणार नाहीं ना अशी शंका येअूनच मी अस्वस्थ होतों. छे ! मला ती नको आहे. तिच्यापासून दूर पळून जावं असं मला वाटतं. तिचं तें फेंफरं नाक, तो फाजील चरबी वाढलेला वाटोळा देह, तिचा तो खोटा नटवेपणा आणि तिच्या मनाची ती असंस्कृत रानटी बैठक..छे छे ! माझ्या जागीं दुसरा असता तर तो अेव्हांना केस पिकून माळ ओढीत बसला असता. विवाह हा जुगार आहे हेंच खरं. प्रेमविवाहाच्या माझ्या रम्य कल्पनेला माझ्या बायकोनंच काडी ओढून लावली आहे. माझं दुःख तुम्हांला सांगून समजायचं नाहीं. विलायतेंत असतों तर मी केव्हांच घटस्फोट घेतला असता. जोशी पुष्कळ नशिबवान आहे. त्याच्या जागीं मी असतों तर ?'

'पण मला वाटतंय् कीं तुझीच भूमिका माझ्यापेक्षां सोपी आणि सरळ आहे. फाडफाड बोलून अेखाद्या गोष्टीचा फडशा तरी पाडतां येईल. पण मला तोंड दाबून बुक्क्यांचा मार झाला आहे.' जोशी म्हणाला.

जोशी परुळेकरांपेक्षां घारपुरे वयानं थोडे मोठे होते. संसाराचा अनुभव त्यांना अधिक होता. आतां आपली पाळी हें ओळखून त्यांनी अेक लांबलचक सुस्कारा सोडला आणि म्हणाले, 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.' तुम्हां दोघांपेक्षां माझी हकीकत फार निराळी आहे. माझं लग्न माझ्या वयाच्या

१९ व्या वर्षीं आमच्या तीर्थरूपांनीं देवदेवक ठेवून केलं. मी तेव्हां नुकताच कॉलेजांत जाऊं लागलों होतों. मुलगी काळी कीं गोरी हें सुद्धां मी पाहिलं नव्हतं. माझ्या लग्नाला आता अठरा वर्षं झालीं. तो काळ आणि त्यांतल्या त्यांत आमचं घर फार जुनं होतं. मला स्वतःला आपल्या पायावर उभं राहयला लागल्याशिवाय लग्न करायचं नव्हतं. पण माझे वडील जमदग्नी-चा अवतार होते. त्यांच्या शब्दाबाहेर जाण्याची अेकाहि माणसाची प्राज्ञा नव्हती. मला त्यांनीं मुलगी दाखवलीसुद्धां नाहीं. लग्न न करण्याचा निश्चय बाबांना बोलून दाखवावा असं अनेकदां मनांत येअी. पण विरोधाची भुणभुण आअीच्या कानांवर घालण्यापलीकडे मी कांहीं करूं शकलों नाहीं. माझी आअी बिचारी बाबांची बंदी गुलाम होती. नवऱ्याची अिच्छा आणि मुलाचं लग्न या दोन्हीसाठीं ती आटापीट करून घेत होती. माझा विरोध बाबांच्या काना-पर्यंत गेलाच नाहीं आणि अखेर मी लग्नाला उभा राहिलों. लग्नाच्या वेळीं माझ्या बायकोचं वय १५ आहे असं सगळीं म्हणत होतीं. पण ती माझ्या बरोबरची दिसत होती. यावरून तिच्या धिप्पाड देहाची तुम्हांला कल्पना आली असेल. तिच्या आणि माझ्या रूपाचं वर्णन मी काय करूं? माझं रूप तुमच्यासमोर आहेच. पण याहिपेक्षां मी त्यावेळीं चांगला दिसत असावा असं माझ्या फोटोवरून वाटतं. आमच्या घरांत माझ्याअितका देखणा आणि कॉलेज-चं शिक्षण घेणारा असा मीच अेकटा होतों. लग्नाची मला यावेळीं अिच्छा नव्हती. तरी माझ्या भावी पत्नीबद्दलच्या अपेक्षा निर्माण होऊं लागल्या होत्या. निदान जेव्हां त्यांना मूर्त स्वरूप आलं असतं तेव्हां माझ्या बायको-सारखं चित्र माझ्या स्वप्नांतसुद्धां आलं नसतं. पण माळ घातल्यानंतर जेव्हां मी माझ्या अर्धांगीकडे पाहिलं तेव्हां मला विहिरींत जाऊन जीव द्यावासा वाटला. असं वाटलं कीं मोठ्यानं ओरडावं, 'ही माझी बायको नाहीं. मला ही आवडत नाहीं.' पण मी बाबांच्या हातचं दुबळं बाहुलं होतों. रंगानं काळ्या, डोळ्यानं तिरळ्या आणि हाडापेरानं माझ्याअेवढ्या अशा अेका नकट्या मुलीचा—मुलीचा कसला, बाअीचा—नवरा होतों. मीच लहान आणि नाजूक होतों तिच्यापुढं. पण मी तिचा हात धरून सप्तपदी केली आणि तिला जन्मभर सांभाळण्याची शपथ घेतली.

जगांतल्या कोणत्याहि वस्तूचा नमुना आमच्या घरीं तुम्हांला मिळेल. पुन्हां गंमत अशी कीं, या हावरेपणाच्या जोडीला अव्यवस्थितपणाची जोड आहे. ज्यावेळीं जें हवं असेल तें कधीं मिळायचं नाहीं आणि तें मिळालं नाहीं, कीं घरांत हें नाहीं तें नाहीं अशी तिची तक्रार सुरू होते. माझ्या पगारावर ती संतुष्ट नाहीं. मला पांचशें रुपये मिळत नाहींत म्हणून ती मला बावळट समजते. त्यांतच संसारांत जरूर नसतांना दोन मुलांनीं भर टाकली आहे. शरयूला काम करण्याचा कंटाळा. मुलं, ती, सामान आणि तिचा तो तोंडाचा पंजाबमेल पट्टा यांचा रामरगाडा सारखा चालू असतो. हल्लीं त्या घरांत शांतता आहे म्हणून घरांत पाऊल ठेवतांना आपण चुकलों तर नाहीं अशी मला शंका येते. एरवीं म्हणाल तर घरांत पाऊल ठेवण्याचीसुद्धां मला अिच्छा होत नाहीं. लग्नापूर्वी मी तिला कोकिळकंठी मैना समजत होतों. पण छे ! ती साळुंकी आहे. मला वाटतं लग्नाची वाट पहाण्यांत सुख आहे. प्रत्यक्ष लग्नांत मात्र नाहीं. मला जर हें आधींच समजलं असतं तर मी जन्मभर तिची वाट पहात बसलों असतों. पण या तापत्रयांतून तरी वाचलों असतों.

'तिला पुष्कळ आंजारून गोंजारून, थोडंसं रागावूनसुद्धां समज दिली. पण तिचं तें खर. अेखाद्या वेळीं मनांत येअी, कीं पूर्वींचे नवरे आपल्या बायकांना अधूनमधून अेखादी चपराक ठेवून देत तो प्रयोग करून बघावा म्हणजे हें ताठ कातडं अंगावरून वारं गेल्याप्रमाणें ढिलं पडेल. पण झालें तें अनपेक्षितच. तुम्हांला किती उदाहरणें सांगावींत ? पण अेकच सांगतों. रंगीत पाट आणावेत अशी तिची माझ्यामागें भुणभुण होती. मी म्हणालों, 'आहेत हे पाट काय वाईट आहेत ? शिवाय महागहि फार झाले आहेत. आणि माझ्याजवळ पैसे नाहींत ही सर्वांत मोठी अडचण आहे.'

'एवढं म्हणायचाच अवकाश ! शब्दांच्या लाह्या फुटूं लागल्या : जन्मदरिद्री आहांत तुम्ही. कांहींहि आणायला सांगा, म्हणे पैसा नाहीं. अहो मग आहे तरी काय तुमच्याजवळ ? हौस मौज मनालाच नाहीं मग पैशाला कुठून असणार ? दोन मुलं दिलीं देवानं सोन्यासारखीं, पण यांचं मन सदा आंबलेलं अन् चिंबलेलं. पाट आणणार आहांत कीं नाहीं तुम्ही ?'

सोन्यासारख्या मुलांना धपाटे घालीत तिनं मला जाब विचारला.

'नाहीं' म्हणून मी बाहेर पडलों.

जेवायच्या वेळेला पुन्हां घरीं आलों.

अहो, घरांत बायको असल्यानं खानावळींत जेवणाचेंहि सुख मिळत नाहीं. जेवायला गेलों. पहातों तों बसायला पाट नाहींत. मी म्हणालों, 'हें काय? पाट कां नाहींत बसायला? आज पाट कुठें गले?'

'पाट गेले चुलींत.'

'म्हणजे?'

'म्हणजे मी ते जाळले. आजचं जेवण पाट जाळूनच केलं आहे.'

'मी तिरमिरीसरशीं अुठलों आणि ती भाकरी थापीत होती तिला तशीच उभी करून तिच्या फाडफाड चार कानशिलांत लगावल्या. रागानं ती हिरवी पिवळी झाली आणि पहातां पहातां धाडकन् जमिनीवर पडली. तिला फिट आली होती.

'पुढचं वर्णन मी सांगत नाहीं. पण तेव्हांपासून फिटचं प्रकरण सुरू झालं आहे. अशा बाअीपुढं कोणी जरी प्रतापराव आला तरी तो काय तिच्यापुढें रडणार? मी तरी अगदीं रकमेस आलों आहें तिच्याविरुद्ध अेक शब्द बोललात तरी ही धाडकन् अंग टाकून देते. तिच्या मनाविरुद्ध वागण्याची सोय नाहीं आणि मनाप्रमाणें वागणं शक्य नाहीं. कित्येकदां वाटतं तिचं हें ढोंग आहे. डॉक्टरनी मला तसं लांबून सुचवलं आहे. पण या ढोंगावर तोडगा काय? जोशी तळमळत आहेत आपल्या बायकोनं आपल्यावर प्रेम करावं म्हणून पण माझ्या बायकोनं माझ्या प्रेमाची अशी खिरापत करून टाकल्यापासून मला मात्र प्रेमाची शिसारी आली आहे. बायकोचं प्रेम ही अिंगळीची नांगी आहे. तुम्ही तिच्या प्रेमांत पडलात कीं पदरांत नुसत्या यातना, निव्वळ क्लेशच यायचे. तिनं माझ्यावर प्रेम करावं या कल्पनेचा मी धसका घेतला आहे. फार काय पण प्रेम या शब्दाचीच मी धास्ती घेतली आहे. तिच्यावरच काय पण जगांत मी कुणावरच प्रेम करणार नाहीं. तिच्या या जीवघेण्या प्रेमांतून कोणी माझी सुटका करील तर मी त्याचा जन्मभर गुलाम होअून राहीन.

'तिच्याकडे पाहिलं कीं माझं मलाच कधीं कधीं नवल वाटतं—' घारपुरेनीं दिलेलं पाणी पिअून परुळेकर पुन्हां बोलूं लागले, 'नवल याचं वाटतं

सुद्धां मला वाटेना. अेखादी दगडाची पुतळी सजीव होअून वावरत आहे असं वाटे. याचं कारण अेकच, कीं ती अजून आपल्या पहिल्या नवऱ्यावर प्रेम करते आहे, त्याच्याबरोबर तिनं यौवनाचा बहर लुटलेला आहे. मला नवं असलेलं जग तिनं आपल्या पहिल्या नवऱ्याबरोबर अनुभवलेलं आहे. तिला नवं असं कांहीं राहिलेलं नाहीं. ती माझी पहिली बायको असली तरी मी तिचा दुसरा नवरा आहें. तिला आपल्या पहिल्या नवऱ्याची आठवण होऊं नये असं म्हणण्याअितका मी रानटी नाहीं. तिचं माझ्यावर प्रेम नाहीं असं समजण्यापूर्वी ही आपल्या नवऱ्याशीं माझी तुलना करीत असेल काय अशी शंका मला येई. पण मी तेवढं मनावर घेतलं नाहीं. पण तिनं मेलेल्या नवऱ्याचे येवढे देव्हारे माजवावे हें मात्र मला सहन होत नाहीं. तुम्ही मला वेडा म्हणा, खुळा म्हणा. पण तिनं त्याच्यावर प्रेम करावं हें मला खरोखरी आवडत नाहीं. तिचं मन आकर्षून घेण्याचं सामर्थ्य, ज्याच्या देहाची तीन चिमूटसुद्धां राख उरली नाहीं त्या अपार्थिव नवऱ्यांत असावं आणि माझ्या जिवंत मनाचा आणि देहाचा तिनं मुळीसुद्धां विचार करूं नये याचा मला विलक्षण संताप येतो. तिच्या नवऱ्याचा मला मत्सर वाटतो. काय करूं, शक्य नाहीं म्हणून मला हात चोळीत स्वस्थ बसावं लागत आहे. पण असं वाटतं कीं तो जर जिवंत असता तर या, या हातांनीं मी त्याला होत्याचा नव्हता करून टाकला असता. पण त्याला अस्तित्व नसून तो माझा छळ करतो आहे आणि मला अस्तित्व आहे तरी मी अस्तित्वशून्य झालों आहें. तिच्या या वागण्याचा मला अर्थच समजत नाहीं. दुसरं लग्न करण्यांत आपण चूक केली असं तिला वाटत आहे आणि पहिलं लग्न करण्याची आपली तऱ्हा चुकली असं मला वाटत आहे. यांतून मार्ग...मला तरी सुचत नाहीं.'

तक्क्याला टेकून जोशी हताशपणें बसले. जोशांची हकीकत अेकत असतांना परुळेकर आपल्या मनाशीं जुळवाजुळव करीत होते. आपल्याहि दुःखाला वाचा फोडावी असा अुमाळा त्यांना आंतूनच येत होता. ते म्हणाले, ' संथ जलाशयाच्या पोटांत मासे, बेडक्या किंवा शेवाळं असावं, पण तें आहे असं वरवर पहाणाराला मात्र दिसूं नये तसं आपलं होतं. जोशानं आपली हकीकत सांगेपर्यंत मी असं समजत होतों कीं जोशी फार सुखी आहे. माझ्याहि

बाबतींत कुणी असं गृहित धरलं तर तें वावगं होणार नाहीं. पण वस्तु-स्थिति मात्र अगदीं अुलट आहे. सुधारणेच्या नादानं नव्हे तर प्रेमांत पडलों म्हणून मी प्रेमविवाह केला आणि आतां तोंडघशी पडल्याचा पश्चात्ताप मला होत आहे. प्रेमांत मी कसा पडलों हें सांगण्याचा खटाटोप करीत नाहीं. तरुण वय, स्त्रीसहवासाची अुत्कट अिच्छा आणि सांसारिक सुखाचं काल्पनिक अिंद्रजाल, अशा अनेक गोष्टीच्या जाळयांत मी सांपडलों होतों. जेव्हां कांहीं कळत नस ं तेव्हां कळतं आहे असं वाटण्याचा तो माझा काळ होता. शरयूशीं लग्न केल्यावर माझ्या आयुष्यांत निर्माण होणाऱ्या नंदनवनाचीं चित्रं मी पहात होतों. आमचं अेकमेकांवर अितकं गाढ प्रेम होतं कीं माझ्या वैवाहिक जीवनांत अडचण, गोंधळ, भांडण, वितंडवाद यांचं काहूर कधीं काळीं अुठेल अशी मला निसटतीसुद्धां शंका आली नाहीं. तिचा स्वभाव मला जितका समजला आहे तितका कोणालाच कळलेला असणं शक्य नाहीं अशी मला घमेंड होती. तिला मी सौंदर्याची पुतळी आणि सद्-गुणांची खाण समजत होतों. वास्तविक प्रत्येक जोडपं असा गोड गैरसमज करून घेत असलं तर त्यांत वावगं काय आहे? मला वाटतं प्रत्येकाचंच सुरुवातीस हें असंच होत असावं. निदान माझं तरी असं झालं.

'पण पुढें अेकेक गोष्टीचा नव्यानं शोध लागूं लागला. ज्या स्वभावाला मी हौशी आणि लाडिक समजत होतों तो स्वभाव लहरी आणि हट्टी होता. हिटलरशाहीचा वारसा तिच्या रक्तांतूनच वहात होता. तिला हवी असलेली वस्तु तोंडांतून अुच्चारण्याचा अवकाश, तिच्यासमोर हजर झालीच पाहिजे. जोशांनीं आपली बायको हट्ट करीत नाहीं, जास्त समंजसपणा दाखवते अशी तक्रार केली आहे. पण हट्टी बायकोच्या यातना त्यांना माहीत नाहींत म्हणून ते तसं म्हणतात. पण मला क्लेश माहीत आहेत. अेखाद्या हुडेलहप्पी आणि रानवट पुरुषाला सुतासारखा मऊ आणायचा असला तर शरयूसारखी खबरदार बायको त्याच्या गळयांत बांधावी. लांडग्याचा कोकरूं झालाच पाहिजे. शरयूला बाजारांत दिसणाऱ्या प्रत्येक वस्तूचा हव्यास आहे. आमचं घर म्हणजे पदार्थसंग्रहालय झालं आहे. मला जास्त सामानाचा अगदीं तिट-कारा आहे, तर सामानाची खेचाखेच करण्याचा तिनं विडाच अुचलला आहे.

जवळ !' नको अितका समंजसपणा ती दाखवीत होती. ती रसिक असेल अशी माझी कल्पना होती,पण अरसिकपणाची तिनं कमाल चालवली होती. संसारांत पडलेली ही स्त्री. पण तिला कांहींहि नको होतं. मला प्रसन्न ठेवण्याचा ती प्रयत्न करी, पण अशी दूर अंतरावर उभी राहून. मला सुख व्हावं ही तिची अिच्छा होती. पण माझ्याशीं ती समरस होत नव्हती. आम्ही एका घरांत रहात होतों. नवरा–बायकोच्या नात्यानं रहात होतों. पण आम्ही जणुं दोन घरचे दोन पाहुणे होतों. तिच्या वागण्याची ती सालस, गरीब पण अलिप्त पद्धत पाहून मला भिंतीवर चरा ओढल्यासारखा वाटे. माझा हात तिनं कधीं आपणहून धरला नाहीं. माझ्या सहवासांत ती बेहोश झाली नाहीं. माझ्या सान्निध्यांत तिला स्वतःचा, जगाचा विसर पडला नाहीं. माझ्या डोळ्यांत तिनं आपलं रूप पाहिलं नाहीं. तिचं सर्वस्व म्हणजे मीच आहें अशी जाणीव तिनं मला अेक क्षणभरसुद्धां दिली नाहीं. ती जणुं कर्तव्यकर्म करीत होती. माझ्या सुखसोयी ती पहात होती. त्या समरसतेची चाहूल मात्र माझ्या अंतरंगांत कधीं अैकूं आलीच नाहीं.

'तिच्या या चमत्कारिक, अलिप्त वागण्यानं मलासुद्धां अिच्छा नसतांना तिच्यापासून दूर रहावं लागत होतं. तिनं आपल्या अंतःकरणाचे दरवाजे जणुं बंद करून घेतले होते. हातांत साखर असावी पण तोंडांत घालतां घालतां त्याची माती होअून जावी असं होत होतं. मी फार खिन्न झालों. याचं कारण काय तें तिलाच विचारावं असं अेकदां मनांत आलं. अेखाद्या दिवशीं प्रसंग पाहून विचारावं असंसुद्धां मी ठरवलं.

'पण ती वेळ आलीच नाहीं. अेक दिवस डोकं दुखत होतं म्हणून मी दुपारचाच ऑफिसमधून घरीं आलों. बाहेरच्या खोलीचं दार अुघडंच होतं. मंदा आंतल्या खोलींत पाठमोरी बसली होती. चोरपावलानं जाअून तिचे डोळे झांकावे आणि थोडी गंमत करावी म्हणून मी हलक्या पावलानं तिच्या मागें जाअून अुभा राहिलों. तिच्या पुढ्यांत एक छोटीशी बॅग होती. त्या बॅगेंत अेका जोडप्याचा फोटो होता. त्यांतली स्त्री म्हणजे मंदाच होती आणि तिच्या शेजारीं, तिच्या खांद्यावर हात ठेवून अुभा असलेला सुंदर पुरुष म्हणजे मंदाचा पहिला नवरा होता. त्याला तिनं गुलाबाचीं फुलं वाहिलीं

होतीं. तिनं डोळे मिटले होते. हात जोडले होते आणि तिच्या डोळ्यांतून अश्रु वहात होते. ती म्हणत होती, ' मी चुकलें. मी असं करायला नको होतं. तुम्हांला मी वचन दिलं कीं मी तुम्हांला कधीं विसरणार नाहीं. पण मी चुकलें. याचं परिमार्जन मी कसं करूं ?'

' मला मोठा धक्का बसला. पायाखालची जमीन दुभंग होअून आपण अगदीं खोल खोल जात आहोंत असं मला वाटलं. माझं डोकं दुखत होतं हें सुद्धां मी विसरून गेलों. आलों तसाच हलक्या पावलांनीं मागे वळलों. आणि चहा पिण्यासाठीं म्हणून अेका इराण्याच्या हॉटेलांत गेलों.

' मला समजून चुकलं कीं मंदा अजून आपल्या मृत नवऱ्यावरच प्रेम करीत होती. माझ्या प्रेमाची तिच्यावर बळजबरी होत होती. खरंच सांगतों परुळे-कर तुला, पुर्नविवाहाच्या सुधारणेच्या नादानं मी आयुष्यांतल्या अेका महत्त्वा-च्या सुखाला पारखा झालों. माझा अेकटेपणा कधीं संपलाच नाहीं. तिचं आपल्या पहिल्या नवऱ्यावर प्रेम होतं. ती माझी पहिली बायको असली तरी मी तिचा दुसरा नवरा होतों. मला ज्या गोष्टी नव्या होत्या त्या तिच्या लेखीं जुन्या झाल्या होत्या. माझ्या आशांना नवा मोहोर येत होता आणि तिच्या आशा गतस्मृतींत विरघळून गेल्या होत्या. त्यामुळें तिच्या आणि माझ्या चालीचा ठेका जुळत नव्हता. माझ्या दृष्टीचा आशय, माझ्या बोलण्याचा अर्थ, माझ्या अुत्सुकतेची जाणीव, आणि माझ्या रोमरोमांत फुलून अुठणारा तारुण्याचा अुन्माद . . या साऱ्यांकडे ती आळसावलेल्या नजरेनं पहात होती. तिच्या ओठांतून बाहेर पडणारे शब्द अुत्सुक तरुणीचे नसत. तिच्या तरुण देहांतून जणूं कंटाळलेला जीव बोलत होता. तिची प्रत्येक हालचाल, कृति, तिच्या प्रेमाची रीत हीं सारीं पेंगुळलेलीं होतीं. वैवाहिक जीवनापासून ती फटकून दूर अुभी होती. तिच्या नजरेंत निराशा होती. तिची दृष्टि भूतकाळा-वर स्थिरावली होती. वर्तमानकाळाची मौज लुटण्याची तत्परता तिनं कधीं दाखवली नाहीं कीं भावी काळाचीं रम्य स्वप्नं तिच्या डोळ्यांपुढें तरंगलीं नाहींत. यंत्रासारखी ती कर्तव्यकर्म करीत होती. हें माझ्या ध्यानांत आलं तेव्हांपासून तिच्या स्पर्शानं माझ्या अंगावर काटा येईनासा झाला, अितका तो स्पर्श चेतनाहीन, थंडगार फत्तरासारखा होता. ती जीवंत माणस आहे असं

मी म्हणतों कीं आपण आपले अनुभव सांगूं या. माझी खात्री आहे कीं या चर्चेतून अेखादी चांगली गोष्ट आपल्या प्रत्ययाला येईल.'

सर्वांचे चेहरे थोडे कावरेबावरे झाले. ते साखरदांडेकडे पाहूं लागले. जोशी, घारपुरे आणि परुळेकर यांच्यांत साखरदांडे हा अगदीं नवा मित्र होता. पण त्यांची अडचण ओळखून साखरदांडे म्हणाले, 'तुम्हांला संकोच करण्याचं कारण नाहीं. मी माझाहि अनुभव सांगेन.'

'हें पहा जोशी', परुळेकर म्हणाले, 'ज्याची अक्कल त्याची नक्कल! तूं ज्या प्रामाणिकपणानं आपली हकीकत सांगशील त्या मानानं आम्ही आमच्या हकीकती सांगूं.'

'हरकत नाहीं. मन मोकळं करायला कधींकधीं बायकोपेक्षांसुद्धां मित्रच अधिक जवळचा असतो, हें आपल्याला साऱ्यांनाच पटणार आहे याची मला खात्री आहे. कारण आपण जें बोलणार आहोंत तें आपण आपल्या बायको-जवळ बोलूं शकूं काय हा सवाल तुम्ही स्वत:लाच विचारून पहा. मी पाल्हाळ लावीत नाहीं. माझ्या हकीकतीकडेच मी वळणार आहें.

'मी सुधारक आहें हें तुम्हांलाच काय पण सर्वांनाच माहीत आहे. सुधारकी विचार बोलून दाखविणारा मी केवळ शब्दपंडित नाहीं. कारण वयाच्या पंचविसाव्या वर्षीं मी लग्न केलं तें अेका पुनर्विवाहेच्छु मुलीशीं. वास्तविक तिचा तो पुनर्विवाह होता तरी माझं मात्र तें पहिलंच लग्न होतं. मी अेखाद्या कुमारिकेशीं लग्न करावं असं माझ्या घरांतल्या मंडळीचं म्हणणं होतं. पण असा विचार केला कीं जी सुधारणा व्हावी असं मला वाटतं ती मी स्वत:च आधीं केली पाहिजे. आधीं मी कुमारिकेशीं लग्न करायचं, मग तिच्या मरणाची वाट पहायची आणि मग अेका बालविधवेचा उद्धार करायचा हा मूर्खपणाचा विचार होता. शिवाय माझ्या सुधारणेकरितां ती मरावी असं मला वाटणं शक्य होतं काय? किंवा ही माझ्या हातांतली गोष्ट होती काय? मी कुणाचंहि न ऐकतां बावीस वर्षांच्या, वर्षापूर्वींच विधवा झालेल्या अेका मुलीशीं लग्न केलं. तिचं पहिल्या सासरचं मंदा हें नांव मी तसंच ठेवलं. हेतु हा कीं आपल्यांत फार बदल झाला आहे असं तिला वाटूं नये.

'माझ्या लग्नाला फक्त अेकच वर्ष झालं आहे. पण सुरुवातीचे दिवस

आणि ही वर्षाअखेरी यांत जमीनअस्मानाचा फरक पडला आहे. मला वाटतं, माणसाच्या जीवनांत जमीनअस्मानाचा फरक घडवून आणणाऱ्या ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांत लग्न ही सुद्धां अेक प्रमुख बाब आहे. निदान सामान्य माणसाच्या आयुष्यांत तरी गळयांत विवाहाची माला पडली कीं त्याच्या मधुर स्वप्नांच्या झिरमिळया तुटून गळूं लागतात. लग्नानं माणसं शुद्धीवर येतात. पुरुषाला शुद्धीवर येण्याची पहिली चपराक त्याला त्याची बायको देते. पण . . .

'लग्न झाल्या दिवसापासून मी खुषींत होतों. तिच्यावर, माझ्यावर, आणि सगळया जगावर मी खूष होतों. तिच रूप मला आवडत होतं. घरांतली व्यवस्था ती उत्तम ठेवीत होती. माझ्या धोतराच्या निऱ्या करण्यापासून माझी प्रत्येक गोष्ट ती मोठया तत्परतेनं करी, आणि अजून करते. प्रथम प्रथम ती मला अितकी लाजे, माझ्याकडे पाहण्याचा किंवा माझ्याशीं बोलायचा तिला अितका संकोच वाटे कीं कांहीं विचारूं नका. आमच्या त्या अेवढया-शा दोन खोल्या तिला लाजायला फार कमी पडत. आपणहि थोडं लाजावं कीं काय, सुरुवातीला नवऱ्यानंसुद्धां लाजायचं असतं कीं काय अशी मला शंका येई.

'पण असे कांहीं दिवस गेले आणि पुढें पुढें मला असं वाटायला लागलं कीं खरं म्हणजे आतां हा तिचा संकोच कमी व्हायला पाहिजे. माझं आणि तिचं जीवन अेका प्रवाहांतून वहावं अशी माझी अिच्छा होती. तिच्या आणि माझ्या जीवानं अेकमेकांसाठीं वेडं होअून जावं ही माझ्या मनाची तळमळ होती. पण ती वेडी तर होत नव्हतीच पण शहाणीसुद्धां नव्हती. तिला हव्या असलेल्या वस्तु तिनं माझ्याजवळ हक्कानं मागून घ्याव्यात, एखाद्या गोष्टीसाठीं तिनं माझ्याजवळ लाडिक हट्ट धरावा अशी माझी अपेक्षा होती. मी या गोष्टीची वाट पहात होतों.

'पण बारकाअीनं विचार केल्यावर मला असं दिसून आलं कीं, ही आपल्या घरांत मालकिणीच्या दिमाखानं रहात नाहीं. अेखाद्यानं सेवाव्रत आचरावं तशी तिच्या वागण्याची पद्धत होती. या सबंध वर्षांत माझ्याजवळ तिनं अेकहि वस्तु मागितली नाहीं. मी आपणहून विचारलं तर म्हणे, 'हें आहे माझ्या-

फार अभिमान आहे. माझी आई आम्हां मुलांना नेहमीं म्हणते कीं, 'तुम्ही आपल्या वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा. तुमचं कल्याण होईल.'

आपल्या आयुष्यांतले अनेक अनुभव त्यानी मला सांगितले आहेत. पण त्यांच्या सांगण्याची पद्धति अत्यंत आकर्षक आहे. वाणी स्वच्छ, आणि तंत्राचा अभ्यास न करतांहि ऐकणाराचें मन ओढून घेण्याचें त्याचें सामर्थ्य विलक्षण आहे. दुसऱ्याच्या गुणांचें कौतुक मनापासून करावें असें त्यांनींच ! पण त्याचे दोषहि त्याच्या गळयांत गोड शब्दांत बांधावेहि त्यांनीच ! माझ्या लेखनांतले गुण जसे त्यांनीं सांगितले तसे दोषहि सांगितले आहेत. मी भेटलें कीं त्यांचे दोन तीन प्रश्न ठराविक असतात,'नवीन काय वाचलंस ? नवीन काय लिहिलंस ? ' तें सारें त्यांना सांगावें लागतें. ज्ञानेश्वरींतल्या ओव्या म्हणून दाखवाव्या लागतात. मोठ्या तन्मयतेनें ऐकतात रसिक रसिकपणानें त्यावर चर्चा करतात. वैभव ज्ञानेश्वरांचें, पण खानसाहेब मलाच शाबासकी देतात माझ्या पाठीवर मोठ्या प्रेमाने थोपटतात.

नवीन कांहीं लिहिलें किंवा पाठ केले कीं मला ते खानसाहेबाना दाखविण्याची अतिशय इच्छा असते. ते भेटले की मला दम निघत नाहीं. आधीं सगळें सांगून टाकतें, मग बाकीची विचारपूस.

त्यांच्या माझ्या अनेक आवडीनिवडी सारख्या आहेत. पण पिढीचें अंतर असल्यामुळें विचारांतहि अंतर पडतें. आम्ही पुष्कळ चर्चा करतों; पण आपला मुद्दा कोणीच सोडीत नाही. मग आम्ही दोघेहि समजतों की हा वाद संपायचा नाहीं. मग तो तिथेंच सोडून देतों.

पण माझ्यांतली लेखनकला वाढीला लावण्याचें सारें श्रेय ती. खानसाहेबांना आहे. आयुष्यांत माणसाला उत्तेजनाची केवढी जरूर असते ! पण माझ्या वडिलांनीं ही उणीव मला कधीं पडू दिली नाही. पित्याचें वात्सल्य म्हणून म्हणतात तें सौख्य मी भरपूर अनुभवलें आहे. मुलीला पितृऋणाची फेड कधीं करतां येते का ? कृतज्ञता व्यक्त करणें एवढेंच माझ्या हातीं आहे आणि ती मी हें पुस्तक ती. खानसाहेबांना अर्पण करून व्यक्त करीत आहें.

१८९ शुक्रवार,
पुणें २.

—वसुंधरा पटवर्धन

## संसार : : १

हातांतले पत्ते बेफिकीरपणानं जमिनीवर फेंकून जोशी म्हणाले, ' कंटाळा आला या पत्त्यांचा ! रोज रोज पत्ते खेळायचे. त्यांत नाविन्य तर नाहींच, पण मनसुद्धां यानं मोकळं होत नाहीं. मनाला प्रसन्नता कशी ती येतच नाहीं. असं वाटतं, कीं दुखणं एकीकडे आणि आपण मलमपट्टी करतोय भलतीकडेच. आपण निराळाच खेळ खेळलों तर ? '

जोश्यांच्या मधल्या अेकदोन वाक्यांचा अन्वयार्थ बाकीच्यांना लागला नव्हता. पण त्यांचा आजचा रोख थोडा निराळा आहे याची सर्वांनाच जाणीव झाली. घारपुऱ्यांनीं विचारलं, ' कोणता खेळ ? '

' सांगतों. घारपुरे आपल्या सर्वांपेक्षां मोठे आहेत; पण तरीसुद्धां आपण आपलीं मनं एकमेकांजवळ खुलीं करतों. तेव्हां माझं म्हणणं असं कीं, आज आपण याहिपेक्षां पुढल्या टप्प्याला जाऊं या. आपल्या बायकोबद्दलच्या आपल्या अपेक्षा कितपत पुऱ्या झाल्या हें आपण प्रामाणिकपणानं सांगूं या. यांत कोणी कोणाला कमीअधिक लेखण्याचं कारण नाहीं. पण मला असं वाटतं कीं आयुष्यभर खेळत असलेला हा विवाहाचा खेळ अखेर आपल्याला नेतो तरी कुठें हें आपल्याला समजलं पाहिजे. आपलं लग्न ही सौख्याचे दरवाजे खुले करण्याची चावी आहे कीं अंगावर उलटलेला जुगार आहे ? विवाहाची माला गळ्यांत घालून घेतल्यापासून माणूस पृथ्वीवरून स्वर्गांत जातो कीं आगींतून उठून फुफाट्यांत पडतो ? स्वतःचा संसार म्हणजे कांहीं जगांतल्या सगळ्या लोकांचा संसार नाहीं; किंवा आपले दोनचार जणांचे अनुभव म्हणजे कांहीं जगाचा अनुभव नव्हे. पण जगांत हीच एक गोष्ट अितकी नाजुक आहे कीं सहसा माणूस याबाबत खरं बोलत नाहीं. त्यामुळें लाखों लोकांच्या संसारांत सुखदुःखांचं मिश्रण किती आहे याचा खराखुरा थांग लागणं अशक्य आहे. पण आपल्याला आपल्यापुरता अंदाज घेणं मात्र शक्य आहे. म्हणून

# कृतज्ञता

हा कथासंग्रह मी माझे वडील ती. रा. रा. का. वि. खानविलकर ऊर्फ खानसाहेब यांना अर्पण करीत आहें. माझे वडील म्हणून ती. खानसाहेबांची मी [illegible] रहाणें सहाजिक आहे. पण हा कथासंग्रह त्यांना अर्पण करण्याचें कारण वेगळें आहे. मला लहानपणापासून वाटत आलें आहे कीं माझ्या वडिलांच्यासारखे वडील लाभणें हें एक परम भाग्य आहे. माझ्या लेखनाची आवड त्यांच्या उत्तेजनावर पोसली आहे. रोजच्या व्यवहारापलीकडे आपण अधिक कांहीं केलें पाहिजे या महत्त्वाकांक्षेचें बीं त्यांनीं माझ्या मनांत लहानपणापासून पेरलेलें आहे. अगदीं परवां परवांपर्यंत त्यांनी माझ्याकडून अनेक पुस्तकें वाचून घेतलीं. समजावून दिलीं. 'तुझें तू वाच' असें कधी म्हणाले नाहीत. मग त्यासाठीं रात्रीं दोनअडीच वाजले तरी हरकत नाहीं. अलीकडे त्यांची प्रकृति बरी नसते. त्यामुळें जाग्रण सोसत नाहीं. आई म्हणते, 'निजा आता. उशीर झाला.' पण खानसाहेब म्हणतात, 'अग, हिच्याशीं बोलत बसलों तर मला बरंच वाटेल.'

खानसाहेब अतिशय बुद्धिमान आहेत. त्याचें वाचन पुष्कळ आहे. पण ते कधीं लघुकथा वाचीत नाहींत. माझी एक एक गोष्ट मात्र ते तीन तीन वेळा सुद्धां वाचतात. पुन्हां मला वाचायला सांगतात. आणि माझी एक गोष्ट मग त्यांना दोन तीन दिवस पुरते. माझें 'जयंताच्या गोष्टी' हें पुस्तक मी त्यांना पुण्याहून मुबईस पाठविलें. पुस्तक मिळालें तेव्हां ते जेवायला बसले होते. पण पुस्तक पहातांच त्यांचें जेवण थांबलें. त्यांच्या वागण्यांत भावनेपेक्षां विचाराना अधिक प्राधान्य असलें तरी तसे ते भावनाप्रधान आहेत. 'जयंताच्या गोष्टी' हें पुस्तक तें काय! अगदींच छोटेसें. पण तें आपल्या मुलीनें लिहिलें आहे असें दिसतांच त्यांचें अंतःकरण भरून आलें. ताट पुढें सारीत ते माझ्या आईला म्हणाले, 'नको मला कांही. माझं पोट भरलंय.'

त्यानंतर त्यांची माझी भेट झाली तेव्हां त्यांनींच तें पुस्तक मला सबंध वाचून दाखविलें आणि मग म्हणाले 'तुझंच पुस्तक मी तुला वाचून दाखवलं.'

खानसाहेब रसिक आहेत. पण त्यांच्याजवळ असे अनेक गुण आहेत कीं जे सामान्य माणसाजवळ आढळणार नाहींत. म्हणून माझ्या वडिलांचा मला